सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, १३ ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०१ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# भारतात अराजकता पसरवण्याचे षडयंत्र : सरसंघचालक

## गुंडगिरी वाईट, प्रत्येकालाच आत्मसंरक्षणाचा अधिकार, संस्कृती आणि पर्यावरण रक्षणाची व्यक्त केली गरज



नागपूर, १२ ऑक्टोबर : एखाद्या देशाची प्रगती होऊ नये यासाठी अनेक शक्ती कार्यरत असतात. गेल्या काही वर्षा भारताची सर्वच क्षेत्रात प्रगती होतेय. त्यामुळे भारताला मागे ढकलण्यासाठी देशांतर्गत असंतोष आणि अराजकता पसरवण्याचे षडयंत्र आखले जातेय. यापासून अखंड सावध राहण्याची गरज असल्याचे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले. नागपुरात आज, शनिवारी आयोजित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी सोहळ्याला मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या कार्यक्रमाला इस्त्रोचे माजी अध्यक्ष के. राधाकृष्णन हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी सरसंघचालक म्हणाले की, भारतात सर्वत्र मूल्यांचा ऱ्हास आणि भेदभाव करणाऱ्या घटकांच्या समाज तोडण्याच्या खेळी दिसत आहेत. जात, भाषा, प्रदेश इत्यादी छोट्या वैशिष्ट्यांच्या आधारे सामान्य समाजाला वेगळे करून संघर्ष निर्माण करण्याचा प्रयत्न सुरु आहे. भारताची सीमेवरील पंजाब, जम्मू-काश्मीर, लद्दाख, सागरी सीमाक्षेत्रातील केरळ, तामिळनाडू आणि बिहारपासून मणिपूरपर्यंत संपूर्ण पूर्वांचल अस्वस्थ आहे. हल्लीचा काळ हा थेट युद्धांचा नसून अशा प्रचारच्या विविध गोष्टींच्या माध्यमातून एखाद्या देशाची प्रगती थोपवली जाते. गेल्या काही वर्षात भारताने सर्वच क्षेत्रात भरारी घेतली आहे. त्यामुळे भारताला बदनाम करणे, प्रगतीत अडथळे आणणे यासाठी जगातील काही शक्ती हे घडवून आणत आहेत. बांगलादेशातही हाच प्रयोग करण्यात आला. पाकिस्तानच्या अत्याचारातून मुक्तता करवून भारताने बांगलादेशच्या उभारणीला हातभार लागवला होता. परंतु, विदेशी शक्तींच्या षडयंत्रात अडकलेला बांगलादेश आज, पाकिस्तानला मित्र आणि भारताला आपला शत्रु मानतो. भारतातही असंतोष आणि अराजक पसरवण्याचे प्रयत्न सुरू असून यापासून प्रत्येक भारतीयाने अखंड सावध राहण्याची गरज असल्याचे डॉ. भागवत यांनी सांगितले.

बांगलादेश संदर्भात सरसंघचालक म्हणाले की, बांगलादेशमधील हिंदू समाजावर झालेले हल्ले हा गंभीर प्रकार होता. तेथील हिंदू समाज एकत्रितपणे समोर आला म्हणून काही प्रमाणात त्यांचा बचाव झाला. मात्र जोपर्यंत तेथील अत्याचारी कट्टरपंथीय लोक सक्रिय आहेत तोपर्यंत हिंदूंसोबत अल्पसंख्यांक समाजावर सातत्याने धोक्याची तलवार लटकत राहणार आहे. भारत सरकारने तेथील हिंदूंच्या मदतीसाठी सातत्याने पुढाकार घ्यायला हवा. तेथे भारताचा सामना करण्यासाठी पाकिस्तानसोबत हातमिळावणी करण्याच्या गोष्टी होत आहेत. जगातील काही देश हे प्रयत्न करत आहेत. यावर शासनाने लक्ष दिले पाहिजे. तसेच हिंदू समाजाने संघटित होत सशक्त होणे ही काळाची गरज आहे, असे डॉ.भागवत म्हणाले.

देशासमोरील विविध समस्यांकडे लक्ष वेधत असताना समाजातील विकृती व कुसंस्कारांवरदेखील भाष्य केले. विशेषतः ओटीटी प्लॅटफॉर्मच्या कंटेटवर त्यांनी चिंता व्यक्त केली. ओटीटी प्लॅटफॉर्मवर नियंत्रण आवश्यक असून त्याबाबत कायदा करायला हवा, असे ते म्हणाले. ओटीटी प्लॅटफॉर्मवर बिभत्सचेचे प्रदर्शन होते. त्याच्याबाबत कायदा हवेत, त्यानेच नियंत्रण येईल. ओटीटी प्लॅटफॉर्ममुळे तरुण पिढीवर वाईट परिणाम होत आहे, असे ते म्हणाले.यावेळी त्यांनी पर्यावरणाच्या समस्येवरदेखील उद्बोधन केले. पर्यावरणामुळे ऋतूचक्र पालटत आहे. पर्यावरणाबाबत अपुरा दृष्टीकोन आहे. आपण जगाचे अंधानुकरण केले व त्यामुळे पर्यावरणाच्या विविध समस्या निर्माण झाल्या. आपल्या जैविक शेतीसारख्या पारंपारिक पद्धतींचा जीवनप्रणालीत समावेश करावा लागेल. पाणी वाचविण्यावर भर दिला पाहिजे. तसेच सिंगल युझ प्लास्टिकचा वापर बंद करायला हवा, याकडे त्यांन लक्ष वेधले.

यावेळी सरसंघचालकांनी पश्चिम बंगालमधील अत्याचाराच्या घटनेवर भाष्य सेले. कोलकात्याच्या आर.जी. कार हॉस्पिटलमध्ये घडलेली घटना ही संपूर्ण समाजाला कलंकित करणाऱ्या अशा घटनांपैकी एक आहे. अशा निंदनीय घटनेचा निषेध आणि त्वरित, संवेदनशील कारवाई करावी या मागणीसाठी संपूर्ण समाज वैद्यकीय क्षेत्रातील बांधवांच्या पाठीशी उभा राहिला.

# जात पाहून नाही, काम पाहून आधार द्या : पंकजा मुंडे



बीड, १२ ऑक्टोबर : पाथर्डी तालुक्यातील भगवानगडावर आयोजित दसरा मेळाव्यात भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी जातीय राजकारणावर कठोर शब्दात टीका केली. त्यांनी अप्रत्यक्षपणे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांचा उल्लेख करत, जातीवर स्वार होणाऱ्यांऐवजी काम करणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचा सल्ला दिला. गोपीनाथ मुंडेंच्या औलादीला जातीवर काम देणं मान्य नाही; आम्ही कर्मठ नाही, असे त्या म्हणाल्या.

मुंडे यांनी छत्रपती उदयनराजेंनी आपल्या देवघरात पूजा करण्याची संधी दिली, असे सांगत छत्रपती घराण्याचे प्रेम मिळाल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. मात्र, त्या म्हणाल्या, आज समाजात एखाद्या दुर्घटनेत पीडित व आरोपींची जात तपासली जाते. अशा विचारांना विरोध करण्यासाठी आपण सज्ज झाले पाहिजे त्यासाठी माझे आयुष्य समर्पित केले आहे, असेही त्या म्हणाल्या.

भविष्यातील राजकीय दिशा स्पष्ट करत, त्यांनी पुढील निवडणुकीत ग्रामीण महाराष्ट्राला प्राधान्य देण्याचे संकेत दिले. ऊसतोड कामगारांना मतदान केल्याशिवाय ऊस तोडायला जाऊ नका, असे आवाहन त्यांनी केले. मी खोटं बोलत नाही आणि अंधारात कोणाशी गुप्त भेटी घेत नाही, असे स्पष्ट करत त्यांनी गावागावात रस्ते निर्माण व विकास कार्याचे वचन दिले. पंकजा मुंडे यांनी जातीय राजकारणाचा वापर न करता समतावादी दृष्टिकोनावर भर दिला. शिवरायांनी मावळ्यांची एकजूट साधली, तशी एकजूट साधण्याची गरज आहे असेही त्या म्हणाल्या.

# २०२९ मध्ये साधना महाजन उमेदवार, गिरीश महाजन बाहेर : फडणवीस

मुंबई, १२ ऑक्टोबर : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री गिरीश महाजन यांच्याबाबत मोठं विधान करत, २०२९ मध्ये महाजन यांना उमेदवारी न देता त्यांची पत्नी साधना महाजन यांना तिकीट देण्याची घोषणा केली आहे. 'गिरीशभाऊ, यावेळी लढून घ्या, २०२९ मध्ये साधना वहिनींचीच उमेदवारी असेल, असं फडणवीस म्हणाले.

जामनेर विधानसभा मतदारसंघात गिरीश महाजन यांच्या जागी साधना महाजन यांना अधिक लोकांचा पाठिंबा मिळेल, असंही त्यांनी स्पष्ट केलं. फडणवीस हे जामनेर येथे शिवसृष्टी आणि भीमसृष्टी स्मारकाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

फडणवीसांच्या या वक्तव्यामुळे राजकीय वातावरण तापले आहे. विरोधक गिरीश महाजन यांची जामनेरमधील लोकप्रियता घसरणार, असा दावा करतात. मात्र, फडणवीसांनी स्पष्ट केले की, महाजनांपेक्षा साधना महाजन अधिक प्रभावशाली ठरतील.

# विविध योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सक्षम करणार : मुख्यमंत्री

मुंबई, १२ ऑक्टोबर, : राज्य शासनामार्फत समाजातील विविध घटकांच्या उन्नतीसाठी योजना राबविल्या जात आहेत. महिलांसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, मोफत उच्च शिक्षण अशा योजना राबविल्या जात असून या योजनांच्या माध्यमातून महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यास सक्षम करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

कुर्ला विधानसभा क्षेत्रातील विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. कुर्ला येथील बंट्स भवन येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. आमदार मंगेश कुडाळकर, माजी खासदार राहुल शेवाळे आदी यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महाराष्ट्र उद्योग तसेच परकीय गुंतवणुकीत क्रमांक एकचे राज्य आहे. राज्यात महिलांबरोबरच शेतकरी, युवा, ज्येष्ठ नागरिक आदींसाठी देखील विविध योजना राबविण्यात येत आहेत. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी पुरेशी तरतूद करण्यात आली असून ही योजना बंद होणार नाही, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन भूमिपूजन तसेच प्रकल्पांचे लोकार्पण

छेडा नगर उड्डाणपुलाचे लोकार्पण. पूर्व द्रुतगती महामार्गावरील बीकेसी कनेक्टरपासून ते यु टर्न करिता प्रस्तावित असलेल्या पुलाचे, चुनाभट्टी रेल्वे फाटक वरून प्रस्तावित पुलाचे भूमिपूजन. कुर्ला विधानसभा क्षेत्रातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण. चुनाभट्टी प्रवेशद्वार व इतर कामाचे लोकार्पण.

# शिख फॉर जस्टीसवरील बंदी ५ वर्षांनी वाढवली

नवी दिल्ली, दि. १२ : विशेष प्रतिनिधी देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या कारणावरून केंद्रीय गृहमंत्रालयाने शिख फॉर जस्टिसवरील बंदी पाच वर्षांसाठी वाढवली आहे. मंत्रालयाने यासंदर्भात अधिसूचनाही जारी केली आहे. देशाच्या अखंडतेवर आणि सार्वभौमत्वावर आघात केल्याप्रकरणी या संघटनेवर ही कारवाई करण्यात आल्याचे अधिसूचनेत म्हटले आहे. स्वतंत्र खलिस्तानी राष्ट्र निर्माण करण्याच्या दिशेने ही संघटना सक्रिय झाली आहे. ही संघटना सातत्याने देशविरोधी कारवाया करत असते, असेही अधिसूचनेच नमूद करण्यात आले आहे. शिख फॉर जस्टिसवर २०१९ मध्ये पहिल्यांदा बंदी घालण्यात आली. त्यानंतर गृह मंत्रालयाने अधिसूचना जारी करून या संघटनेला देशाच्या सुरक्षेसाठी धोका असल्याचे म्हटले आहे. सार्वमताच्या नावाखाली ही संघटना सातत्याने अतिरेकी आणि फुटीरतावादाच्या विचारसरणीचा प्रचार करत असल्याचे अधिसूचनेत म्हटले आहे. शिख फॉर जस्टीस विरुद्ध भारतातही अनेक खटले दाखल असून त्यांची चौकशी सुरू आहे.

# मराठा समाजाने अन्यायाविरोधात सावध राहावे- मनोज जरांगे



बीड, १२ ऑक्टोबर : महाराष्ट्रातील मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेतलेल्या मनोज जरांगे यांनी दसरा मेळाव्यात आपल्या समाजावर होणाऱ्या अन्यायाविरोधात थेट इशारा दिला. नारायण गडावर आयोजित कार्यक्रमात जरांगे पाटील यांनी राज्यातील मराठा समाजाला सावध राहण्याचा सल्ला दिला. त्यांनी सांगितले की, मराठा समाजावर अन्याय होत आहे, आणि त्याच्या विरोधात आवाज उठवण्याची वेळ आली आहे. यावेळी यजरांगे यांनी उपस्थितांना भावनिक आवाहन केले की, माझा समाज राज्यात मान खाली घालून जगणार नाही. अन्याय सहन करायचा नाही, पण कुणावर अन्यायही करायचा नाही. समाजाच्या स्वसंरक्षणासाठी आपल्याला सतर्क राहावे लागेल. आपल्या समाजातील तरुणांना शिक्षण आणि प्रशासनात प्रगती करण्यासाठी समान संधी मिळाल्या पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.

त्यांनी आपल्या समाजातील प्रत्येकाला एकच वचन देण्याची विनंती केली की, जर राज्यातील जनतेवर अन्याय झाला तर त्या विरोधात एकत्र उभे राहू. तसेच मी कोणत्याही राजकीय अजेंडावर नाही असेही त्यांनी स्पष्ट केले.

जरांगे यांच्या वक्तव्यामुळे मराठा आरक्षणावर राजकीय आणि सामाजिक चर्चेचे वातावरण तापले आहे. त्यांनी राजकीय पातळीवर आपली मागणी असून आपले उद्दिष्ट फक्त समाजाच्या कल्याणासाठी आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# जिंतूर ट्रामा केअर मधील परिचारीकेला मारहाण; रुग्णालयात नासधूस,पोलीस ठाण्यातील घातला गोंधळ

जिंतूर : जिंतूर शहरातील ट्रमाकेअर सेंटर मधील कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या हल्ल्याचे सत्र थांबता थांबत नाही. मागील पंधरा दिवसां पूर्वीच रुग्णालयातील डॉक्टर आणि पुरुष परिचारकावर एका इसमाने हल्ला करून रुग्णालयात गोंधळ घातला होता.

ही घटना ताजी असतानाच आज दि ११ रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जिंतूर ट्रामा केअर मध्ये कर्तव्यावर असणाऱ्या परिचारिका वैशाली राठोड यांच्यावर अट्टल गुन्हेगार असणाऱ्या सेलू येथील इमरान कुरेशी नावाच्या तरुणाने लाथा बुक्क्यांनी मारहाण करीत जीवघेणा हल्ला केला आहे. परिचारिका राठोड ह्या गर्भवती असल्याचे देखील कळाले आहे.

मिळालेली प्राथमिक माहिती अशी की आज सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास परिचारिका वैशाली राठोड ह्या कर्तव्यावर असताना इमरान कुरेशी नावाचा तरुण हाताला जखम झाली म्हणून, त्यावर तात्काळ मलमपट्टी करण्यासाठी रुग्णालयात आला होता. मलम पट्टी करण्यास विलंब का करता..? असे म्हणत तरुणाने राठोड यांना अश्लील भाषेत शिव्या देत रुग्णालयात गोंधळ घालायला सुरुवात केली, त्यावेळी कर्तव्यावर असणाऱ्या परिचारिका राठोड त्याला मलमपट्टी करण्यासाठी गेल्या असता आरोपी तरुणाने राठोड यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करीत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. मारहाणीला विरोध करीत असताना आरोपीने राठोड यांचा विनयभंग करीत यांना लाथा मारायला सुरुवात केली त्यावेळी सुदैवाने त्याची लाथ गर्भवती असणाऱ्या राठोड यांच्या पोटात लागली नाही.

यावेळी तिथे उपस्थित असणारे लखन राठोड यांनी त्या तरुणाला आवर घातला म्हणून पुढचा अनर्थ टळला आहे. अशी माहिती मिळत आहे.सध्या सर्वत्र नवरात्रीची धामधूम सुरू आहे आणि जिंतूर मध्ये मात्र दुर्गा मातेचे रूप असणाऱ्या एका गर्भवती स्त्री परिचारिकेवर जीवघेणा हल्ला होतोय ही जिंतूरच्या संस्कृतीला काळीमा फासणारी घटना आहे. गत दोन महिन्यात एकाच महिला डॉक्टर दोन वेळा, पुरुष डॉक्टरवर एक वेळा, पुरुष परिचारिकावर एक वेळा आणि आता पाचव्यांदा एका महिला परिचारिकेचा विनयभंग करीत जीवघेणा हल्ला झाला आहे. या घटनेचा सर्व स्तरातून निषेध होत आहे.

जिंतूर ट्रामा केअर सेंटर मध्ये डॉक्टर आणि परिचारिकेवर होणारे हल्ले हे वाढतच जात आहेत यावर परभणी जिल्हा शल्य चिकित्सक आणि स्थानिक वैद्यकीय अधीक्षक काही उपायोजना करणार का..? असा सवाल जिंतूर मधील संतप्त नागरिकांकडून विचारण्यात येत आहे. घाबरलेल्या परिचारिकांनी थेट पोलीस ठाणे गाठून रीतसर तक्रार दाखल केली. घटनेतील आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले.

# आमठाणा ते आनवा ३४० कोटींच्या सिमेंट रस्त्याच्या कामाचा शुभारंभ



सिल्लोड : प्रतिनिधी (दि.११)-- महाराष्ट्र राज्याचे जनतेच्या मनातले मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते ऑनलाइन तर अल्पसंख्यांक तथा पालकमंत्री अब्दुलजी सत्तार यांच्या हस्ते नारळ फोडून आमठाणा येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारक ते अनवा, राज्य मार्ग क्रमांक २१४ या रस्त्याच्या कामासाठी राज्य शासनाने निधीतून ३४० कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याने या रस्त्याच्या कामाचा शुभारंभ करण्यात येत असल्याचे मंत्री अब्दुल सत्तार यांनी शासनाचे आभार मानले.

आशियाई विकास बँक अर्थसाहित प्रकल्पांतर्गत ३४० कोटी रुपये निधीतून आमठाणा ते अनवा राज्य रस्ता महामार्ग २१४ या रस्त्याची सुधारणा व नवीन रस्ता बांधकाम करण्याच्या कामाचा शुभारंभ (दि.११) शुक्रवार रोजी आमठाणा येथे राज्याचे अल्पसंख्यांक मंत्री तथा संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री माननीय अब्दुल सत्तार साहेब यांच्या उपस्थितीमध्ये राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस आणि अजित पवार साहेब यांच्या हस्ते आज शुभारंभ करण्यात आला.

यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष अर्जुन पा.गाढे, बाजार समितीचे सभापती केशवराव पा.तायडे, जिपचे माजी अध्यक्ष श्रीराम पा.महाजन, मुंबई बाजार समितीचे संचालक सतिष ताठे, पस माजी उपसभापती सय्यद अजीम बागवान, बाजार समितीचे माजी सभापती श्रीरंग पा.साळवे, माजी सभापती रामदास पालोदकर, माजी उपसभापती नंदकिशोर सहारे, पस डॉ.कल्पना जामकर, माजी जिपचे सदस्य कौतिकराव पा.मोरे, डॉ.संजय जामकर, राजेंद्र ठोंबरे यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता भगत, चाटे, सरपंच रघुनाथ पा.कदम, माजी चेअरमन नामदेव पा.कदम, श्रीराम पा.डफळ, एकनाथ तायडे, रघुनाथ मोरे, संजय बनसोड, रफिक देशमुख, बाजीराव मोरे, नामदेव बनसोड, भागवत मोरे, अनिल खरात, राहुल सपकाळ, रमेश पारखे, अनिल अक्कलकर, श्रीराम पाटील कुंटे ग्रामपंचायत सदस्य, चेअरमन संचालक यांच्यासह पंचक्रोशीतील ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सणासुदीच्या दिवशी प्रवासी वेठीस कर्मचाऱ्याचा ठिय्या

### तरुणांनी केली स्मार्टसिटी बस चालकाला मारहाण

छत्रपती संभाजीनगर : जाधवमंडीतून बाहेर येणाऱ्या स्मार्ट बसला समोरून येणाऱ्या दुचाकीने ओव्हरटेक केल्यानंतर भाऊ तुला घाही आहे. का म्हणणाऱ्या बस चालकाला चाकीस्वार व त्याच्या साथीदाराने शिवीगाळ, दमदाटी करत मारहाण केल्याचा प्रकार शनिवार दि.१२ ऑक्टोबर रोजी समोर आला असून सिडको पोलीस ठाण्यासमोर संतप्त कर्मचाऱ्यांनी स्मार्ट सिटी बससेवा बंद करून ठिय्या आंदोलन सुरू केले. यामुळे सणासुदीच्या दिवशी शहरातील विविध बस स्थानकावर प्रवासी ताटकळत उभे राहिल्याचे बघायला मिळाले.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, शनिवार दि.१२ ऑक्टोबर रोजी सकाळी ६ वाजण्याच्या सुमारास जाधव वाडीतील स्मार्ट सिटी बस डेपोतून प्रवाशांच्या सेवेसाठी निघालेल्या बसला मालवाहतूक रिक्षा व बसच्या मधोमध येऊन ओव्हरटेक करणाऱ्या अल्पवयीन दुचाकीस्वराला बसचालक विशाल गोरे यांनी आपल्या ताब्यातील स्मार्ट सिटी बस एम एच २० एलइ १९२१ ही थांबून भाऊ तुला घाई आहे का ओव्हरटेक करणाऱ्या तरुणाला म्हटले असता या कारणातून दुचाकीवरुन दोघे चिडले व आपल्या दोन मित्रांना फोन करून बोलावून घेतले. संशयित दोघांनी एसटी चालकाकडील दरवाजा उघडून चालकाला जबरदस्तीने खाली उतरवले. यावेळी संशयित दोघांनी एसटी चालकाला मारहाण करत शिवीगाळ, दमदाटी केली. रस्ता काय तुझ्या बापाचा आहे का म्हणून मारहाण केल्याची तक्रार करत स्मार्ट सिटी कर्मचाऱ्यांनी दोघा जणांना पकडून सिडको पोलीस ठाण्यात धाव घेत आरोपींवर कठोर कारवाई करा या मागणीसाठी ठिय्या आंदोलन सुरू केले. या आंदोलनामुळे वृत्त येईपर्यंत स्मार्ट सिटी बस सेवा पूर्णपणे बंद होती. या घटनेने परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले.

जाधवमंडीत समोरून येऊन बसला ओव्हरटेक करून रस्ता काय तुझ्या बापाचा आहे का म्हणून बस चालकाला मारहाण करणाऱ्या चार जणांपैकी दोन अल्पवयीन तरुणांना ताब्यात घेण्यात आले असून घटनास्थळावरून दोन जण फरार झाले त्यांचा शोध सिडको पोलीस घेत असून आरोपीवर गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती सिडको पोलीस निरीक्षक येरमाळे यांनी दिली आहे.

दसऱ्याच्या सणाला कर्णपुरा देवीच्या दर्शनाला तथा विद्यापीठ परिसरातील बुद्ध लेणी येथे धम्मचक्र प्रवर्तक दिनानिमित्त अनुयायी नतमस्तक होण्यासाठी जातात तसेच शहरातील हजारो प्रवासी दररोज स्मार्ट सिटी बसणे शहरात प्रवास करत असतात मात्र सणाच्या दिवशीच जाधवमंडीत गदारोळ झाल्याने ५० कर्मचाऱ्यांनी एकत्र येत बस डेपोत लावून पोलीस स्टेशन समोर ही आंदोलन केले. यामुळे शहरातील स्मार्ट सिटी बसच्या बस स्थानकावर प्रवाशांकना ताटकळत उभे राहिल्याचे चित्र बघायला मिळाले. वृत्त येईपर्यंत शहरातील स्मार्ट सिटी बस सेवा पूर्णतः बंद होती.

# जम्मू-काश्मीर सरकारचा शपथविधी १६ तारखेला

श्रीनगर, १२ ऑक्टोबर : जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्सचे नेते उमर अब्दुल्ला आगामी १६ ऑक्टोबरला मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. उमर अब्दुल्ला यांनी शुक्रवारी राजभवनात जाऊन नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांची भेट घेत सरकार स्थापनेचा दावा केला होता. जम्मू काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीचे सरकारच्या मुख्यमंत्रीपदाची धुरा ओमर अब्दुल्ला यांच्यावर सोपविण्यात आली आहे. १६ ऑक्टोबरला ते मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. ते दुसर्यांदा मुख्यमंत्रीपदाची जबाबदारी स्वीकारतील. यापूर्वी २००९ ते २०१४ या कालावधीत त्यांनी मुख्यमंत्रीपद भूषवले होते. ओमर अब्दुल्ला यांच्या शपथविधी सोहळ्याला अनेक महत्त्वाचे नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस आघाडीने शुक्रवारी जम्मू-काश्मीरमध्ये सरकार स्थापनेचा दावा केला.काँग्रेसने एनसी उपाध्यक्षांना पाठिंबा दिल्यानंतर काही तासांनंतर अब्दुल्ला यांनी युतीच्या भागीदारांच्या वतीने समर्थनाची पत्रे सादर केली. तत्पूर्वी ओमर अब्दुला यांची गुरुवारी नॅशनल कॉन्फरन्सच्या विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी एकमताने निवड करण्यात आली होती. जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीत एनसीने ९० पैकी ४२ जागा पटकावल्या आहेत. तर काँग्रेसच्या ६ आमदारांसह ४ अपक्ष आणि आम आदमी पार्टीच्या एका आमदाराने एनसीला समर्थन जाहीर केले आहे.

# कार कालव्यात कोसळून ८ जणांचा मृत्यू

कैथल, १२ ऑक्टोबर : हरियाणाच्या कैथलमध्ये आज, शनिवारी कार कालव्यात कोसळून झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील ८ जणांचा मृत्यू झाला. चालकाचे वाहनांवरील नियंत्रण सुटल्यामुळे हा अपघात झाला असून घटनेच्या वेळी कारमध्ये ९ जण बसले होते. अपघातग्रस्त लोक दसऱ्यानिमित्त आयोजित बाबा राजपुरी जत्रेला ते जात होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार मुंदरी गावाजवळील कालव्यात पडली. चालक थोडक्यात बचावला. मात्र वाहनातील इतर ८ जण बुडाले आहेत. कोमल नावाची १२ वर्षांची मुलगी बेपत्ता असून तिचा शोध आहे. या अपघातात सतविंदर (५०), चमेली (६५), तीजो (४५), फिजा (१६), वंदना (१०), रिया (१०) आणि रमणदीप (६) यांचा मृत्यू झाला असून हे सर्व कैथलमधील डीग गावचे रहिवासी होते. घरातील सर्व सदस्य जत्रा पाहण्यासाठी जात होते. कैथलमधील या दुर्घटनेवर पंतप्रधान मोदींनी शोक व्यक्त केला आहे. ट्विटरवर पोस्ट करताना लिहिलं की, हरियाणातील कैथलमधील अपघात हृदयद्रावक आहे. राज्य सरकारच्या देखरेखीखाली स्थानिक प्रशासन घटनास्थळी सर्वतोपरी मदत करण्यात व्यस्त आहे. हरियाणाच्या मुख्यमंत्र्यांनीही याबाबत ट्विट केले आहे.

# बागमती एक्स्पेस अपघात : एनआयएकडून घटनास्थळाची पाहणी



चेन्नई, १२ ऑक्टोबर : कर्नाटकच्या म्हैसूरहून बिहारच्या दरभंगा येथे जाणाऱ्या बागमती एक्स्प्रेसला शुक्रवारीरात्री तामिळनाडूच्या कावराईपट्टूईनजीक भीषण अपघात झाला. बागमती एक्स्प्रेस आणि मालगाडी यांची टक्कर झाल्यामुळे ही दुर्घटना घडली होती. दरम्यान राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या (एनआयए) पथकाने आज, शनिवारी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. यासंदर्भात दक्षिण रेल्वेचे महाप्रबंधनक आर. एन. सिंह यांनी सांगितले की, रेल्वेला कावरपेट्टई स्टेशनवर थांबायचे नव्हते. चेन्नईहून रवाना झाल्यानंतर रेल्वेला हिरवा झेंडा दाखवण्यात आला होता. ड्रायव्हर सिग्नलचा योग्य पद्धतीने पालन करत होता. मात्र रेल्वे मुख्य लाईन सोडून लूप लाईनवर गेली. या चुकीमुळे हा अपघात घडला. या अपघातात १९ जण जखमी झाले आहे. रेल्वेने या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. सिंह म्हणाले की, या अपघातामध्ये कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

# जिल्ह्यातील शाळा, अंगणवाडी मधील बालकांची नियमित तपासणी करा

## जिल्हा परिषदेचे सीईओ विकास मीना यांचे आदेश



छत्रपती संभाजीनगर : जिल्ह्यातील शाळा व अंगणवाडी मधील बालकांच्या नियमित तपासणी करण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी दिल्या.

वेरूळ सभागृहात जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभाग व जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाच्या वतीने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीचे आयोजन करण्यात आले होते या बैठकीसाठी ठइड्घच्या वैद्यकीय अधिकारी यांना बोलविण्यात आलेले होते.

शाळा व अंगणवाडी मधील बालकांची नियमित तपासणी करणे, तीन महिने सहा महिन्याच्या बालकांची हिमोग्लोबिन व इतर कमतरता बाबत तपासणी करून योग्य ते उपचार करणे, शाळा व अंगणवाडी मधील बालकांचे सर्दी, ताप, खोकला व दंत तपासणी करण्याच्या सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक विकास मीना यांनी दिल्या. तालुका सिल्लोड, पैठण, सोयगाव व कन्नड या तालुक्यात बालकांच्या तपासणीचे प्रमाण कमी असल्याने वैद्यकीय अधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी व शिक्षणाधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करून तपासणीचा वेग वाढविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. या कामात आशा वर्कर अंगणवाडी सेविका यांचे मदत घेण्याचे त्यांनी सांगितले. बैठकीला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत बडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण सुवर्णा जाधव, जिल्हा समन्वयक विकास मेश्राम व वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते

# रा. स्व. संघाचे अहिल्यानगर शहररात पथ संचलन व शस्त्र पूजन



नगर - विजयादशमी उत्सवा निमित्त अहिल्यानगर शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने शहरातील ५ विविध भागांमध्ये संचलन व शस्त्र पूजन झाले. यामध्ये सहभागी स्वयंसेवक संघाच्या संपूर्ण गणवेशात हातात दंड घेवून सहभागी झाले होते. यामध्ये सहभागी असलेल्या संघाच्या घोष पथकातील विविध वाद्यांच्या तालावर हे संचालन शिस्तबद्धपणे मार्गस्त झाले. यावेळी मोठ्यासंख्येने स्वयंसेवक व नागरिक सहभागी झाले होते.

शहरात आगरकरमळा भागात सकळी साडेआठ वाजता, बोल्हेगाव भागात सकाळी ७ वाजता, मध्य नगर भागात सकाळी साडेसात वाजता, भिंगार व पाईप लाईन रोड भागात दुपारी साडेतीन सघोष पथसंचालन झाले. या संचालनाचे शहरातल नागरिकांनी ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत केले.

आगरकर मळा येथे संचलनानंतर झालेल्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते पुण्याचे विधीज्ञ योगेश्वर घोगले यांनी मार्गदर्शन केले तर प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ तुरुंग अधिकारी चंद्रकांत जठार उपस्थित होते. बोल्हेगाव येथे झालेल्या उत्सवात ओम शिवगोरक्ष योगी अस्थानचे नाथभक्त अशोकभाऊ प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संघाचे नगर दक्षिण जिल्हा सहकार्य दिनेश करंडे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. भिंगार येथे झालेल्या विजयादशमी उत्सवात छावणी परिषदेच्या बाबासाहेब आंबेडकर प्रशालेचे मुख्याध्यापक संजय शिंदे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर संघाचे नगर दक्षिण जिल्हा प्रचारक दीपक पारेकर प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित. दादा चौधरी विद्यालय येथे झालेल्या कार्यक्रमास संघाचे नगर दक्षिण जिल्हा सेवा प्रमुख डॉ. कृष्णा देहाडराय यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले तर लेखक व दिग्दर्शक अभिजीत दळवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. गंगा उद्यान येथे झालेल्या कार्यक्रमात आयकर कायदे तज्ञ सीए. प्रसाद भंडारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर विद्या भारतीचे प्रांत सहमंत्री दादासाहेब काजळे यांनी प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन केले.

# छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्हाभरात विविध ठिकाणी रा. स्व. संघाचे पथ संचलन



छत्रपती संभाजीनगर : सालाबाद प्रमाणे या ही वर्षी, छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्हाभरात विविध ठिकाणी विजयादशमी निमित्ताने रा. स्व. संघाचे पथ संचलन काढण्यात आले. देशपातळीवर इ. स.१९२६ पासून तर मराठवाड्यात, निजामशाहीच्या गुलामगिरीचे साखळदंड तुटल्यानंतर इ. स. १९५३ पासून असामाजिक तत्वावर जरब बसवण्यासाठी हिंदू एकता आणि ताकतीचे प्रदर्शन करत संघाचे पथ संचलन नियमितपणे निघत असते. छ. संभाजीनगर शहरात विविध भागात तसेच ग्रामीण जिल्ह्यात सर्वच तालुका स्थानासह निमशहरी, ग्रामीण भागात ही अनेक ठिकाणी विजयादशमी निमित्ताने रा. स्व. संघाचे पथ संचलन काढण्यात आले. छ. संभाजीनगर शहरात विविध भागात तसेच ग्रामीण जिल्हात सर्वच तालुका स्थानी मुख्य बाजार पेठेतील रस्त्याने मार्गाक्रमण करत संघ संचलन आपल्या इच्छित स्थळी जात असतांना परिसरातील नागरिकांनी संचलन मार्गांवर सडा, रांगोळीसह पुष्पवृष्टी करत संचलन बघण्यासाठी मोठी गर्दी केली होती. विविध ठिकाणी लाभलेल्या प्रमुख पाहुन्यांनी संघाचे सामाजिक, सांस्कृतिक सेवा प्रकल्प, शैक्षणिक उपक्रम, सामाजिक समरसतेचे उपक्रम, राष्ट्र प्रथम, या सारख्या संघ गुण वैशिष्ट्यांचा आपल्या भाषणात उल्लेख करत, वर्धिष्णू शक्तीसह वाटचाल करणाऱ्या संघ कामात जास्तीत जास्त लोकांनी सहभागी व्हावे, यासाठी उपस्थितांना आव्हान ही केले. त्याच बरोबर संघाच्या भविष्यकालीन कामास शुभेच्छा ही दिल्या. तसेच विविध ठिकाणी लाभलेल्या वक्त्यांनी आपल्या बौद्धिकात संघ स्थापनेची पार्श्वभूमि, संघाचा संघर्षमय प्रवास, संघाचे आगामी कार्यक्रम, संघाच्या सहा उत्सवाचे महत्त्व, विजया दशमी निमित्ताने हिंदू समाजाने करावयाची शक्ती उपासना आणि त्यातून निर्माण होणारे बलशाली राष्ट्र या सारख्या मुद्यावर जोर दिला. छ. संभाजीनगर शहरासह ग्रामीण भागात

विविध ठिकाणी झालेल्या पथ संचलना नंतरच्या कार्यक्रमास डॉ. पांडुरंग वटमवार, गजानन चव्हाण, डॉ. धीरज कोटेचा, श्री दिलीप गौर,श्री शेखर देसरडा, डॉ. आनंद देवधर, डॉ. शिवाजी सुक्रे, श्री शेखर खोले, संजय गंगापूरवाला, डॉ अश्विन जोशी, महेश नावंदर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर विविध ठिकाणी कार्यक्रमास श्री प्रसन्नाकुमार बोठे, श्री विशाल दरगड, श्री संजय गायकवाड, श्री श्रीराम पांडे, श्री धनंजय धामणे, श्री संतोष पाठक, उपेंद्र कुलकर्णी, श्री राहुल देशपांडे,श्री रुपेश बंगाले, श्री दिवाकर कुलकर्णी, श्री प्रेम खडकीकर, श्री डॉ सुभाष शेळके, श्री डॉ. संदीप डफळे हे वक्ते म्हणून उपस्थित होते.

सर्वच ठिकाणी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शस्त्र पूजन होऊन त्यानंतर प्रमुख पाहुणे आणि वक्ते यांनी मनोगत व्यक्त करत संघ प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली. छ. संभाजीनगर शहरासह जिल्ह्याभरात साधारणपणे ३२५० एवढ्या स्वयंसेवकांनी पथ संचालनात सहभाग नोंदवाला.

# किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीने पुण्यात त्यांचे दुसरे खास शोरूम सुरु केले

## देशभरात आपले ४६ वे खास शोरूम सुरू केले



पुणे - किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरी, पुण्यातील विमान नगर, फिनिक्स मार्केट सिटी येथे त्यांच्या दुसऱ्या खास शोरूमच्या भव्य उद्घाटनाची घोषणा करताना आनंद होत आहे. किसनाचे हे देशभरातील ४६ वे खास शोरूम आहे. उद्घाटन समारंभाला श्री घनश्याम ढोलकिया, संस्थापक आणि एमडी, हरी कृष्ण ग्रुप आणि श्री पराग शाह, संचालक, किसना डायमंड आणि गोल्ड ज्वेलरी उपस्थित होते.

भव्य उद्घाटन साजरे करण्यासाठी, किसना हिऱ्यांच्या दागिन्यांवर १००% पर्यंत सूट देत आहे. उत्साहात भर घालत, किसनाची नाऊ टाईम शॉप फॉर यु अँड विन अ कार मोहीम ग्राहकांना १०० हून अधिक कार जिंकण्याची संधी देत आहे. २०,००० रुपये किंवा त्याहून अधिक किमतीचे डायमंड, प्लॅटिनम किंवा सॉलिटेअर ज्वेलरी किंवा ५०,००० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने खरेदी करून सहभागी व्हा. लॉन्च बद्दल भाष्य करताना, श्री घनश्याम ढोलकिया, संस्थापक आणि एमडी, हरी कृष्ण ग्रुप म्हणाले, आम्हाला हे जाहीर करताना आनंद होत आहे की, पुण्यातील विमान नगरचे नवीन शोरूम आता खुले झाले आहे, जे दागिन्यांची विस्तृत श्रेणी ऑफर करत आहे, ज्यामध्ये हे देखील समाविष्ट आहे. उत्सवाचे संग्रह जे हंगामातील जादू आणि अभिजातता प्रतिबिंबित करतात. हा विस्तार आमच्या 'किस्ना हर घर' च्या व्हिजनच्या अनुषंगाने आहे, जिथे आम्ही भारतातील सर्वात वेगाने वाढणारा ज्वेलरी ब्रँड बनण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, जे प्रत्येक महिलेचे हिऱ्यांचे दागिने बाळगण्याचे स्वप्न पूर्ण करेल. किसना डायमंड अँड गोल्ड ज्वेलरीचे संचालक श्री पराग शाह म्हणाले, विमान नगर हे एक दोलायमान रिटेल हब आहे. या विशेष शोरूममध्ये वधू, समकालीन आणि दैनंदिन परिधान केलेल्या दागिन्यांचा समावेश आहे.

नवीन लॉन्च झालेले किसना शोरूम त्यांच्या जवळील सोन्याचे आणि हिऱ्यांचे दागिने शोधत असलेल्या प्रत्येकासाठी पसंतीचे ठिकाण बनण्याचे वचन देते, शोरूम प्रत्येक शैलीला अनुरूप अशी विस्तृत श्रेणी ऑफर करते.

# धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त सार्वाजनिक जयती उत्सव समिती जितूरच्या वतिने महावदनेचा कार्यक्रम आयोजित

जिंतूर : असोका विजया दसमी अर्थात धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त सार्वाजनिक जयती उत्सव समिती जितूरच्या वतिने महावदनेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष आयु. शरदभाऊ चव्हाण याच्या हस्ते ध्वजारोहन झाले. सार्वजनिक जयती उत्सव समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी यानी तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबसाहेब आबेडकर याच्या हस्ते प्रतिमेचे पुजनानतर बौद्धाचार्य शिवाजी लाटे सर व बौद्धाचार्य गणेशराव खिल्लारे सर यानी उपस्थितिताना मराठित पचशिल दिले. आयु. रत्नदीप शेजावळे, आशाताई खिल्लारे, आयु. रामराव उबाळे साहेब व आयु. सावत सर व प्रेक्षाताई भाबळे यानी उपस्थिताना मार्गदर्शन केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जयती समितिचे अध्यक्ष अक्षय भाऊ सुर्यवशी, भारतिय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष मोहनभाऊ घनसावध तसेच समता सैनिक दलाचे प्रमुख महेद्र बनसोडे साहेब यानी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसचालन व आभार प्रदर्शन गायक अशोकराव वाकळे यानी केले. कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात धम्मबाधव उपस्थित होते.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.१६०९/२०२४

अर्जदार : १) शेख रऊफ शेख विवन, वय ५९ वर्षे, धंदा मजुरी, रा. गल्ली न.१३, हशमत ए मस्जिद जवळ रहिम नगर छत्रपती संभाजीनगर २) उस्मान बिबन शेख, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी, रा. मु.पो. ब्रिजवाडी ता. जि. छत्रपती संभाजीनगर ३) शेख साजिद बिबन (मनियार), वय ४४ वर्षे, धंदा. मजुरी, रा. रांजणगाव शें. पु. ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सईदाबी भ्र. हबीब शेख, वय ५१ वर्षे धंदा मजुरी रा. रांजणगाव शे.पु ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण :- हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.ए. पारधे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची बहिण आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे शेख बिबन शेख नूर हे रोशनगेट छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक २२/०२/१९८८ रोजी मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र.१ ते ३ यांची आई नामे हमीदाबी शेख बिबन ह्या दिनांक २२/०५/२०१८ रोजी मयत झालेल्या आहे. मयत शेख बिबन शेख नुर यांना अर्जदार क्र.१. ते ४ हेच कायदेशीर वारसदार त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणत्र मिळणे कामी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्तीनंतरचा आक्षेप - उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ११/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय छत्रपती संभाजीनगर

## जाहीर प्रगटन

**कन्नड येथिल (मे. आवटी मॅडम) दिवाणी न्यायाधीश साहेब क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. २५०/२०२४

अर्जदार - १. पार्वताबाई भ. कचरू शहरे वय ४९ धंदा- मजुरी २. कचरू पि.रामलाल शहरे वय-५४ धंदा मजुरी दोघेही रा. गु. पो. जैतखेडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : १. महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद २. पुजा भ्र.संतोष शहरे वय-२४ धंदा-मजुरी रा.-मु. पो. जैतखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद गैरअर्जदार क. २ स्वतःसाठी व गैरअर्जदार क. ३ तर्फे अ.पा. क. जनक आई ३. चि. दिव्यांश पि.संतोष शहरे वय-०३ वर्ष धंदा-काहीनाही रा. सदर

अर्ज- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

...ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड, यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ व २ यांचा मुलगा व गैरअर्जदार क. २ चे पती व गैरअर्जदार क. ३ चे वडील मयत नामे संतोष पि. कचरू शहरे यांचा मृत्यु दि. २३/०८/२०२४ रोजी मौजे जैतखेडा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ व २ तसेच गैरअर्जदार क. २ व ३ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. अर्जदार हिस शासकीय व निमशासकिय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्र मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

......त्याअर्थी सदरहू जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार व गैरअर्जदार क. २ व ३ हे मयत संतोष कचरू शहरे यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच अर्जदार यांस शासकीय निमशासकीय कामकाजासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार अर्जदाराच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप गाहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. ११/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्कयानिशी दिले आहे

दि.११/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक | सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ४३९/२०२८

अर्जदार: १. लक्ष्मीबाई कैलास जाधव, वय ५३ वर्ष धंदा. शेती २. राजू कैलास जाधव, वय ३३ वर्ष धंदा. शेती १ व २ रा. जिकठाण ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ३. पूजा बन्सी मेगवाल, वय.२६ वर्ष धंदा. शेती रा. एस.बी.बाय. बँक मागे, शिवाजी चौक, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. भारती कैलास जाधव, वय.२७ वर्ष धंदा. शेती रा. वारूला मारूती जवळ, नालेगांव, अहमदनगर, ता.जि. अहमदनगर

-: विरूद्ध :-

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, नं. १ चे पति व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल नामे कल्याण उर्फ कैलास कचरू जाधव हे दि. २६/०३/२०१७ रोजी मौजे सुलतानपूर ता. गंगापूर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत कल्याण उर्फ कैलास कचरू जाधव यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत कल्याण उर्फ कैलास कचरू जाधव यांचे वारस प्रमाणपत्राची अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत कल्याण उर्फ कैलास कचरू जाधव यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत याः न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्द्वीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत कल्याण उर्फ कैलास कचरू जाधव यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्ती नंतर येणार अक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# नांदेडात आज महिला सशक्तिकरण अभियान मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

महिला सक्षमीकरणाचा नांदेड जिल्हयाचा महिला आनंद मेळावा आज रविवार १३ ऑक्टोबरला होणार आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी आज यासंदर्भात आढावा बैठक घेऊन सर्व जिल्ह्यातील यंत्रणेला सतर्क केले. यापूर्वी ठरल्याप्रमाणे कार्यक्रम होणार असून मोठ्या संख्येने महिला भगिनींनी उपस्थित राहण्याचे आवाहन त्यांनी केले.

उद्योगपती पद्मविभूषण रतन टाटा यांचे ९ ऑक्टोबरला निधन झाले त्यामुळे राज्य शासनाने १० ऑक्टोबरला एक दिवसाचा दुखवटा जाहीर केला होता. त्यामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता. आता १३ ऑक्टोबरला रविवारी दुपारी ११ ते सायंकाळी ५ या दरम्यान हा कार्यक्रम होणार आहे. दुपारी २ नंतर मुख्यमंत्री व मान्यवर उपस्थित महिला भगिनींशी, नागरिकांशी संवाद साधणार आहेत.

मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियानांतर्गत होणाऱ्या या कार्यक्रमांमध्ये जिल्ह्यातील हजारो महिला सहभागी होणार असून प्रशासन या दृष्टीने तयारीला लागले आहे.

राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाचे हे आयोजन आहे. मुख्यमंत्री महिला सशक्तिकरण अभियान सुरू केले असून या संकल्पनेतून सर्व जिल्ह्यांमध्ये राज्य शासनाच्या पथदर्शी योजनांमधील लाभार्थ्यांची संवाद साधने व त्यांना प्रत्यक्ष या योजनाचा कार्यक्रमांमध्ये लाभ देणे सुरू आहे.

जिल्ह्यातील मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांना या कार्यक्रमाला आमंत्रित करण्यात आले आहे. त्यामुळे हजारोच्या संख्येने महिला या ठिकाणी उपस्थित राहणार आहे. याशिवाय मुख्यमंत्री युवा कार्यक्रम प्रशिक्षण योजना, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, मुख्यमंत्री मोफत उच्च शिक्षण योजना, मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना, मुख्यमंत्री वयोश्री योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने या ठिकाणी उपस्थित राहणार आहे. जिल्हा प्रशासन या मोठ्या कार्यक्रमाच्या तयारीला लागले आहे.

# ॲड. उदय बडगे यांचा राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**



सर्वसामान्याच्या न्याय हक्कासाठी लढा देणारे अष्टपैलू व्यक्तिमत्व कमी कालावधीत आपल्या कार्याचा ठसा उमटविलेले ॲड. उदय बडगे यांच्या सामाजिक व विधी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन मान नेतृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला आहे.

मायडी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेकडून विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विभूतींना राज्यस्तरीय मान नेतृत्वाचा सन्मान कर्तत्वाचा पुरस्काराने गौरविण्यात येते. विधि क्षेत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी अविश्रांत परिश्रम करणारे दांडगा जनसंपर्क, असलेले अष्टपैलू व्यक्तिमत्व विधीज्ञ ड. उदय बडगे यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. सदर पुरस्काराचे वितरण भव्य जाहीर कार्यक्रमांमध्ये २९ सप्टेंबर रोजी होणार होते. परंतु ड. उदय बडगे त्यादिवशी उपलब्ध नसल्यामुळे मायडी बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष साप्ताहिक नंदगिरीचा कानोसाचे संपादक मारुती शिकारे व दैनिक वीर शिरोमणीचे संपादक ज्येष्ठ पत्रकार शंकरसिंह ठाकूर यांनी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर ड. बडगे यांच्या कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष भेटून मानपत्र व बोधचिन्हासह पुरस्कार सन्मानाने प्रदान केला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार ड. रमेश माने, विनायक कामठेकर, शुभमसिंह ठाकुर, करण मोटे यांची उपस्थिती होती. सर्वसामान्यांना न्याय देण्यासाठी निष्काम पुणे करीत असलेल्या प्रयत्नशील असल्याने केलेल्या कार्याची पावती मिळाली या शब्दांमध्ये ॲड. उदय बडगे यांनी आभार व्यक्त करीत आयुष्यभर कोणत्याही मोठ्या लाभाची अपेक्षा न करता सेवारत राहणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नांदेड दौरा

**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर** - महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे. रविवार १३ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई येथून शासकीय विमानाने २.१५ वाजता नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने नवा मोंढा मैदानाकडे प्रयाण. दुपारी २.३० वाजता महिला सशक्तीकरण अभियानातंर्गत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा प्रचार व प्रसार कार्यक्रम व आमदार बालाजी कल्याणकर यांच्या मतदार संघातील विविध विकास कामांचे ऑनलाईन भूमीपुजन. स्थळ- नवा मोंढा मैदान नांदेड. सायं. ४.३० वाजता मोटारीने नांदेड विमानतळाकडे प्रयाण. सायं ४.४५ वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व शासकीय विमानाने नागपूरकडे ते प्रयाण करतील.

## संतोष जुवेकरचा खतरनाक 'रानटी'अंदाज

छत्रपती संभाजीनगर - सिनेमांतल्या भूमिकांसाठी कलाकार काय-काय करत असतात. एखादं दृश्य खरं वाटावं यासाठी जीव ओतून मेहनत घेतात. काही कलाकार चित्रपटातील आपल्या कॅरेक्टरला योग्य न्याय देण्यासाठी कोणत्याही प्रकारची मेहनत किंवा रिस्क घ्यायला मागे पुढे पहात नाहीत. मराठीसोबतच हिंदीतही सक्रीय असणारा महाराष्ट्राचा लाडका अभिनेता संतोष जुवेकर याबाबतीत नेहमी आघाडीवर असतो. आगामी 'रानटी' चित्रपटात शरद केळकरच्या बालपणीच्या जिगरी मित्राची 'बाळा'ची भूमिका साकारणाऱ्या संतोषने आपल्या भूमिकेसाठी चक्क संपूर्ण केसांचे टक्कल करून घेत तसेच पायाने अपंग व्यक्तिरेखा साकारण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे.

# ऐण विधानसभा निवडणुकीचा तोंडावर तालुका अध्यक्षांना डिच्चू!

## आम आदमी पार्टी जिल्हाध्यक्ष सुभाष निकम यांचा प्रताप?

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) ऐण निवडणुकीच्या तोंडावर आम आदमी पार्टीतील तळा-गळात जाऊन काम करणाऱ्या कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना जाणीवपूर्वक डावलून अशा कार्यकर्त्यांना निवडणुकीत सहभाग व निवडणुकीच्या प्रक्रियेपासून दूर ठेवण्याचा खेळ नेहमीच खेळला जात असल्याचे बोलले जात असून नुकत्याच येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तालुका अध्यक्षांना कुठलीही नोटीस अथवा त्यांचे म्हणणे ऐकून न घेता त्यांना पदमुक्त करण्यासाठी दुसऱ्याची तालुकाध्यक्षपदी निवड करून तळा-गळात जाऊन काम करणाऱ्या खंद्या कार्यकर्त्यांना डिच्चू देण्यात आला असल्याचे दिसून येत आहे.



> **संभाजीनगर जिल्हाध्यक्षांनी तालुका अध्यक्ष बदलण्यात आला असल्या बाबत माहीत नही परंतू तालुका अध्यक्ष नियुक्त असताना दुसऱ्याची नव नियुक्ती करणे चुकीचे आहे.**
> **- धनंजय शिंदे आप प्रदेश सचिव**

आम आदमी पार्टी जिल्हा अध्यक्ष पदावर असताना लोकसभेची निवडणूक सुरू होताच आम आदमी पार्टी जिल्हा अध्यक्ष पदावर पुन:नियुक्तीचे पत्र प्राप्त करून जिल्हातील खंदे कार्यकर्ते व पदाधिकारी यांना लोकसभा निवडणूक प्रचार प्रक्रियेपासून डावलण्यासाठी जिल्हा अध्यक्ष सुभाष निकम यांनी डाव खेळला असल्याची चर्चा आहे त्यावेळेस नाराज कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी प्रदेश कार्यकारणीकडे त्याबाबत गराणे मांडले असता जिल्हाध्यक्षाच्या पुनर्नियुक्तीमुळे कोणाचेही पद बरखास्त किंवा नवनियुक्तीचा कुठलाही प्रश्न उद्भवणार नसल्याचे आश्वासन वरिष्ठांकडून मिळाल्यामुळे लोकसभेच्या तोंडावर आम आदमी पार्टी पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्यात उद्भवणारा वाद निवाळला होता.

परंतु आता पुन्हाः विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तालुकाध्यक्ष यांना डीच्चू देण्याचा खेळ जिल्हा अध्यक्ष सुभाष निकम यांच्याकडून खेळला जात असल्याने आम आदमी पार्टीत वाद निर्माण होताना दिसून येत आहे. त्याबाबत आपचे प्रदेश सचिव धनंजय शिंदे यांना फोनवरून विचारणा केली असता जिल्हाध्यक्षांनी केलेली कार्यवाही आम्हाला माहीत नसून नियुक्त असलेल्या तालुकाध्यक्षांना पदावरून हटवणे चुकीचे असून नियुक्त तालुकाध्यक्षांना पदावरून हटवता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

ज्या तालुक्यात आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष नाही त्या तालुक्यात तालुका अध्यक्ष यांची निवड करून पार्टी वाढवण्याचे कुठलेच काम जिल्हाध्यक्ष सुभाष निकम यांच्याकडून करण्यात आलेले नाही परंतु ज्या तालुक्यात तालुकाध्यक्ष नियुक्त आहे आणि त्यांचे काम तळा -गळापर्यंत जाऊन पार्टी व केजरीवालांचे विचारांचा प्रचार प्रसार करून आम आदमी पार्टीसाठी अहोरात्र झटणाऱ्या तालुकाध्यक्षांना डिच्चू देण्यात आला असल्याने आम आदमी पार्टी जिल्हा अध्यक्ष सुभाष निकम यांच्या मनसुभेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# पैठणला धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त रॅली

तभा वृत्तसेवा

पैठण दि १२ : धम्मचक्र प्रवर्तन दिननिमित्त पैठण शहरातून डॉ. आंबेडकर चौक पावर हाऊस ते डॉ बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत धम्म रॅली काढण्यात आली होती. या धम्म रॅलीत प्रचंड संख्येने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनुयायी यांनी उस्फुर्त प्रतिसाद देत रॅलीत सहभागी झाले. या रॅली मधे अबाल वृद्धांसह महिलांनी सहभाग नोंदवला.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात भंते याच्या कडून उपस्थितांनी पंचशील ग्रहण केले. त्यानं नंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष बाबासाहेब अडसूळ यांनी उपस्थित भीम अनुयायी याच्या समोर पुतळा परिसर मधे कोणीही कोणतीही जाहिरात बाजी करू नये, कुठलाही कोणत्याही पक्षाचा बॅनर न लावण्याचा ठराव उपस्थित जनसमुदाय समोर ठेवला. व तो ठराव सर्वानुमते परित करण्यात आला. यावेळी समितीचे अध्यक्ष बाबासाहेब अडसूळ, माजी नगराध्यक्ष राजू गायकवाड, अरुण बल्लाळ, स्वप्नील साळवे, प्रकाश निकाळजे, सोमनाथ निकाळजे, गौतम बनकर, महेंद्र साळवे, भास्कर दाभाडे, सुमित मगरे, आकाश पगारे, विनोद सरोदे, सोमनाथ अडसूळ, प्रथमेश बोर्ड, भारत आठवले, गौरव आठवले, अशोक पगारे, अजित पगारे, डॉ.पंडित किल्लारिकर आदींसह भीम अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नात्यांमधील विश्वास, एकत्र कुटुंबपद्धती आनंदी वैवाहिक जीवनासाठी पूरक

## डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांचे मत; 'ब्रह्मसखी'तर्फे ब्राह्मण उपवधू-वरांचा 'प्रत्यक्ष संवाद'

छत्रपती संभाजीनगर : केवळ सौंदर्य, चांगले वेतन किंवा श्रीमंती नव्हे, तर नात्यांमधील विश्वास, सुसंस्कृतपणा आणि एकत्र कुटुंबपद्धती आनंदी वैवाहिक जीवनासाठी पूरक असते. एकमेकांना सांभाळून घेत, मने जुळली, तर पती-पत्नीचे नाते घट्ट होते. दोघांनीही एकमेकांचा सन्मान करत नाते, करिअर फुलवण्यासाठी प्रोत्साहन द्यावे, असे मत युरोकूल हॉस्पिटलच्या संचालिका, प्रसिद्ध लॅप्रोस्कोपिक तज्ज्ञ डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी यांनी व्यक्त केले.



**लग्नाळूंना सुखावणारा प्रत्यक्ष संवाद**

**सनई-सतारीचा मधुर नाद... वयोगटानुसार बसलेले उपवधू-वर... त्यांच्यात चाललेला प्रत्यक्ष संवाद... आपल्या आवडीनिवडींची, अपेक्षांची केलेली चर्चा... त्यातून एकमेकांची झालेली पसंती... सख्याला सखी अन सखीला सखा मिळण्याचा हा अनोखा उपक्रम रविवारी पुण्यात अनुभवायला मिळाला. ब्रह्मसखीच्या प्रत्यक्ष संवाद कार्यक्रमात लग्नाळू मुलामुलींचा हा माहोल सुखावणारा होता.**

येथील ब्रह्मसखी ब्राह्मण महिला वधुवर मंडळातर्फे खास उपवधू-वरांसाठी पुणे येथे 'प्रत्यक्ष संवाद' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. पुण्यातील कर्वे नगर येथील घरकुल लॉन्समध्ये झालेल्या कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी व 'देणे समाजाचे' संस्थेच्या प्रमुख वीणा गोखले यांच्या हस्ते झाले. प्रसंगी 'ब्रह्मसखी'च्या संचालिका नंदिनी ओपलकर, गीता सराफ, ज्योती कानोले, तृप्ती कुलकर्णी उपस्थित होत्या. ३५० मुले व १४० मुली असे ४९० विवाहेच्छूक वधू-वर यामध्ये सहभागी झाले होते.

डॉ. ज्योत्स्ना कुलकर्णी म्हणाल्या, विवाहावेळी सांसारिक जीवनाच्या कल्पना स्पष्ट असाव्यात. योग्य वयात विवाह, अपत्य आणि त्यांचे नेटके संगोपन व्हायला हवे. अलीकडे मूल होऊ न देण्याचे, घटस्फोटाचे प्रमाण वाढले असून, ही चिंतेची बाब आहे. सासू-सासऱ्यांना आईवडिलांप्रमाणे मानून त्यांच्या मनात जागा केली, तर संसार सुखाचा होतो. घरात आजी-आजोबा असतील, तर कुटुंब सुखी राहते. सुखदुःखात आपली माणसे उपयोगी येतात. त्यामुळे वेगळे राहण्याचा विचार करू नये.

वीणा गोखले म्हणाल्या, ब्रम्हसखी समाजासाठी काम करतेय याचा आनंद आहे. तरुण वयातील मुलामुलींचे विवाह होणे अवघड होत चालले आहे. अशावेळी लग्नाळू मुलामुलींना समोरासमोर आणून आपला जीवनसाथी निवडण्याची संधी देण्याचा उपक्रम स्तुत्य आहे. लग्नानंतर दोघांनीही घरात 'सपोर्ट सिस्टीम' उभारावी. उतारवयात 'शेअरिंग, केअरिंग'साठी अनेकांना जोडीदार हवा असतो. तेव्हा पन्नाशीनंतरच्या एकल लोकांसाठीही पुढाकार घ्यावा.

नंदिनी ओपळकर म्हणाल्या, वधू-वरांसाठी ब्रह्मसखीच्या वतीने वैविध्यपूर्ण उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर व पुणे येथे राबविले जात आहेत. 'प्रत्यक्ष संवाद' सारख्या उपक्रमातून इच्छूक मुलामुलींना परस्पर संवादाची व त्यातून जोडीदार निवडण्याची संधी मिळेल.अस्मिता पांडे यांनी सूत्रसंचालन केले. तृप्ती कुलकर्णी आणि ज्योती कानोले गीता सराफ यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

# मकरंद अनासपुरेंचा दिवाळीनंतरचा नवरंगी धमाका

## दसर्याला 'मुषक आख्यान'चे पोस्टर लाँच



मुंबई : अभिनेता मकरंद अनासपुरे नेहमीच काही नवे देत असतात. 'राजकारण गेलं मिशीत' या धमाल चित्रपटानंतर यावेळी 'मुषक आख्यान' या त्यांनीच दिग्दर्शित केलेल्या चित्रपटात त्यांनी नऊ रंगाच्या अन् ढंगाच्या नऊ वेगवेगळ्या भूमिका साकारलेल्या आहेत. मराठीत हा प्रयोग पहिल्यांदाच होतो आहे. हा चित्रपट दिवाळीनंतर ८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे.

या चित्रपटाच्या पोस्टर लाँच आणि टीझर रीलीजचा सोहळा सिद्धीविनायक मंदिरात दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर सिद्ध होतो आहे.

'देशमाने डिजी व्हिजन'द्वारे प्रस्तुत या चित्रपटाची निर्मिती सुरेश पठारे, मच्छिंद्र लंके, शिल्पा अनासपुरे, त्रिशला देशमाने यांनी केली आहे. मकरंद अनासपुरे यांच्या नऊ भूमिका अत्यंत सहजपणे कथेत गुंफल्या आहेत चित्रपटाचे लेखक हेमंत एदलाबादकर यांनी. छाया दिग्दर्शन सुप्रसिद्ध छायाचित्र दिग्दर्शक सुरेश देशमाने यांचे आहे. हर्षदा पोरे कल्लुरकर यांनी लिहिलेल्या गीतांना अतुल दिवे यांनी संगीतबद्ध केले आहे. गायिका वैशाली सामंत यांच्या आवाजातील गाणी खूपच श्रवणीय झाली आहेत. लावणी हे आकर्षण असणार आहे. सुप्रसिद्ध लावणी नृत्यांगना गौतमी पाटील या चित्रपटात आकर्षक भुमिकेत दिसणार आहे.

संकलन- अनंत कामत, पार्श्वसंगीत - अभिजित हेगडे, तऱ्ह्द - अरविंद हतनुरकर, साउंड डिझाईन- मयूर वैद्य, सह छाया- जगदिश देशमाने यांचे आहे. चित्रपटात सबकुछ मकरंद अनासपुरे आहेत; पण त्यांच्या सोबत भरत सावले, प्रकाश भागवत, नितीन कुलकर्णी, राजू सोनावणे,, अमर सोनावणे ,स्वाती देशमुख,रुचिरा जाधव यांच्या लक्षणिय भूमिका आहेत. पोस्ट प्रॉडक्शन- रश मिडिया, अन्वय उत्तम नायकोडी, रंगभूषा- कुंदन दिवेकर, वेशभूषा- माधुरी मोरे यांचे आहे. चित्रपटात अर्कचित्रांचा अत्यंत खुबीने वापर करण्यात आला आहे आणि ही अर्कचित्रे नागपूरचे व्यंगचित्रकार उमेश चारोळे यांनी केली आहे.

# डॉ.आंबेडकर नगर येथे धम्मचक्र परिवर्तन दिन संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

नांदेड शहरातील डॉ. आंबेडकर नगर येथील बौद्ध विहारात ६८ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त काँग्रेसचे युवा नेते अभिलाष (बच्चू) पावडे यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. आजचा दिवस म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली, तो ऐतिहासिक क्षण साजरा करण्याचा दिवस आहे असे प्रतिपादन बच्चू पावडे यांनी काढले

पुढे ते म्हणले की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक अन्याय, अंधश्रद्धा, आणि भेदभावातून मुक्तता मिळवण्यासाठी धम्ममार्गाचा स्वीकार केला.बुद्धांच्या धम्माची शिकवण म्हणजे समतेचा, न्यायाचा, आणि करुणेचा मार्ग, या दिवशी आपणही समानता, बंधुता, आणि शांततेच्या मार्गावर चालण्याचा संकल्प करूया. धम्म चक्र परिवर्तन दिनाच्या निमित्ताने आपल्या समाजात ज्ञान, न्याय, आणि माणुसकीचा प्रकाश पसरत राहो.


यावेळी काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे शहर अध्यक्ष सत्यपाल सावंत, काँग्रेस जिल्हा कमिटीचे शहर सचिव शेख मुख्तार, केशव गावंडे , गोविंद पाटील आदी उपस्थित होते. तसेच यावेळी डॉ. आंबेडकर नगर मधील उज्वला रमेश कासेकर, सुनिता बाबाराव भट्टे, भारताबाई चौदंते, कल्पना रमेश वंदने, जयश्री विजय वंदने, सावित्री बाबुराव सोनकांबळे, वत्सलाबाई शामराव वाघमारे, गंगाधर ओडणे विजय चितळे, चंपतराव लोकडे, रमेश चित्ते व त्रिरत्न महिला मंडळाच्या महिला व ज्येष्ठ नागरिक, युवक आदी उपस्थित होते.

# या देवी सर्व भूतेषु बुद्धि रूपेण संस्थिता, नमस्तस्यै, नमस्तस्यै, नमस्तस्यै नमो नमः

देवी सरस्वतीच्या आशीर्वादाने आणि तुम्हा सगळ्यांच्या सदिच्छांमुळे एक स्वप्नपूर्ती झाली आहे .प्राध्यापक प्रीती पोहेकर संपादित भारतीय ज्ञान परंपरा ह्या ग्रंथामध्ये योग विषयक लेख लिहिण्याची संधी मला मिळाली योगाचा प्रचार आणि प्रसारासाठी जी काही थोडीफार मेहनत मी घेते आहे त्याची अशाप्रकारे दखल घेतली गेली ह्याचा अत्यानंद आहे. प्राध्यापक प्रीती पोहेकर यांच्या आग्रहामुळे मी योग विषयक एक अभ्यासपूर्ण लेख लिहिला आणि भारतीय ज्ञान परंपरा या ग्रंथामध्ये त्याला स्थान मिळालं हे माझं भाग्य आहे. महाराष्ट्रातल्या अनेक विद्यापीठांमध्ये हा ग्रंथ आता संदर्भ ग्रंथ म्हणून दाखल झालेला आहे. खूप आनंद होतो आहे आणि तोच तुम्हा सगळ्यांसोबत शेअर करते आहे.नवरात्राच्या ह्या पर्वावर हा ग्रंथ सर्वत्र दाखल झाला आहे आणि -रॅप वर उपलब्ध आहे . भारतीय ज्ञान परंपरेविषयी ज्यांना आवड आहे आणि अधिक माहिती हवी आहे अशा सगळ्यांनी हा ग्रंथ नक्कीच आपल्या संग्रही ठेवायला हवा.

प्राचार्या डॉ पोहेकर संपादित भारतीय ज्ञान परंपराया ग्रथांचे साहित्य भारतीच्या वतीने स्वागत बीड येथील सावरकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ .प्रीती पोहेकर संपादित भारतीय ज्ञान परंपरा या ग्रंथाची आवृत्ती २९ सप्टेंबर २०२४ रोजी प्रकाशित झाली असून, भारतीय श्रेष्ठ ज्ञान परंपरा बद्दलची वास्तविकता, विश्लेषण आणि गणितावर आधारित सर्व बाजूने अत्यंत समर्पक, संपूर्ण संशोधनात्मक तपासणी पूर्ण करून अत्यंत काळजीपूर्वक , सर्वं माहितीच्या आधाराने हा ग्रंथ (पुस्तक) उपलब्ध झालेले आहे.

या ग्रंथातून भारतीय ज्ञानाची वैभव संपन्नता दिसून येते आहे. मानवी मूल्यांची जोपासना, वृद्धी यासाठीचे चिंतन- मनन यातून करता येणे सहज शक्य आणि सोपे होते आहे. बुद्धिवादी असा की विद्यार्थी किंवा ज्ञान परंपरेबद्दलची उत्सुकता ठेवून असाल तर हा ग्रंथ इतिहासातील ज्ञानाच्या ठाव घेऊन आपले ज्ञान अद्यावत आणि प्रगत करण्यासाठी प्रेरणा देणारा प्रत्येकाच्या संग्रहित असावाच असा हा ग्रंथ आहे.



प्राचीन मायक्रोबायोलॉजी, आधुनिक सूक्ष्मजीवशास्त्र चा समृद्ध पाया. प्राचीन सूक्ष्मजीव शास्त्रीय संकल्पना अमलात आणणे याचा अर्थ आधुनिक पद्धती बदलणे नव्हे तर त्याचा समृद्ध करणे असा आहे हे उमगणे गरजेचे आहे, यासाठीचा अत्यंत माहितीपूर्ण लेख भारतीय ज्ञान परंपरा या पुस्तक रुपी ग्रंथातून स्वा.सावरकर महाविद्यालयातील डॉ .कृष्णा बारटक्के यांच्या सह अनेक मान्यवर तज्ञ अभ्यासकांनी अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीतून दाखवून दिले आहे.

अग्निहोत्र कसे? आणि किती महत्त्वाचे? रोग दूर करू शकणारे होम भारतीय परंपरेत फार पूर्वीपासून होत असत, यामुळे आसपासचे वातावरण कसे शुद्ध होते याचा शास्त्रोक्त अभ्यास मांडला आहे. गृहप्रवेशाचा विधी का करायचा? हवेतून पसरणाऱ्या रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी धुपन. आचार्य शुश्रुतांनी शास्त्रागारांमध्ये धुरीकरण म्हणजेच ऑपरेशन थेटर चे निर्जंतुकीकरण करण्याचे शास्त्र प्राचीन काळात विकसित कसे केलेले होते, विष्णूस्मृतीमधील संदर्भासहित शुचिता, शारीरिक आणि मानसिक शुद्धता यासाठीचे कर्म, स्नानविधी, कपडे परिधान करण्याचा विधी- नियम. स्मशानभूमीतून येत असाल तर किंवा दाढी कटिंग करून आला असेल अथवा उलट्या झाल्या असतील तर यातून होणारा संसर्ग टाळण्यासाठी स्नान करणे सुचवलेले आहे. विष्णूस्मृती सांगितलेले महत्त्व कोविड काळात, हाताच्या स्वतःचे महत्त्व आपण सर्वांनी अनुभवलेले आहे.

विर्जन- किण्वन किंवा आंबवने याविषयी देखील प्राचीन काळातील मायक्रोबायोलॉजी आजच्या आधुनिक काळातील सुक्ष्मजीवशास्त्र विषयासाठी अभ्यासात मूलभूत ज्ञान ,पाया, दिशादर्शक कसे ठरणार आहे याचा अत्यंत महत्त्वपूर्ण अभ्यास डॉ.बारटक्के यांनी या लेखातील अभ्यासातून समोर आणला आहे. समृद्ध भारतीय ज्ञान परंपरा सांगणार्या या ग्रंथात डॉ.हंसराज जोशी यांनी विश्वकल्याणासाठी भारतीय ज्ञान परंपरेचे पुनरुत्थान तर डॉ. कमलाकर कांबळे यांनी बुद्ध तत्त्वज्ञानाची भारतीय परंपरा. डॉ .प्रीती पोहेकर यांनी भारतीय प्रशासनाचा ऐतिहासिक वारसा डॉ .कृष्णा बारटक्के यांनी परंपरागत भारतीय जीवनशैलीतील सूक्ष्मजीव विज्ञान तर सत्वशील समाज निर्मितीसाठी संत साहित्य याविषयी डॉ.मेधा गोसावी यांनी अभ्यासपूर्ण लेखातून मांडणी केली आहे, तर योग परंपरेविषय अतिशय सखोल आणि माहितीपूर्ण लेख ,सौ.दीपाली कुलकर्णी यांनी लिहीला आहे.हे सर्व भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेतील महाविद्यालयात उच्चविद्याविभूषित अभ्यासक आहेत, याचा सार्थ अभिमान ठेवून हे पुस्तक नव्हे तर अमूल्य ठेवा दाखवणारा ग्रंथ, ज्याची प्रस्तावना डॉ.उपेंद्र कुलकर्णी यांची असून विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्लीचे सचिव डॉ.मनीष जोशी यांनी आपले राष्ट्र ज्ञानयोगनिधिं विश्वगुरूं योगिजनप्रियम् असेच राहील असा दृढविश्वास देऊन या अभ्यासाबद्दल शुभेच्छादेत मोठा आनंद व्यक्त केला आहे. हा ग्रंथ प्रत्येक भारतीय परंपरा जपणाऱ्या, प्रेम करणाऱ्या, आणि वृद्धिंगत करणाऱ्या सर्व भारतीयाच्या घरात, डोक्यात असलाच पाहिजे असाच आहे.

प्रमोद कुलकर्णी, पत्रकार
साहित्य भारती,बीड.
(९४०३९०४६५१)

## अग्रलेख...

# आशियन शिखर परिषद आणि भारताची भूमिका

जगाची तिसऱ्या महायुद्धाच्या दिशेने काहीशी वाटचाल सुरू असताना आणि कोणत्याही क्षणी तिसऱ्या महायुद्धाचा भडका उडून संपूर्ण जग त्याच्या कवेत सामावले जाईल अशी स्थिती असताना अंधारात मिणमिणत्या पणतीचा प्रकाश पडावा, तशी एक दिलासाजनक आणि आशादायक घटना दक्षिण आशियात घडली. २१ व्या भारत आशियन शिखर परिषदेत नव्या मैत्रीचा पाया घातला गेला. २०२६ पासून २०३० पर्यंतच्या पाच वर्षांसाठीच्या भारत आशियन कृती कार्यक्रमालाही यावेळी अंतिम रूप देण्यात आले. भारत-आशियन मैत्री खूप महत्त्वपूर्ण आहे, असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही मैत्री आणखी दृढ करण्यासाठी दहा सूत्री योजना जाहीर केली. २१ वे शतक भारत-आशियन देशाचे आहे. जगाच्या अनेक भागात तणाव आणि संघर्ष सुरू असताना भारत आणि आशियन देशातील मैत्री, संवाद आणि सहकार्य एका नव्या युगाचा प्रारंभ करणारी म्हटली पाहिजे. अटलबिहारी वाजपेयी यांनी पंतप्रधान असताना ॲक्ट ईस्ट धोरण लागू केले होते. त्या धोरणाचा चांगला परिणामही दिसून आला. त्यानंतर २०१४ मध्ये केंद्रात मोदी यांच्या नेतृत्वातील सरकार आल्यानंतर भारतीय आशियन देशातील ऐतिहासिक संबंधांना नवी ऊर्जा, दिशा आणि गती दिल्या गेली. दक्षिण चीन समुद्रात काही मुद्यांवर चीन आणि फिलिपाईन्स यांच्यात संघर्ष सुरू असताना तसेच म्यानमारमध्ये जातीय समूह तेथील लष्करी राजवटीविरुद्ध रस्त्यावर उतरले असताना लाओसची राजधानी विएंतियान येथे भारत-आशियन शिखर परिषदेत मोदी यांनी दक्षिण आशियातील आपल्या शेजारी देशांसमोर खुल्या मनाने मैत्रीचा हात पुढे केला, याचे वेगळे महत्त्व आणि संदर्भ आहेत. आशियन देश आणि आम्ही फक्त शेजारी नाही तर ग्लोबल साऊथच्या लढ्यातील महत्त्वपूर्ण भागीदार असल्याचाही निर्वाळा मोदी यांनी दिला. आम्ही शांतिप्रिय देश असून एक-दुसऱ्याची राष्ट्रीय अखंडता आणि सार्वभौमता यांचा आदर करतो, असे नमूद करीत मोदी यांनी जगातील संघर्ष नेमका कोणत्या कारणांवरून होतो, याचा नकळत उल्लेख केला. जगात आज अशांतता आणि तणावाचे जे वातावरण आहे, त्याची मुळे स्वत: शांतताप्रिय नसणे तसेच दुसऱ्याच्या अखंडता आणि सार्वभौमता यांचा आदर न करण्याच्या वृत्तीत दडली आहेत. रशिया-युक्रेन संघर्ष असो की इस्रायल-पॅलेस्टिनी संघर्ष यांचे मूळ यातच आहे. 'जगा आणि जगू द्या' या सहिष्णू धोरणाची आज जगात गरज आहे; त्याऐवजी आम्ही जगू पण तुम्हाला शांततेने जगू देणार नाही, अन्यथा आम्ही म्हणू तसेच तुम्हाला जगावे लागेल, या धोरणाचा अतिरेक जगात सुरू झाला आहे.

'हे विश्वची माझे घर' आणि 'वसुधैव कुटुंबकम्' ही भारताची प्राचीन परंपरा आणि सहिष्णू वृत्ती आहे. त्यामुळे भारताला कोणासमोरही मैत्रीचा हात करण्यात कधी कमीपणा वाटत नाही. कोणाला मदत करणे यात कमीपणाची नाही, मनाच्या मोठेपणाची भावना आहे. त्यामुळे जगात भारताचे शत्रू हाताच्या बोटावर मोजता येतील एवढे आहेत तर मित्रांची संख्या मात्र अमर्याद आहे. भारताचे जे सख्खे शेजारी देश आहेत, त्यात पाकिस्तान, बांगलादेश, नेपाळ, श्रीलंका यात काही अंतर्गत समस्या आहेत. यातील पाकिस्तान वगळता अन्य देशांना भारताने नेहमीच सढळ हाताने मदत केलेली आहे. पुढेही करणार आहे. पाकिस्तान कधीच भारतासमोर स्वत:हून मैत्रीचा हात करत नाही आणि भारताने मैत्रीचा हात केला तर तो झिडकारून लावतो. तरीसुद्धा भारताने नेहमीच पाकिस्तानकडे शेजारी देश म्हणून पाहिले आणि आपल्या शेजारधर्माचे पालन केले आहे. बांगलादेशात नुकताच जो उठाव झाला, त्यात बांगलादेशच्या पदच्युत पंतप्रधान शेख हसिना यांना आपला जीव वाचवण्यासाठी पळ काढावा लागला. भारताने त्यांनाही आपल्या देशात आसरा दिला आहे. आशियानमध्ये भारताशिवाय लाओस, ब्रुनोई, मलेशिया, थायलंड, कंबोडिया, म्यानमार, फिलिपाईन्स, व्हिएतनाम आणि इंडोनेशिया असे दहा देश आहेत. हे सर्व आशियन देश चीनच्या वाढत्या आक्रमकतावादामुळे असहज आणि त्रस्त आहेत. विशेष म्हणजे या परिषदेच्या आधी आशियान देशांच्या राष्ट्र प्रमुखांनी चीनचे पंतप्रधान ली शिआंग यांची भेट घेतली. दक्षिण चीनच्या समुद्रात युएनक्लॉज लागू करण्याची मागणी आशियन देशांनी यावेळी केली, पण त्याला शिआंग यांनी कसा प्रतिसाद दिला ते समजू शकले नाही. चीनची जी उर्मट आणि असंवेदनशील भूमिका आहे, ती लक्षात घेता तो प्रतिसाद कसा असेल, याची सहज कल्पना सगळ्यांना येऊ शकते. दक्षिण चीनच्या समुद्रात युएनक्लॉजचा निर्णय चीनने लागू करावा, ही भूमिका आशियन देशांचीच नाही तर भारत, जपान, अमेरिका आणि अनेक पश्चिमी देशांची आहे. तरीसुद्धा चीन आपल्या हेकेखोर भूमिकेत बदल करत नाही, हे आश्चर्य आणि सोबत दुर्दैवही आहे. उलट हा आमच्या अंतर्गत कारभारात पाश्चात्त्य देशांचा हस्तक्षेप असल्याचा आरोप करायलाही चीन मागेपुढे पाहात नाही. बाह्य हस्तक्षेपामुळे हा वाद चिघळत असल्याचा आरोपही चीन करत आहे. आशियन देशाचे अध्यक्षपद आता मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याकडे आले आहे. त्यांनीही दक्षिण चीन सागरातील वादावर लवकरात लवकर तोडगा निघण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. त्यानंतर काही तासातच आशियन देशांचे प्रमुख पंतप्रधान मोदी यांना भेटले. कडाक्याच्या उन्हातून सावलीत आल्यावर जसे वाटते, तसेच मोदी यांच्या भेटीनंतर आशियान देशांच्या प्रमुखांना निश्चितच वाटले असणार. चीनने दक्षिण चीन सागरातील अनेक आशियान देशाच्या समुद्रीय सीमांवर कब्जा केला आहे. २०१६ मध्ये युएनक्लोजने फिलिपाईन्स आणि चीन यांच्या समुद्री सीमांच्या वादात हस्तक्षेप करताना फिलिपाईन्सच्या बाजूने आपला निर्णय दिला होता. मात्र, चीनने आपल्या विरोधात जाणारा हा निर्णय मानण्यासच नकार दिला. चीनची ही एकप्रकारे दादागिरी म्हणायला हरकत नाही. त्या पृष्ठभूमीवर पंतप्रधान मोदी यांचे, आम्ही शांतताप्रिय असून शेजारी देशांच्या अखंडता आणि सार्वभौमता याचा आदर करतो, हे विधान हा चीनला हाणलेला टोला म्हटला पाहिजे. अप्रत्यक्षपणे मोदी यांनी चीन हा शांतताप्रिय देश नसून तो शेजारी देशांची अखंडता आणि सार्वभौमता याचा आदर करत नाही, असे म्हटले आहे. चीनच्या या आक्रमक धोरणाचा कटू अनुभव भारतानेही अनेक वेळा घेतला आहे.

आशियन देशांसोबतचे संबंध आणखी दृढ करण्यासाठी पंतप्रधान मोदी यांनी आशियान देशात पर्यटनाला प्रोत्साहन देणे, त्यासाठी २०२५ हे पर्यटन वर्ष म्हणून पाळणे, युवा शिखर संमेलन, संगीत महोत्सव, स्टार्टअप महोत्सव यांचे आयोजन करणे, महिला वैज्ञानिक संमेलनाचे आयोजन करणे, नालंदा तसेच देशातील कृषी महाविद्यालयात आशियान देशातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीत वाढ करणे, हरित हायड्रोजनवर कार्यशाळा घेणे, २०२५ पर्यंत भारत-आशियान देशातील व्यापारी करारांचा आढावा घेणे आदी उपायांचा यात समावेश आहे. 'मां के लिये एक पेड लगाओ' अभियानासाठी आशियान देशांच्या प्रमुखांना आमंत्रित करणे, याचाही यात समावेश आहे. आशियन देशांसोबतच्या भारताच्या व्यापारात गेल्या दहा वर्षांत दुपटीने वाढ होत तो १३० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आहे. सात आशियान देशांसाठी भारतातून थेट विमानसेवा आहे; ती आता ब्रुनोईसाठीही थेट विमानसेवा सुरू केली जाणार आहे. आशियान देशातील नैसर्गिक संकटाचा सामना करण्यासाठी ५० लाख डॉलरची मदतही भारताने जाहीर केली आहे. मोदी यांनी या परिषदेत जाहीर केलेला दहा सूत्री कृती कार्यक्रम हा आशियन देशांबद्दलच्या भारताच्या मानवीय भूमिकेचे प्रतीक म्हणायला हरकत नाही. आशियन देशात भारतच त्यातल्या त्यात आर्थिकदृष्ट्या संपन्न आणि म्हणूनच विकसित देश म्हणायला हरकत नाही. त्यामुळे भारतावरची जबाबदारी मोठी आहे. भारत विश्वगुरू व्हावा, अशी सगळ्यांची इच्छा आहे. मोदी यांच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात आपल्या देशाची वाटचाल निश्चितपणे त्या दिशेने होत आहे. भारत-आशियान देशांची मैत्री हा त्या वाटचालीतील एक प्रमुख आणि मैलाचा टप्पा म्हणायला हरकत नाही.

## यंगिस्तान

# हरयाणा निकाल; 'व्होट जिहाद'ला प्रत्युत्तर!

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

हरयाणामध्ये भाजपाला सर्वाधिक मते मिळाली असून लवकरच सत्ता स्थापन करणार आहे, ही हिंदू भावविश्वासाठी आनंदाची बाब आहे. वाचकहो, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपाला सर्वाधिक जागा मिळविण्यात यश आले. तरीसुद्धा एक असं नॅरेटिव्ह निर्माण केलं गेलं की, भाजपाचा पराभव झाला आहे. विशेष म्हणजे हे नॅरेटिव्ह भाजपाच्या कार्यकर्त्यांनी व समर्थकांनी स्वीकारलं आणि आपला पराभव झाला आहे, हे मान्य केलं. मग भाजपाच्या नेत्यांवर टीकाटिप्पणी सुरू झाली. खरं तर भाजपाचं बहुमत हुकलं, हे अपयश नसून पराभव झाला, या नॅरेटिव्हला बळी पडणं, हे अपयश होतं. ३०३ वरून २४० वर आणलं. म्हणजे लोक भाजपावर नाराज आहेत, भाजपाचा पराभव झालाय, मोदी लाट ओसरली आहे. असं विरोधक म्हणत होते आणि या नकारात्मक प्रचाराला हिंदुत्ववादी मंडळी, भाजपाची मंडळी बळी पडली. मागे गुजरातमध्ये राहुल गांधींनी प्रचार करूनही त्यांचा सपशेल पराभव झाला, तरीही हा नैतिक विजय आहे, असं काँग्रेसवाले राहुल गांधींची कारकीर्द वाचवण्यासाठी म्हणत होते. स्वयंघोषित पुरोगामी मंडळी असा प्रचार मुद्दाम करतात. लक्षात घ्या, पुरोगामी मंडळींचं प्रचार तंत्र सर्वोत्तम आहे, हे मान्यच करावं लागेल. खोटं बोलण्यामध्ये, रेटून खोटं बोलण्यामध्ये या लोकांनी पीएच. डी. केली आहे. माझे असे अनेक मित्र आहेत, त्यांना असं वाटतं की, डावे लोक हुशार असतात. मी त्यांना नेहमी सांगतो की, डावे लोक हुशार असण्याचा अभिनय छान करतात. डाव्यांमध्ये वादविवाद करण्याची क्षमता नाही, ते फक्त आरडाओरडा करू शकतात. प्रत्येक गोष्टीत आंदोलने करू शकतात. म्हणूनच मोदींनी या लोकांचं 'आंदोलनजीवी' असं नामकरण केलं आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या जागा जरी कमी झाल्या असल्या, तरी मतांची टक्केवारी चांगली आहे, हे आपल्याला लक्षात घ्यावं लागेल. जवळजवळ ३६.६ टक्के म्हणजेच २३.५९ कोटी मते एकट्या भाजपाला मिळाली होती आणि मागच्या निवडणुकीपेक्षा सुमारे ७० लाख अधिक मते मिळाली होती. त्यामुळे हा पराभव नव्हताच. तरीदेखील या विजयाला पराभव म्हणून सादर करण्यात आले. भाजपा लोकसभेत पिछाडीवर गेला हे खरंय; पण त्या मागचं



गणित वेगळं आहे. २०१४ मध्ये मोदींना यश मिळालं तेव्हा राहुल गांधींनी आपलं हिंदुद्वेष्टे, हिंदुविरोधी धोरण बदलले आणि आपण हिंदू धर्मवादी आहोत, जनेऊधारी ब्राह्मण आहोत, असे सांगायला सुरू केली. पण २०१९ मध्ये या धोरणाचा लाभ झाला नाही. त्यानंतर राहुल यांनी त्यांचं जुनं धोरण आत्मसात केलं; उलट यावेळी अधिक तीव्र केलं. काँग्रेसने मुस्लिमांना साद घातली. भाजपा संविधान बदलेल, असा उघड आणि भाजपाला ४०० पेक्षा जास्त मते मिळाली तर अल्पसंख्यकांना मोठा धोका निर्माण होईल, असा छुपा प्रचार सुरू केला. त्यातून 'व्होट जिहाद' ही संकल्पना आकाराला आली. मुसलमानांनी भाजपाला हरवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर मतदान केलं. तरीही भाजपाला २४० जागा मिळाल्या. मी आपल्या 'यंगिस्तान' या स्तंभामध्ये एका लेखात म्हटलं होतं की, एवढा प्रखर विरोधी प्रचार होत असताना व व्होट जिहादची काळी छाया असताना २४० जागा मिळवणं, ही खूप मोठी गोष्ट आहे. खरं तर ही हिंदूंची ताकद आहे. नरेंद्र मोदींनी कोणतीही निवडणूक हिंदू-मुस्लिम विरोधी केली नव्हती. उलट मोदींच्या काळात मुसलमानांना न्याय मिळालेला आहे. अनेक योजनांचा लाभ मुस्लिमांना झाला, ३७० कलम निकालात काढल्याने भारत एकसंध झाला, तीन तलाकचा कायदा केल्यामुळे मुस्लिम बहिणींचे अश्रू पुसले गेले. मोदींकडून मोठा लाभ घेऊनही मुस्लिमांनी विरोधकांच्या पारड्यात मते टाकली. उलट या विरोधकांनी मुस्लिमांना मागास ठेवलं, पसमंदा मुस्लिमांची परिस्थिती किती बिकट आहे. इतकी वर्षे या लोकांची मते घेऊन त्यांनाच बाजूला सारलं. पण अजूनही या समाजाचे डोळे उघडलेले नाहीत. आपण अत्यंत आधुनिक युगात जगत आहोत. त्यामुळे या आधुनिक युगात कट्टरतावादाला स्थान नाही आणि या समाजाची कट्टरता, मागासलेपणा हीच डाव्या, पुरोगामी मंडळींची ताकद आहे. या समाजाला मागास ठेवायचं, त्यांच्या धार्मिक भावना भडकवायच्या आणि मते मिळवायची, हा एकच उद्योग गेली ७० वर्षे हे लोक करत आले आहेत. पण विरोधकांनी व्होट जिहाद निर्माण करून झोपलेल्या हिंदूंना जागं केलं आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या नेत्यांनी, विशेषतः बाहेरून भाजपात आलेल्या नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे दुर्लक्ष केलं. त्याचा परिणाम म्हणून भाजपाला थोडं पिछाडीवर यावं लागलं. खरं तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हे गुरुकुल आहे. या गुरुकुलातून शिकून उत्तीर्ण झालेले लोक विविध सामाजिक संस्थांमध्ये व भाजपामध्ये स्थिरावतात. पण त्यांनी आपल्या गुरुकुलाचे संस्कार विसरू नये, त्यांनी गुरुकुलाकडे पाठ फिरवू नये, अशी अपेक्षा असते. गुरुकुल आणि गुरुकुलातील माजी विद्यार्थ्यांचा संपर्क तुटल्यामुळे २०२४ च्या लोकसभेत बहुमत हुकले होते, हा मुद्दा ध्यानात ठेवला पाहिजे. आता हरयाणा निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा संघ आणि भाजपाचा मिलाफ पाहायला मिळाला आहे. संघाने या निवडणुकीत पुष्कळ परिश्रम घेऊन समाजातल्या प्रत्येक स्तरातल्या व्यक्तीला व्होट करण्यास प्रोत्साहन दिले. संघ स्वयंसेवक जिद्दीने काम करताना दिसले. यावेळी भाजपाचा कार्यकर्ता आणि नेता यांच्यातील दरी कमी होताना दिसली. भाजपाचे नेतेदेखील रस्त्यावर उतरून लोकांच्या समस्या सोडवताना दिसले. हेच महाराष्ट्रात अपेक्षित आहे. भाजपाच्या इच्छुक नेत्यांनी स्वयंसेवकांच्या संपर्कात राहायला हवे. त्यांच्यासोबत समन्वय बैठक घ्यायला हवी. केवळ समाजमाध्यमावर पोस्ट टाकून निवडणूक जिंकता येणार नाही; रस्त्यावर उतरून काम करावे लागणार आहे. हे चित्र महाराष्ट्रात दिसेल अशी अपेक्षा आहे. कुणी कितीही व्होट जिहाद किंवा चर्च व्होटिंग केली तरी भगवा व्होटिंगची ताकद खूप मोठी आहे. हिंदूंचा फक्त हनुमान झाला आहे, त्यांना त्यांच्या शक्तीची जाणीव वारंवार करून द्यावी लागते आणि जेव्हा ही जाणीव होते तेव्हा हरयाणा पादाक्रांत होतो. हरयाणाचा विजय म्हणजे व्होट जिहादला हिंदूंनी दिलेलं प्रत्युत्तर आहे.

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**मिलिंद महाजन**

# लाल मातीच्या कोर्टचा राजा होतोय् निवृत्त

२२ वेळा ग्रॅण्ड स्लॅम विजेता स्पेनचा स्टार टेनिसपटू राफेल नदाल याने पुढील महिन्यात स्पेनमधील मालागा येथे होणाऱ्या डेव्हिस चषक टेनिस स्पर्धेच्या अंतिम सामन्यानंतर आंतरराष्ट्रीय टेनिसमधून निवृत्त होण्याची घोषणा केली आहे. वयाच्या ३८ व्या वर्षी नदाल निवृत्त होत असल्याची बातमी ऐकून टेनिस वर्तुळात चर्चा सुरू झाली.

एक दशकाहून अधिक काळ रॉजर फेडरर व नोवाक जोकोविच सोबत 'बिग थ्री' म्हणून नदालने पुरुषांच्या टेनिसमध्ये लौकिक मिळवला. राफेलने फेडरर व जोकोविच या प्रतिस्पर्ध्यांशी चिवट झुंज देत २२ ग्रॅण्ड स्लॅम एकेरी विजेतेपद जिंकले, यात त्याच्या विक्रमी १४ फ्रेंच ओपन विजेतेपदांचा समावेश आहे. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण खेळीने राफेल नदालला टेनिसचा महान खेळाडू आणि 'लाल मातीच्या कोर्टवरील निर्विवाद राजा' (किंग ऑफ क्ले) केले.

२००८ च्या विम्बल्डन स्पर्धेतील नदाल विरुद्ध फेडरर यांच्यातील अंतिम सामना तसेच २०२२ च्या फ्रेंच ओपनच्या उपांत्यपूर्व फेरीत नदाल विरुद्ध जोकोविच आणि २०१२ च्या ऑस्ट्रेलियन ओपनमधील नदाल विरुद्ध जोकोविच अंतिम सामना खूपच गाजला होता. २०२२ हंगामाच्या अखेरीस ४१ वर्षांचा असताना फेडररने निवृत्तीची घोषणा केली. राफेल नदाल आपल्या देखण्या कामगिरीच्या बळावर असोसिएशन ऑफ टेनिस प्रोफेशनल्स (एटीपी) द्वारे जागतिक क्रमवारीत २०९ आठवडे प्रथम क्रमांकावर राहिला आहे व वर्षाच्या अखेरीस तो पाच वेळा अव्वल क्रमांकावर राहिला आहे.



नदालने विक्रमी १४ फ्रेंच ओपन विजेतेपदासह २२ ग्रॅण्ड स्लॅम पुरुष एकेरीचे विजेतेपद जिंकण्याची किमया केली आहेच; याशिवाय त्याने ९२ एटीपी-स्तरीय एकेरी खिताब जिंकले आहेत. यात ३६ मास्टर्स व ऑलिम्पिक सुवर्णपदकांचा समावेश आहे. त्यापैकी ६३ क्ले कोर्टवर आहेत. एकेरीमध्ये करीअर गोल्डन स्लॅम पूर्ण करणाऱ्या तीन पुरुषांपैकी नदाल एक आहे. क्ले कोर्टवर त्याचे सलग ८१ विजय हे खुल्या टेनिस जगतातील सर्वात लांब विजयी प्रवास आहे. आपल्या व्यावसायिक कारकीर्दीच्या सुरुवातीला नदाल एटीपी टूर इतिहासातील सर्वात यशस्वी किशोरांपैकी एक टेनिसपटू ठरला. २० वर्षांचा होण्यापूर्वी त्याने १६ विजेतेपद जिंकले, ज्यात त्याच्या पहिल्या फ्रेंच ओपन व मास्टर्स स्पर्धांचा समावेश आहे. या काळात त्याने क्ले कोर्टचा तज्ज्ञ टेनिसपटू अशी प्रतिमा निर्माण केली. ऐतिहासिक विम्बल्डनच्या अंतिम सामन्यात फेडररला पराभूत केल्यानंतर २००८ मध्ये नदालने प्रथमच जागतिक क्रमवारीत अव्वल स्थान मिळविले, हा त्याचा पहिला मोठा विजय आहे. २००८ बीजिंग ऑलिम्पिकमध्ये त्याने ऑलिम्पिक एकेरी सुवर्णपदकासह विजयाचा पाठपुरावा केला. २०१० च्या अमेरिकन ओपनच्या अंतिम सामन्यात जोकोविचला पराभूत केल्यानंतर २४ वर्षीय नदाल करीअर ग्रॅण्ड स्लॅम मिळविणारा खुल्या टेनिस जगतातील सर्वात तरुण आणि तीन वेगवेगळ्या कोर्टवर (कठीण, गवत व चिकणमातीच्या कोर्टवर) मेजर जिंकणारा पहिला पुरुष टेनिसपटू ठरला.

दुखापतींनी ग्रासलेल्या दोन हंगामांनंतर, नदाल २०१३ मध्ये टेनिस कोर्टवर परतला व त्याने १४ अंतिम फेरी गाठली. त्याने अमेरिकन ओपन सिरीजसह दोन प्रमुख व पाच मास्टर्स स्पर्धा जिंकल्या. त्याने फ्रेंच ओपनमध्ये आपले वर्चस्व कायम ठेवले. मार्क लोपेझसह २०१६ च्या रिओ ऑलिम्पिकमध्ये जेतेपद, दोन अमेरिकन ओपन जेतेपद, एक ऑस्ट्रेलियन ओपन जेतेपद आणि ऑलिम्पिक दुहेरीत सुवर्णपदक मिळविले. नदालने २०२२ ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये सर्वाधिक ग्रॅण्ड स्लॅम पुरुष एकेरी विजेतेपदांचा जोकोविच व फेडररसोबतचा संयुक्त विक्रम मोडला व एकेरीतील दुहेरी करीअर ग्रॅण्डस्लॅम पूर्ण करणाऱ्या इतिहासातील चार पुरुषांपैकी एक झाला. वाढत्या वयानुसार नदालच्या दुखापतीच्या समस्याही वाढल्या. त्याची गत दोन वर्षे खूप कठीण गेली आहेत. आपण मर्यादेच्या पलीकडे खेळू शकणार नाही, असे त्याला स्वतःला जाणवले, त्यामुळे त्याने आता खेळणे थांबवण्याचा निर्णय घेतला. आयुष्यात प्रत्येक गोष्टीला सुरुवात व शेवट असतो, असे म्हणत नदालने देशासाठी अखेरचे खेळण्याची इच्छा असल्यामुळे तो पुढील महिन्यात डेव्हिस चषकाच्या अंतिम सामन्यात खेळणार आहे. यापूर्वी तो पॅरिस ऑलिम्पिकमध्ये देशासाठी अखेरचा खेळला होता. भविष्यात कोणत्या ना कोणत्या रूपात त्याच्या हातून टेनिसमध्ये सेवा घडो, ही अपेक्षा.

७२७६३७७३१८

## मुंबई वार्तापत्र

# महाराष्ट्राचा चाणक्य!

**नागेश दाचेवार**

हरयाणा विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले आणि काँग्रेसचे अवसान पूर्णपणे गळून गेले. त्याचवेळी भारतीय जनता पार्टीचे मनोबल मात्र शेकडो पटीने वाढले. याचे सारे परिणाम महाराष्ट्राच्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात दिसून येणार आहेत, यात कोणतीही शंका नाही. उपमुख्यमंत्री तसेच भाजपाचे ज्येष्ठ नेते देवेंद्र फडणवीस यांनीही पक्ष कार्यकर्त्यांसमोर केलेल्या छोटेखानी भाषणात भाजपाला पुढची विजयी सलामी महाराष्ट्रातून मिळेल, असा विश्वास व्यक्त केला आहे. हरयाणातल्या विजयामुळे भाजपाची पर्यायाने जागा वाटपावेळी चर्चेला बसणाऱ्या फडणवीसांची महायुतीतली बार्गेनिंग पॉवर आता कितीतरी पटीने वाढली आहे. त्याचवेळी महाविकास आघाडीत सुरू झालेल्या कुरघोडीने आघाडीत बिघाडी झाल्याचे चित्र समोर आले आहे. तब्बल ३० वर्षे भाजपासोबत युतीत राहून भाजपावर, भाजपाच्या शीर्षस्थ नेतृत्वांवर टीका करण्याचा प्रकार उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पिलावळींनी सातत्याने केला. स्वतःच्यात काही दम नाही, पण दुसऱ्यांच्या कुबड्यांवर जगूनही त्याच कुबड्यांवर कुरघोडी करणे, अपमान करणे अशी वाईट सवय जडलेल्या ठाकरे आणि पिलावळींनी आता आघाडीतील काँग्रेस पक्षावर कुरघोडी करण्याचा, अपमान करण्याचा प्रकार चालवला आहे. मागील काळातही छोटे-मोठे प्रताप हे करतच आलेत, पण यावेळी तोंड जरा जास्तच उचकटलंय् यांचं. आता काँग्रेसला कळलं असेल भाजपाची यांच्या सोबतची अवस्था. बाकीचे अनुभवदेखील हळूहळू येतीलच. म्हणतात ना सापाला कितीही दूध पाजलं तरी तो त्याचा गुणधर्म सोडत नाही किंवा कुत्र्याचं शेपूट वाकडं ते वाकडंच असते. ज्या ताटात खाल तेथेच भोक पाडणे, अशा काही ज्या प्रचलित म्हणी आहेत ना त्या तंतोतंत लागू होतात यांना.

हरयाणातील काँग्रेसची उडालेली धूळधाण बघता महाराष्ट्रात त्यांच्यासाठी वाट बिकट झाली आहे. हा निकाल भाजपा आणि फडणवीसांसाठी थोडा दिलासा देणारा ठरला आहे. तरीपण फडणवीसांसमोरची आव्हानं काही कमी झालेली नाहीत. तसे देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात जे काही राजकारण केले त्यामध्ये त्यांनी भाजपाप्रती समर्पण, शिस्त आणि विकासाचे व्हिजन याच्या जोरावर जनतेची मनं जिंकण्याचा प्रयत्न केला आहे. नागपूरचा सर्वात तरुण महापौर होण्यापासून महाराष्ट्राचे सलग पाच वर्षे मुख्यमंत्री होणारे दुसरे व्यक्ती असे स्थान पटकावण्यापर्यंत त्यांनी आपले कौशल्य दाखवले आहे. त्यांनी आपल्या मुख्यमंत्रिपदाचा कार्यकाळ विकास कामांच्या ब्लू प्रिंटने अंकित केला आहे. महाराष्ट्रात अलिकडे झालेल्या बहुतांश विकास प्रकल्पांवर फडणवीस यांच्याच दूरदृष्टीची छाप दिसून येते. राज्यातील पायाभूत सुविधा असोत, उद्योगधंदे असोत किंवा शहरी नियोजन असोत, त्यांच्या दूरदृष्टीचा आणि प्रशासकीय चातुर्याचा ठसा त्यावर दिसून येतो. फडणवीस हे एक असे नेते आहेत की, ज्यांच्या प्रभावाने महाराष्ट्रातील विकासाचा पुढच्या दहा वर्षांचा सारीपाट प्रत्येकाच्या डोळ्यासमोर तरळतो. पण त्यांच्या सोबत सत्तेत सामील असणाऱ्या ठाकरे आणि त्यांच्या चेल्यांनी कधीही फडणवीसांच्या विकास कामात सहकार्य केले नाही. उलट त्यात खोडा घालण्याचे काम केले. त्यातही कुठले काम उद्धव ठाकरेंनी सांगितले असेल, तर ते सचिन वाझेंना नोकरीत सामावून घेण्यासारखे; जे फडणवीसांनी नियमात बसत नसल्याने केले नाही. यावरून ठाकरेंचे व्हिजन आणि प्राथमिकता काय होती, याची प्रचीती येते.

महाराष्ट्रातील भाजपात नेहमीच स्पर्धात्मक परिस्थिती राहिली आहे. फडणवीस २०१४ मध्ये जेव्हा मुख्यमंत्री झाले तेव्हा पक्षातील इतर नेते, मग ते विनोद तावडे असोत, एकनाथ खडसे असोत किंवा पंकजा मुंडे असोत, यांनी फडणवीस कधी पायउतार होतात याकरिता पुरेपूर प्रयत्न केले. त्यात उद्धव टोळीदेखील सहभागी होती. त्यांनी काही कमी प्रयत्न केले नाही. एकनाथ खडसे ज्यांनी मुख्यमंत्रिपद मिळत नाही या एकमेव मुद्यावर महसूल खात्यासह दहा विविध महत्त्वाच्या खात्यांचा कारभार आपल्याकडे घेतला होता. पंकजा मुंडे तर जाहीरपणे सांगत होत्या की, जनतेतील जनतेच्या मनातील मुख्यमंत्री मीच आहे. विनोद तावडे यांनी बऱ्यापैकी संयम राखला असला, तरी मनुष्यबळ विकास या मंत्रालयांतर्गत येणाऱ्या सर्व विषयांचा कारभार त्यांनी आपल्या हाती घेतला होता.

या पक्षांतर्गत आव्हानांसह विरोधकांपेक्षा कमी नसलेला सहकारी पक्षाच्या त्रासातून फडणवीसांनी अचूक मार्ग काढला. मग खडसेंनी पक्ष सोडून शरद पवारांचा हात धरला तर तावडेंनी थेट दिल्ली गाठली. पंकजा मुंडे मात्र तळ्यात-मळ्यात करत होत्या. केंद्रीय नेतृत्वाने गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या, महाराष्ट्रातील ओबीसी समाजाच्या नेत्या म्हणून त्यांच्यावर मध्यप्रदेशच्या सहप्रभारी म्हणून जबाबदारी टाकली. पण ती जबाबदारी पार पाडण्याऐवजी त्या महाराष्ट्रभर रॅली काढण्यामध्येच धन्यता मानू लागल्या. पण महाराष्ट्रातील आव्हानांना तोंड देत फडणवीसांनी विरोधकांची पुरती धूळधाण उडविली आणि धोक्याने गमावलेली सत्ता पुन्हा हस्तगत केली.

आता विधानसभा निवडणुका केव्हाही जाहीर होऊ शकतात. अशावेळी भाजपाला महाराष्ट्रात कमकुवत करायचा असेल तर फक्त आणि फक्त उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच लक्ष्य केले पाहिजे, असा प्रयत्न विरोधकांकडून होत आहे आणि होत राहणार. यासाठी भाजपातील त्यांचे विश्वासू सहकारी त्यांच्यापासून तोडले जाणार. त्यांना आपल्या बाजूने उतरवले जाणार, याची जाणीव फडणवीस यांनाही आहे. परंतु महाभारतात पांडवांकडून अभिमन्यूने जशी खिंड लढवली तशी खिंड आता भाजपाकडून देवेंद्र फडणवीस लढविणार असे दिसते. त्यांनी स्वतः एका कार्यक्रमात बोलताना सांगितले की, मी आधुनिक महाभारतातला अभिमन्यू आहे. मला चक्रव्यूह भेदता येतो. त्यांचे हे विधान फार महत्त्वाचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकत्याच केलेल्या महाराष्ट्र दौऱ्यात फडणवीस यांचे तोंडभरून कौतुक केल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. विरोधकांच्या टीकेला पचवत, त्यांना प्रत्युत्तर देत पक्षांतर्गत कुरबुरी निपटवून महाराष्ट्रात पुन्हा भाजपाप्रणीत सरकार स्थापन करायचे तर महायुतीला फडणवीसांशिवाय पर्याय नाही, हेच खरे आहे.

त्याचवेळी हरयाणात काँग्रेसला फाजील आत्मविश्वास नडला. केवळ जाट समाजाच्या भरवशावर आपले सरकार स्थापन करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न तेथील जनतेने उधळून लावला. महाराष्ट्रातही मराठा, धनगर, ओबीसी अशा विविध समाजघटकांच्या आंदोलनाला हवा देत विरोधक सत्ताधारी महायुतीवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नात आहे. पण जनता आता सुज्ञ झाली आहे. खोट्या भूलथापांना भुलणारी नाही. यावेळी मविआमध्येदेखील मोठे आव्हान एकमेकांचेच उभे ठाकले आहे. उबाठा काँग्रेसवर उखडत आहे. हरयाणासारखी स्थिती महाराष्ट्रात होणार नाही. कारण येथे उद्धव ठाकरे आणि शरद पवार आहेत. याचा अर्थ काँग्रेस पक्ष आणि त्यांच्या नेत्यांना कोणी विचारत नाही. आमच्या जिवावर काँग्रेसचे अस्तित्व असल्याचे हे सूचक विधान आहे. छत्तीसगड, मध्यप्रदेश, राजस्थान आणि हरयाणासारखा अतिआत्मविश्वास काँग्रेसला महाराष्ट्रात आहे तर दुसरीकडे ठाकरे, पवार या आघाडीच्या चाणक्यांना मात्र हा आत्मविश्वास नाही. कारण त्यांनासुद्धा खात्री झालेली आहे. महाराष्ट्रात आजघडीला एकच फडणवीस नावाचा चाणक्य आहे.

९२७०३३३८८६

### सर्वसामान्यांचा विचार व्हावा

भारताची सर्व क्षेत्रात विक्रमी वाटचाल सुरू आहे. विश्वात पण भारताने महान देश म्हणून कामगिरी केली आहे. ही बाब अतिशय कौतुकास्पद आहे. याला भारत सरकारचे यशस्वी धोरण आणि पंतप्रधान मोदींचे कुशल नेतृत्व कारण आहे. लवकरच भारत विश्वनेतृत्व स्वीकारेल, एवढे सामर्थ्य भारताजवळ आज आहे. त्यामुळे प्रत्येक देशभक्त नागरिक मोदी सरकारचे कौतुक करताना दिसत आहे. विरोधकांचा खोटा खेळ सुरू आहे, पण त्यांचे मनसुबे यशस्वी होणार नाहीत. परंतु एक गोष्ट खटकत आहे. सध्या बेरोजगारी प्रचंड वाढली आहे. महागाईची झळ सर्वसामान्यांना पोहोचत आहे. त्यात गरीब जनतेचे हाल होत आहेत. तेव्हा महागाई व बेरोजगारीवर लगाम लावण्यासाठी काही ठोस पावले मोदी सरकारने उचलावीत, असे वाटते. सामान्य नागरिकांचा अजूनही भारत सरकारवर विश्वास आहे. सामान्य नागरिक कसा सुखी होईल, याचा प्रयत्न मोदी सरकारने करायला हवा.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

### मराठीची बोलू कौतुके!

'माझा मराठीची बोलू कौतुके परी । अमृतातेहि पैजा जिंके ॥' या संत ओळींमधून ज्ञानेश्वर महाराजांनी मराठी भाषेविषयीचा अभिमान आणि भाषेची महती व्यक्त केली आहे. ३ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याची घोषणा करण्यात आली. या निर्णयामुळे महाराष्ट्र शासन आणि सर्व मराठीप्रेमींनी आनंद व्यक्त केला आहे. या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळणे ही समस्त मराठी जनतेसाठी अभिमानास्पद गोष्ट आहे. मराठी भाषेची प्राचीनता सिद्ध करण्यासाठी सातवाहनकालीन नाणेघाटातील शिलालेखाचा पुरावा देण्यात आला. मराठी भाषेची मातृभाषा संस्कृत असल्यामुळे संस्कृतनंतर मराठी भाषा सर्वात सात्त्विक आहे. मराठी भाषा ही सुंदर आणि आनंद देणारी आहे. मराठी भाषेला आध्यात्मिक आधार असल्यामुळे तिच्या उच्चारामुळे बुद्धी सात्त्विक बनते. मराठी अक्षरांमधून शक्ती, चैतन्य आणि शांती यांची स्पंदने प्रक्षेपित होत असतात. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यामुळे ही भाषा अधिकाधिक वापरात येऊन त्यामुळे पुढच्या पिढीला हा चैतन्यदायी वारसा मिळणार आहे.

**संगीता भोसले**/९७६७५६०२३६

## वाचक पत्रे

### घातक विषवल्ली

एक्सपोजर सायन्स आणि एन्व्हायर्नमेंटल एपिडेमियोलॉजी संशोधकांच्या संशोधनात आणि युरोपियन युनियन जर्नलमध्ये प्रकाशित अभ्यासानुसार बिस्फेनॉल-ए नावाचे रसायन मानवाच्या शरीरात आढळून आले आहे. हे रसायन फूड पॅकेजिंग आणि प्लॅस्टिकसारख्या घातक पदार्थांमध्ये आढळून येते. या रसायनामुळे मानवाच्या शरीरातील हार्मोन्सवर विपरीत परिणाम होतो आहे, असे संशोधनात निष्पन्न झालेले आहे. फूड पॅकेजिंगमुळे आतापर्यंत मानवी शरीरात ३६०० केमिकल्स गेलेली आहेत. त्यातील नव्या संशोधनात १०० रसायने आरोग्यासाठी अत्यंत घातक आहेत, असे आढळून आलेले आहे. स्वित्झर्लंड येथे झालेल्या संशोधनात संशोधकांनी असे म्हटले आहे की, घातक अशी पीफास रसायनांनी मानवी शरीरात प्रवेश केलेला आहे. ही घातक रसायने फॉरएव्हर केमिकल्स म्हणून ओळखली जातात. ही रसायने जी कायमची शरीरात मिसळून राहतात आणि त्याचा परिणाम मानवी शरीर स्वास्थ्यावर होतो आहे. सुमारे १४ हजार रसायनांची यादी करण्यात आली असून ही रसायने काच, धातू, प्लॅस्टिक, कागद तसेच इतर माध्यमातून अन्नापर्यंत पोहोचतात. त्याचप्रमाणे वर्तमानपत्रात खाद्यपदार्थ पॅकिंग करणेसुद्धा धोकादायक ठरू शकते, असे संशोधनात नोंदवलेले आहे. फूड पॅकेजिंगमधील घातक फॉरएव्हर केमिकल्स यांना मानवी आरोग्याच्या दृष्टीने नेव्हर एव्हर केमिकल्स म्हणून बघितले पाहिजे. कारण ही रसायने मानवी शरीरात विषवल्ली तयार करीत आहेत.

**दत्तप्रसाद शिरोडकर**/९७०२६४४९६९

### मुख्य रस्त्यांवरील दिवे लावण्याची वेळ बदलावी

सध्या हिवाळ्याची चाहूल लागत आहे. दिवसेंदिवस रात्र मोठी तर दिवस छोटा होत चालला आहे. त्यामुळे साहजिकच संध्याकाळी लवकर अंधार पसरतो. परिणामतः रस्त्यांवरील पथदिवे उन्हाळ्याच्या वेळेनुसारच संध्याकाळी साधारणतः ६.३० च्या नंतर लागतात. सध्याच्या दिवसात ५.३० च्या दरम्यान अंधार पडायला सुरुवात होते. या बदलत्या वातावरणानुसार महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाला ही विनंती आहे की, संध्याकाळी आताच्या वेळेनुसार मुख्य रस्त्यावरील पथदिवे एक तास आधी सुरू करावेत. जेणेकरून रस्त्यावर रहदारीला त्रास होणार नाही, तसेच अपघात होण्यापासून बचाव करता येईल.

**संदीप गाडगे**/९८८१७१७७३४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

तरुण भारत
www.tarunbharat.net
माझा गोवा
रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०२४

फक्त महिलांसाठी
व्यावसायिक कर्ज
₹ १० हजार ते 1 लाख पर्यंत
त्वरित कर्ज उपलब्ध
व्याज दर 12% P.A.
दि धरमपेठ महिला
आपला परिवार आपली संस्था!
अधिक महितीकरीता संपर्क • मो. 9970837610

## दृष्टिक्षेप

# डॉ. हेडगेवार : विराट संघस्वरूपाची प्रेरणा

आज जगातील सर्वात मोठी संघटना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा पाया डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी घातला. संघ समजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या कोणालाही संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या जीवनाशी परिचित असणे आवश्यक आहे. त्यांना लोक प्रेम व आदराने 'डॉक्टरजी' म्हणून संबोधित असत. डॉ. हेडगेवार यांनी संघाची स्थापना केली तेव्हा ते ३६ वर्षांचे होते. त्यांना स्वतः राजकारणी बनण्याची इच्छा नव्हती. कारण जर त्यांना राजकारणी व्हायचे असते तर आपल्या व्यक्तिगत अडचणी असूनही त्यांनी एखाद्या राजकीय पक्षाची स्थापना केली असती, परंतु हे त्यांचे ध्येय नव्हते.

ब्रिटीशांच्या गुलामगिरीत भारतीय संस्कृती नष्ट होत असताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा उदय झाला. ब्रिटिशांच्या राजवटीमुळे व्यथित होऊन डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. त्यांच्यात समाजसेवा आणि देशभक्ती ठासून भरलेली होती. बालपणी त्यांनी मुलांसमवेत सीताबर्डी किल्ल्यावरून ब्रिटिशांचा युनियन जॅक ध्वज खाली उतरवण्यासाठी बोगदा तयार करण्याची योजना आखली होती. यातून त्यांच्या राष्ट्रीय भावनेचा परिपोष दिसून येतो.

१९२५ मध्ये विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. मार्च २०२४ च्या प्रतिनिधी सभेनुसार - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ९२२ जिल्ह्यांमधील ६५९७ खंड आणि २७,७२० मंडळांमध्ये ७३,११७ दैनिक शाखा आहेत. प्रत्येक मंडळात १२ ते १५ गावांचा समावेश आहे. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातून संघाच्या प्रेरणेने विविध संघटना कार्यरत आहेत, ज्या राष्ट्र उभारणीत आणि हिंदू समाजाला संघटित करण्यात योगदान देत आहेत. संघाच्या विरोधकांनी १९४८, १९७५ आणि १९९२ अशी तीनदा संघटनेवर बंदी घातली. पण तिन्ही वेळा संघ पूर्वीपेक्षा अधिक मजबूत झाला. रा. स्व. संघ ही सामाजिक आणि सांस्कृतिक संघटना आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ 'हिंदू' शब्दाची व्याख्या 'सांस्कृतिक राष्ट्रवादा'च्या संदर्भात करतो. मात्र, संघाची ही सांस्कृतिक राष्ट्रवादाची संकल्पना पाश्चिमात्यांच्या धार्मिक संकल्पनेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. संघाची विचारधारा आणि ध्येय यांचा जिवंत संबंध स्वामी विवेकानंद, महर्षी अरविंद, बाळ गंगाधर टिळक आणि बी. सी. पाल यांच्यासारख्या हिंदू विचारवंतांच्या तत्त्वज्ञानाशी आहे. 'एक खऱ्या अर्थाने हिंदू संघटना असणे अत्यंत आवश्यक आहे, जी हिंदूंना परस्पर सहकार्याची आणि समन्वयाची भावना शिकवेल', असे स्वामी विवेकानंदांना नेहमीच वाटत होते.

डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी स्वामी विवेकानंदांचा हा विचार प्रत्यक्ष कृतीत आणला. हिंदूंना अशा कृती-तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे, जे इतिहास आणि संस्कृतीवर आधारलेले असेल, जे त्यांच्या भूतकाळाचा भाग आहे आणि ज्याबद्दल त्यांना काही ज्ञान आहे, असे त्यांचे मत होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखा 'स्व' ची भावना परिशुद्ध करून एका मोठ्या सामाजिक आणि राष्ट्रीय हिताच्या भावनेत विलीन होते.

हिंदू राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी व हिंदू समाज, हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण करून राष्ट्राला परम वैभवाकडे नेण्याच्या उद्देशाने डॉक्टरसाहेबांनी संघाची स्थापना केली, असे आपण म्हणू शकतो.



**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ : महान भारताचा संकल्प**

रा. स्व. संघ हा राजकीय पक्ष नाही तर एक सामाजिक संघटना आहे. संघाची कोणतीही राजकीय महत्त्वाकांक्षा नाही किंवा कुठल्याही राजकीय फायद्यासाठी तो काम करीत नाही. राष्ट्रीय राजकीय जीवनावर संघाचा प्रभाव दिसून येत असला तरीही तो राजकारणापासून दूर राहतो. संघाच्या शाखा पद्धतीत, असे स्वयंसेवक निश्चितपणे तयार झाले आहेत, जे आज राजकारणात उच्च पदांवर आहेत. संघ शाखा चालवण्याव्यतिरिक्त काहीही करणार नाही आणि स्वयंसेवक कोणतेही कार्यक्षेत्र सोडणार नाही, असे संघाचे सर्वसाधारण तत्त्व आहे. स्वयंसेवक शिक्षण, राजकारण, अर्थशास्त्र, संरक्षण, संस्कृती इत्यादी समाजाच्या सर्व क्षेत्रात कार्यरत आहेत. भारताला एक महान राष्ट्र बनवणे, हेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एकमेव उद्दिष्ट आहे. एक सशक्त हिंदू समाज निर्माण करण्यासाठी संघाला सर्व जातीतील लोकांना एकत्र व संघटित करायचे आहे.

**महात्मा गांधींच्या प्रश्नाला डॉ. हेडगेवारांचे उत्तर**

गांधीजींचा एक प्रश्न होता की डॉक्टरजींनी आपली संघटना काँग्रेससारख्या लोकप्रिय संस्थेच्या छायेखाली का सुरू केली नाही? काँग्रेसने आर्थिक मदत देण्यास नकार दिला होता का? उदारमतवादी लोकांची काँग्रेसमध्ये कमतरता होती का? यावर डॉक्टरांचे उत्तर होते 'काँग्रेसचे कार्य करीत असताना तिच्या छत्रछायेतच कायमस्वरूपी संघटना स्थापन करण्याचा आपला पहिला प्रयत्न होता. मात्र यश मिळाले नाही. प्रश्न केवळ पैशांचा नव्हता. पैशाच्या बळावर सर्व काही करता येत नाही. प्रश्न स्वयंसेवक संस्थेकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा होता. काँग्रेसमध्ये काम करणाऱ्या चांगल्या माणसांची संख्या बरीच होती. मात्र, त्यांचे सारे लक्ष नेहमीच राजकीय उद्दिष्टे साध्य करण्याकडे असते. त्यांची दृष्टी सहसा समकालीन राजकीय हितसंबंधांच्या पलीकडे जातच नाही. स्वयंसेवकांनी आमच्या (राजकीय नेत्यांच्या) कामांसाठी इकडे तिकडे धावले पाहिजे, हाच स्वयंसेवक संस्थेचा उपयोग आहे, असा त्यांचा (काँग्रेसी नेत्यांचा) दृष्टिकोन होता. राष्ट्रासाठी स्वयंप्रेरणेने कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांची निर्मिती करणाऱ्या सामर्थ्यशाली संघटनेची स्थापना ही त्यांच्या विचारशक्तीच्या पलीकडील बाब आहे. अशा परिस्थितीत त्यांच्याकडून देशाच्या नवनिर्मितीची अपेक्षा कशी करता येईल? त्यामुळे संघाची स्थापना आणि संघटना देशाच्या नवनिर्मितीचा एक प्रयत्न आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघात सर्व समान आहेत. इथे कुठल्याही भेदभावाचा प्रश्नच उद्भवत नाही. 'आदर्शवादी स्वयंसेवक' ही आमची भूमिका आहे आणि हेच संघाच्या वाढत्या सामर्थ्याचे रहस्य आहे.'' जर देशात काँग्रेसचे कार्य सुरू आहे तर मग राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची काय आवश्यकता आहे, या प्रश्नाचे उत्तर डॉक्टरजींच्या त्या टिप्पणीत सापडते. विशेष उल्लेखनीय गोष्ट म्हणजे म्हणजे ही टिप्पणी त्यांनी संघाच्या स्थापनेच्या पाच वर्षांतच लिहिली आहे.

डॉक्टरजी लिहितात, 'हिंदू संस्कृती हा हिंदुस्थानचा प्राण आहे. त्यामुळे हिंदुस्थानचे संरक्षण करायचे असेल तर हिंदू संस्कृतीचे संरक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य ठरते. जर हिंदुस्थानची हिंदू संस्कृतीच नष्ट होणार असेल व त्यामुळे हिंदू समाजाचे अस्तित्वच हिंदुस्थानातून नष्ट होणार असेल, तर उर्वरित जमिनीच्या तुकड्याला हिंदुस्थान किंवा हिंदुराष्ट्र कसे म्हणता येईल? कारण राष्ट्र हे जमिनीच्या तुकड्याचे नाव नाही. ही गोष्ट पूर्णपणे सत्य आहे. तरीही हिंदू धर्म आणि हिंदू संस्कृतीचे रक्षण आणि दररोज परधर्मीयांकडून हिंदू समाजावर होणाऱ्या विध्वंसक आक्रमणाकडे काँग्रेसकडून दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे या अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची आवश्यकता आहे. तरीही संघ काँग्रेसच्या कदापि विरोधात नाही. आमच्या राष्ट्रीय संस्कृतीच्या मार्गात अडथळा न ठरणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीत संघ काँग्रेसला सहकार्य करेल आणि आजपर्यंत करतही आला आहे.''

**भारताचा स्वातंत्र्यलढा**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे. जी डॉक्टर साहेबांच्या अथक परिश्रमाच्या संदर्भात समजून घेता येऊ शकते. कलकत्ता (कोलकाता) येथे डॉक्टरजींची श्यामसुंदर चक्रवर्ती मौलवी लियाकत हुसैन यांच्याशी घट्ट मैत्री होती. स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे सहकारी मौलवी लियाकत हुसैन आपल्या आयुष्यात खरे भारतीय होते. स्वदेशी आंदोलनात सक्रिय असताना त्यांनी तुर्की टोपी घालणे कायमचे सोडून दिले होते. त्या दिवसांत रत्नागिरीतील आठले नावाचा एक बॉम्ब निर्माता तरुण कलकत्त्यातील क्रांतिकारकांच्या संपर्कात आला. त्याने कलकत्त्याजवळच्या एका गावात क्रांतिकारकांना बॉम्ब बनवायला शिकवले. डॉ. हेडगेवार यांनी देखील बॉम्ब कसा बनवायचा हे त्याच्याकडून शिकून घेतले. मात्र, त्याच दरम्यान आठले याचे निधन झाले. त्याच्या पार्थिवावर डॉ. हेडगेवार आणि श्यामसुंदर चक्रवर्ती यांनी गुप्तपणे अन्त्यसंस्कार केले. क्रांतिकारक असतानाच डॉक्टरजींनी कधीही विवाह न करण्याचा संकल्प केला होता.

संघाचे वरिष्ठ अधिकारी बाबासाहेब आपटे सांगत असत की, १९३९ साल संपत आले होते आणि युरोपात दुसरे महायुद्ध सुरू होते. त्या डॉ. हेडगेवारांना रात्रंदिवस एकच चिंता सतावत होती की, महायुद्धाच्या या परिस्थितीत इंग्रजांची पाळेमुळे भारतातून उखडून टाकण्यासाठी तितकीच प्रभावी आणि शक्तिशाली संघटना स्थापन केली पाहिजे. त्यामुळे जेव्हा कोणीही स्वयंसेवक त्यांना ''डॉक्टर साहेब! आपल्या संघटनात्मक कार्यासाठी एका मोठ्या कार्यालयाची आवश्यकता आहे. संघाचे असे कार्यालय नाही. तुम्ही ते बांधण्याचा विचार करा,'' असे आग्रहपूर्वक म्हणायचा तेव्हा डॉक्टरजी म्हणायचे, 'अरे आजच्या घडीला संघकार्य वाढविण्याची नितांत आवश्यकता आहे. तेव्हा तुमची सर्व शक्ती त्यात लावा, नाहीतर तुम्ही जे भव्य कार्यालय बांधाल त्यातच इंग्रज थाटात आपली कचेरी उघडून आरामात बसतील. अर्थातच ब्रिटिशांची गुलामगिरी डॉक्टरांना कायम सलत होती, हे स्पष्ट दिसते.

संघाचे सरकार्यवाह राहिलेले भैयाजी दाणी देखील लिहितात की, इंग्रज सरकारचा आपल्यावर कोप होईल याची मुळीच पर्वा न करता डॉक्टरजींनी त्यांच्या शाळेत 'वंदे मातरम'चा उद्घोष केला, भलेही यासाठी त्यांना ती शाळा सोडावी लागली.''

आपल्या क्रांतिकारी जीवनात डॉ. हेडगेवार यांनी स्वतः शस्त्रे वापरली, तीही इतक्या सावधगिरीने की तत्कालीन इंग्रज सरकारला संशय येऊनही ते त्यांना पकडू शकले नाहीत. त्यांच्या या सशस्त्र आंदोलनामुळे ब्रिटीश राज्यकर्त्यांमध्ये चांगलीच दहशत निर्माण झाली आणि लोकांमध्ये ब्रिटिश सरकारबद्दल असंतोष निर्माण झाला. डॉक्टरजींना मातृभूमीचे स्वातंत्र्य हवे होते आणि देशाचे स्वातंत्र्य आपल्या जिवंतपणीच पहावे ही त्यांची प्रखर इच्छा होती आणि त्या दिशेने त्यांना निश्चित पावले टाकायची होती. प्रखर क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर, त्यांचे थोरले बंधू गणेश दामोदर सावरकर आणि धाकटे बंधू डॉ. नारायण दामोदर सावरकर, वामनराव जोशी, बॅरिस्टर अभ्यंकर आणि सुभाषचंद्र बोस त्यांचे स्नेही होते. सन १९२२-२३ मध्ये पुलगाव येथे वर्धा तालुका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत स्वराज्याचा प्रस्ताव मांडला गेला तेव्हा त्यात अहमदाबाद-काँग्रेसने स्वीकारलेला 'स्वराज्य' शब्दाचा अर्थ काही लोकांनी 'ब्रिटिश साम्राज्यातर्गत स्वराज' असा केला. पण डॉक्टरजींना हे कदापि मान्य नव्हते. ते ब्रिटीश राजवटीपासून पूर्णपणे मुक्त, स्वतंत्र असे स्वराज्य हेच खरे स्वराज्य असे मानत असत. कारण ते प्रखर स्वातंत्र्यवादी होते आणि म्हणून जेव्हा डॉक्टरजींनी परिषदेत स्वराज्याचा प्रस्ताव मांडला तेव्हा त्यात त्यांनी 'ब्रिटिश राज्य विरहित स्वराज्य' अशी दुरुस्ती सुचवली.

डॉ. हेडगेवार आणि संघ हे एकमेकांचे समानार्थी शब्द होते. जेव्हा जेव्हा कोणत्याही प्रभावशाली व्यक्तीचे निधन होते, तेव्हा तिच्याशी संबंधित असलेल्या संस्थेला कधीही न भरून येणारे नुकसान सहन करावे लागते. संघाबद्दल देखील त्याचे मित्र आणि मत्सराने ग्रासलेले, दोन्ही प्रकारचे लोक असाच विचार करीत होते. पण एका अर्थपूर्ण व उदात्त कार्यासाठी समर्पित असलेल्या या सारथीने संघाला कालजयी केले. म्हणूनच लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'मराठा' या इंग्रजी वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर २३ ऑगस्ट १९४० रोजी ठळकपणे प्रकाशित झालेल्या बातमीचे शीर्षक होते 'डॉ. हेडगेवार्स संघ स्टील गोईंग स्ट्राँग.

काँग्रेसची मुस्लिम तुष्टीकरणाची धोरणे डॉ. हेडगेवारांनी ज्या काळात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली तो काळ मुस्लिम तुष्टीकरणाचा होता. १९२० मध्ये भारतात खिलाफत चळवळ सुरू झाली. मुसलमानांचे नेतृत्व मुल्ला-मौलवींच्या हातात होते. या काळात मुसलमानांनी देशात अनेक दंगली घडवून आणल्या. (शेष पान २ वर...)

## इतिहास

# राणी दुर्गावतींचे अद्वितीय युद्धधोरण

राणी दुर्गावतीचे गोंडवाना राज्य अतिशय समृद्ध असून राज्यात सर्वत्र समृद्धी, सुबत्ता, शांती आहे आणि राणीच्या राजवटीखालील प्रजा अतिशय सुखी व आनंदी आहे, असे खुद्द कडा आणि माणिकपूरचा सुभेदार आसफखान याने दिल्लीच्या मोगल दरबारात जाहीरपणे सांगितले होते. धूर्त, वासनांध आणि चलाख बादशहा अकबराला वाटले ही दुर्बळ व विधवा राणी काय आपल्या प्रजेचे संरक्षण करणार? विधवा राणीला असहाय समजून त्याने गोंडवाना राज्य ताब्यात घेण्याच्या इराद्याने राणी दुर्गावतीला शरण येण्याची धमकी दिली आणि आपल्या दूताद्वारे पत्र पाठवले. ''अपनी सीमा राज की, अमल करो परमान। भेजो नाग सुपेत सोई, अरू अधार दीवान।। असे त्याने पत्रात नमूद केले.

पण गोंडवानाची निर्भीड, स्वाभिमानी, स्वातंत्र्यप्रिय आणि स्व ची प्रतिमूर्ती शूर राणी दुर्गावतीने अकबराची मागणी ठोकरून लावली. मग अकबराचा आणखी एक संदेश आला की स्त्रियांचे काम कातणे आहे. तेव्हा राणीने प्रत्युत्तरात आपल्या संदेशासह सोन्याची अंगठी बादशहाला पाठवली आणि म्हणाली की तुमचे काम देखील कापूस वेचणे हे आहे. राणीचे हे बाणेदार उत्तर ऐकून अकबर ज्वालामुखीसारखा भडकला. अतिशय संतप्त होऊन त्याने सुभेदार आसफ खानाला गोंडवाना साम्राज्याचा विनाश व लूट करण्यासाठी पाठवले. तत्पूर्वी अकबराने अनुक्रमे गोप महापात्र आणि नरहरी महापात्र या दोन हेरांना अर्थात गुप्तचरांना गोंडवनात पाठवले. पण चतुर व चाणाक्ष वीरांगना राणी दुर्गावतीने या दोघांनाही आपल्या बाजूने वळविले. त्यांनी राणी दुर्गावतीला अकबराची योजना आणि आसफ खानाच्या संभाव्य आक्रमणाविषयी सर्व काही सांगितले.

**राणी दुर्गावतीच्या मोगलांशी झालेल्या ६ भीषण लढाया**

मोगल सेना गोंडवनावर चालून येणार याची माहिती आधीच मिळाल्याने राणी दुर्गावती कमालीची सावध झाली आणि तिने सिंगौरगडावर ठाण मांडले. आसफ खान ६ हजार घोडदळ, १२ हजार पायदळ आणि तोफखाना तसेच स्थानिक मोघल सरदारांसह सिंगोरगड येथे येऊन धडकला. दुसरीकडे खुद्द राणी दुर्गावती, तिचा पुत्र वीर नारायण सिंह, आधार सिंह, गजदल सेनापती अर्जुनसिंह बैस, कुंवर कल्याणसिंह बघेला, चक्रमण कलचुरी, महारुख ब्राह्मण, वीर शम्स मियानी, मुबारक बिलुच, खान जहान डकीत यांनी मोर्चा सांभाळला. मुख्य म्हणजे राणी दुर्गावतीची बहीण कमलावती आणि पुरागडची राजकुमारी (वीर नारायण सिंहची होणारी पत्नी) महिला पथकाचे नेतृत्व करीत होत्या. युद्ध लगेच सुरू झाले.

**आसफखानाची दाणादाण**

आसफ खान सिंगोरगड येथे चालून आला. आपल्या बलाढ्य फौजेच्या बळावर राणीच्या सेनेला आपण सहज नमवू असे त्याला वाटत होते. त्याने शरणागती पत्करण्यास सांगितले. वीरांगना राणी दुर्गावती म्हणाली, 'राज्यकर्त्यांच्या नोकराशी या संदर्भात बोलता येणार नाही. एवढे बोलूनच राणी थांबली नाही तर तिने तलवार हाती घेऊन मोगली सैन्यावर जबरदस्त हल्ला चढविला. राणीचा हा भीषण आवेश व प्रखर पराक्रम पाहून मोगल सैनिक गर्भगळित झाले. राणीने स्वतः आघाडीवर राहून मोगली सैन्याशी दोन हात करीत त्यांची अक्षरशः दाणदाण उडविली. तिचा रुद्रावतार पाहून मोगलांचे पाय लटपटले. मोगल सैनिकांना राणीच्या फौजेने कापून काढले. राणी दुर्गावती तलवार उगारत आसफखानाच्या दिशेने वेगाने येऊ लागली. आपली आता धडगत नाही, हे लक्षात येताच खुद्द सुभेदार आसफ खान फौजेसह पळत सुटला आणि कसाबसा गोंड सैनिकांच्या गराड्यातून निसटला.

सिंगोरगडची दुसरी लढाई : पहिल्या युद्धाप्रमाणेच दुसऱ्या युद्धातही मोगलांची दाणादाण उडाली. पण, यावेळी त्यांचे नशीब जोरावर होते. वास्तविक मोगल सैनिकांवर पुन्हा पळून जाण्याची वेळ आली होती. पण, ऐन शेवटच्या क्षणी मोगलांचा तोफखाना युद्धस्थळावर पोहोचला. राणीला याची माहिती मिळाली. तिने सिंगोरगड सोडून दिले आणि गढा येथे ती फौजेसह रवाना झाली.


**सिंगोरगडची तिसरी लढाई**

गोंडवाना सेनेचे सेनापती अर्जुनसिंग बैस यांनी जबरदस्त पराक्रम गाजवून मोगलांना मागे हटण्यास भाग पाडले. पण पुन्हा आधीप्रमाणेच येथेही मोगलांचा तोफखाना वरचढ ठरला. त्यामुळे डावपेच म्हणून किल्ला सोडून देण्यात आला.

**चंडाल भाटा (अघोरीचे युद्ध)**

मोगल आणि राणीच्या सैनिकांमधील हे चौथे युद्ध होते. कुठल्याही परिस्थितीत मोगल सैन्याला परतवून लावायचेच, हेच गोंडवाना लष्कराचे उद्दिष्ट होते. कारण मोगलांना मागे हटविले तरच वीरांगना राणी दुर्गावती गढा येथून बरेलाच्या घनदाट जंगलात जाऊ शकत होती. अखेर चंडाल भाटाच्या मैदानात आणखी एक घनघोर युद्ध झाले. राणी दुर्गावतीचे सैनिक कमालीच्या आवेशाने लढत होते. खुद्द सेनापती अर्जुनसिंह बैस आघाडीवर राहून आपल्या सैनिकांचे मनोबल वाढवत होता. त्याने खुद्द सुभेदार आसफ खानच्या दिशेने धडक मारली आणि अतिशय जोरात युद्ध केले. सेनापती अर्जुनसिंहने एवढे भयंकर युद्ध केले की आसफखानला पुन्हा पळून जावे लागले. पळून जाणाऱ्या आसफखानचा अर्जुनसिंहने जोरात पाठलाग सुरू केला आणि त्याला खूप दूरपर्यंत पिटाळून लावले. इकडे राणी दुर्गावतीने मोगली तोफखान्याचा सामना करण्यासाठी एक जबरदस्त रणनीती आखली, त्यानुसार बरेला (नरई) च्या अरुंद आणि घनदाट जंगलाच्या बरोबर मध्यभागी ठाण मांडले. यामुळे मोगली तोफगोळे तेथपर्यंत पोहोचू शकले नाहीत.






**गौर नदीचे युद्ध**

तोफखाना वाहून नेण्यासाठी आसफ खानने गौर नदीवर पूल बांधला. तो पूल उद्ध्वस्त करण्यासाठी गेलेले महारथी अर्जुनसिंह बैस लढताना हुतात्मा झाले. वीरांगना राणी दुर्गावतीच्या जीवनातील १५ व्या मोठ्या आणि मोगलांसोबतच्या पाचव्या युद्धाला २२ जून १५६४ रोजी प्रारंभ झाला. स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि शौर्याची देवी - जगातील सर्वात महान योद्धा राणी दुर्गावतीला सकाळीच सेनापती अर्जुनसिंह बैस यांच्या बलिदानाची बातमी मिळाली. शत्रू उंबरठ्याशी येऊन ठेपला होता. राणीने तातडीने सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन 'अर्धचंद्र व्यूह' बनवला आणि 'गौर नदीच्या युद्धा'त सुभेदार आसफखानसह मोगल सैन्यावर जोरदार हल्ला केला आणि मोगलांनी उभारलेला पूल पार उद्ध्वस्त करून टाकला जेणेकरून शत्रूचा तोफखाना नरई (बरेला) येथे पोहोचू शकणार नाही. राणीची व्यूहरचना अगदी अचूक ठरली. मोगली सेनेची अक्षरशः दाणादाण उडाली. त्यांची पळापळ सुरू झाली, मोगल सैन्य पांगले आणि वाट दिसेल तिथून पळत सुटले. राणी दुर्गावतीने पुन्हा रात्री मोगलांवर हल्ला करण्याची योजना आखली होती. परंतु वरिष्ठ सेनाधिकाऱ्यांचे एकमत होत नव्हते. त्यामुळे राणीला निर्णय बदलावा लागला. मात्र, ही फार मोठी चूक ठरली, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे. त्याच रात्री मोगली फौजेवर पुन्हा हल्ला चढविला असता तर सुभेदार आसफखानचा निर्णायक पराभव झाला असता व सारा इतिहासच बदलून गेला असता, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

> **गोंडवानाच्या रक्षणाची स्फूर्ती गाथा**
>
> राणी दुर्गावतींचे गोंडवाना राज्य अतिशय समृद्ध असून राज्यात सर्वत्र समृद्धी, सुबत्ता, शांती आहे आणि राणीच्या राजवटीखालील प्रजा अतिशय सुखी व आनंदी आहे असे खुद्द कडा आणि माणिकपूरचा मोगल सुभेदार आसफखान याने दिल्ली दरबारात बादशाह अकबराला जाहीरपणे सांगितले होते. याचे इतिहासात विविध दाखले आहेत.

**नरईचे भयंकर युद्ध आणि राणी दुर्गावतींचे बलिदान**

अखेर, वीरांगना राणी दुर्गावतीने नरईच्या दिशेने कूच केले. युद्धात तिने 'क्रौंच व्यूह' रचला. २३ जून १५६४ रोजी नरई येथे पहिली चकमक झाली. राणी व तिच्या सैनिकांनी मोगलांची पार दुर्दशा केली. सुभेदार आसफखानसह मोगली सेना पुन्हा पळत सुटली आणि घाबरून बरेला पर्यंत पोहोचली. २३ जूनच्या रात्री मोगलांचा तोफखाना गौर नदी पार करून बरेला येथे दाखल झाला. मात्र, २३ जूनच्या रात्री राणीविरुद्ध घातक कटकारस्थान रचण्यात आले. आसफ खानने राणीचा एक सामंत अर्थात जहागीरदार बदनसिंह याला लाच देऊन आपल्या बाजूने वळवून घेतले. त्याने राणीची रणनीती उघड केली. उद्या युद्धात राणी मोगलांना घनदाट जंगलाकडे येण्यास भाग पाडेल, जिथे तोफखाना उपयोगी ठरणार नाही आणि सर्व मोगल सैनिक मारले जातील, अशी ती व्यूहरचना होती. फितूर बदनसिंहने ही व्यूहरचना मोगल सुभेदाराला सांगितली. हे ऐकून आसफखान घाबरला. त्याने यावर काय उपाय करता येईल, असे बदनसिंहला विचारले. तेव्हा बदनसिंहने सांगितले की नरई नाला कोरडा पडला आहे आणि त्याच्या जवळ एक डोंगरी तलाव आहे. जर त्या तलावाचा बांध फोडला तर नरई नाला पाण्याने भरून जाईल आणि राणीला तो ओलांडता येणार नाही आणि त्यामुळे तिच्या सैनिकांवर तोफांचा थेट मारा करता येईल. वास्तविक राणीला काहीतरी अप्रिय होण्याचे संकेत आधीच मिळाले होते. तिने रात्रीच हल्ला करण्याचा प्रस्ताव च्या वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांसमोर ठेवला. परंतु त्यांनी तो मान्य केला नाही. शेवटी युद्धाची अंतिम घटिका समीप आली. शूर राणी दुर्गावतीने 'क्रौंच व्यूह' रचला. सारस पक्षासारखे सैनिक गोळा केले. २४ जून १५६४ रोजी सकाळी १० च्या सुमारास भयंकर युद्ध सुरू झाले आणि पहिल्याच हल्ल्यात मोगलांची पार दाणादाण उडाली. मोगलांनी तीनदा हल्ला केला आणि गोंड सैनिकांनी तिन्ही वेळेस जबरदस्त प्रतिकार करून मोगलांना परतवून लावले. त्यामुळे मोगलांनी तोफखान्याच्या दिशेने आघाडी उघडली. राणी दुर्गावती ठरवलेल्या योजनेनुसार घनदाट जंगलाकडे वाटचाल करू लागली. पण फितूर बदनसिंहाच्या योजनेनुसार डोंगरावरील तलावाची भिंत फोडण्यात आली. त्यामुळे नरईत पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे राणी दुर्गावती या पुरात अडकली. दरम्यान, दुपारी ३ वाजताच्या सुमारास वीरनारायण जखमी झाल्याची बातमी आली. पण शूर राणी दुर्गावती अजिबात डगमगली नाही. डोळ्याला बाण लागल्यावरही तिने युद्ध सुरूच ठेवले. दुसरीकडे मोगल सैन्याचीही अवस्था वाईट होती. पण अचानक एक बाण राणीच्या मानेवर लागला. अखेर अधरसिंहने सरमन हत्तीच्या माहुताला माघार घेण्याचा आदेश दिला. आपण आता फार काळ जिवंत राहू शकणार नाही, हे राणीला समजले. म्हणून तिने स्वतःलाच मारण्याचा आदेश अधरसिंहला दिला. मात्र, अधरसिंहने वीरांगनेस मारण्यास नकार दिला. कुठल्याही परिस्थितीत मोगलांच्या हाती जिवंत सापडायचे नाही, हा राणीचा निर्धार होता. अखेर शूर राणी दुर्गावतीने स्वतःच्याच पोटात खंजीर खुपसून सर्वोच्च बलिदान दिले. या लढाईत राणीच्या ७०० सैनिकांना हौतात्म्य आले. तर दुसरीकडे मगशगलांचे २००० सैनिक ठार झाले.


(पांचजन्यवरून साभार)

सोलापूर तरुण भारत न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### अहिल्यादेवी होळकर सभागृहाचे उद्‌घाटन राणा पाटलांनी रखडवीले: डॉ.सोनकाटे

**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**



कळंब तालुक्यातील चोराखळी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने ७३ लाख रुपये खर्च करुन सभागृहाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. मात्र त्याचे उद्घाटन करण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील हे जाणून बुजून अडथळा निर्माण करीत असल्याचा गंभीर आरोप धनगर समाजाच्या नेत्या डॉ. स्नेहा सोनकाटे यांनी दि.१० ऑक्टोबर रोजी केला. दरम्यान, चार कोटी रुपयांचा निधी पापनास परिसराच्या विकासासाठी उपलब्ध करून देण्यासाठी शासन दरबारी प्रस्ताव दाखल केला आहे. त्यास राणा पाटलांनी विरोध केल्यामुळे ती फाईल मंत्रालयात अद्यापही तशीच पडून असल्याचा आरोप त्यांनी केला. शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. पुढे बोलताना डॉ.सोनकाटे म्हणाल्या की, बहुजन समाजाला सांस्कृतिक कार्यक्रम करता यावे यासाठी राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये सांस्कृतिक सभागृह बांधण्याचा प्रस्ताव तत्कालीन खासदार विकास महात्मे यांच्याकडे मांडला. खासदार महात्मे व ओबीसी नेत्या पंकजा यांच्या माध्यमातून डॉ.स्नेहा सोनकाटे त्यासाठी प्रयत्न करून राज्य सरकारने १५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले असल्याचे त्यांनी सांगितले.

### आचारसंहितेपूर्वी १०० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घ्या : वैद्य नवनाथ दुधाळ

**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

गोवंश संवर्धन व तिचे जतन करण्यासाठी जगद्गुरु शंकराचार्यजी, अभिमुक्तेश्वरानंदजी महाराज यांच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षापासून देशभरात जनजागृती व चळवळ मोठ्या प्रमाणात सुरू आहे. त्याला यश आले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गोवंशासाठी म्हणजेच गायींसाठी प्रती दिन ५० रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. त्याऐवजी १०० रुपये अनुदान देण्यात यावे. हे अनुदान फक्त गोशाळा रजिस्टर असलेल्यांनाच देण्यात येणार आहे. त्यामुळे इतर गो-पालकांवर अन्याय होत असून ज्या शेतकऱ्यांकडे एक गाय आहे, अशा सर्वांना सरसकट १०० रुपये विनाअट देण्याचा निर्णय आचारसंहिता लागण्यापूर्वी घेण्यात यावा, अशी मागणी गो-संसद प्रदेश संयोजक वैद्य नवनाथ दुधाळ यांनी केली आहे. दरम्यान, गोमातेला राज्य मातेचा दर्जा दिल्याबद्दल सरकारचे अभिनंदन देखील त्यांनी केले.

### स्कॉश स्पर्धेसाठी सतीश हुंडेकरीची निवड

**जळकोट, दि.१२ ऑक्टोबर -**

धाराशिव येथील तुळजाभवानी क्रीडा संकुल येथे घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय १९ वर्षांखालील मुलांच्या स्कॉश क्रीडा स्पर्धेत जळकोट (ता.तुळजापूर) येथील राजर्षी शाहू कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाच्या यशराज सतीश हुंडेकरी या खेळाडूने प्रथम क्रमांक पटकावला. त्याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल माजी जि. प.सदस्य प्रकाश चव्हाण, प्राचार्य संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका पवार यांनी त्याचे अभिनंदन करून अमरावती येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास क्रीडाशिक्षक प्रा.सुरेश कोकाटे,प्रा.बालाजी राठोड यांचे मार्गदर्शन लाभले. शिक्षक गुरव, ढोले, पांढरे, मुक्काम, श्री. हाके, साबळे, लबडे, ज्योतिताई राठोड, खारे, चव्हाण एस. एस., कारले, कांबळे, कदम, चौगुले, कांबळे आदी यावेळी उपस्थित होते.



### सन अ‍ॅन्ड ओशन ग्रुपच्या वतीने तुळजापूरकडे जाणाऱ्या भाविकांना अन्नदान

**मंगरुळ, दि.१२ ऑक्टोबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे आणि सन अ‍ॅड ओशन ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या वतीने तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरकडे जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी अन्नदान करण्यात आले. सध्या नवरात्र महोत्सव मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा केला जात आहे. दूरवरून भाविक भक्त माता तुळजाभवानीच्या दर्शनासाठी जात असतात. तुळजाभवानीच्या दर्शनासाठी तुळजापूरकडे जाणाऱ्या भाविक भक्तांसाठी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही जिल्हाध्यक्ष महेंद्र काका धुरगुडे आणि सन अ‍ॅड ओशन ग्रुप ऑफ कंपनीज मंगरूळ ता.तुळजापूर यांच्यावतीने अन्नदान करण्यात आले. या अन्नदानाचा महिला, लहान मुले, वृद्ध, युवक, युवती आदी भाविक भक्तांनी मोठ्या प्रमाणात आस्वाद घेतला. याप्रसंगी जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे यांच्यासोबत सामाजिक न्याय विभाग जिल्हाध्यक्ष अतुल जगताप, धाराशिव युवक तालुकाध्यक्ष बालाजी शिंदे, सन अ‍ॅड ओशन कंपनीचे अधिकारी, कर्मचारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजलगाव अत्याचारप्रकरणी आरोपीस फाशी देण्याची सराफा असोशिएशनची मागणी

**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

माजलगाव बीड येथील चिमुकलीवर झालेल्या लैंगीक अत्याचार प्रकरणी आरोपीस कठोर कार्यवाही करण्याची धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशनच्या वतीने मागणी करण्यात आली. माजलगाव येथे लहान चिमुकल्या मुलींवर शाळेतला नराधम शिक्षकांनी अमानुषपणे अत्याचाराची बाब निंदनीय आहे. याचा धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशनच्या वतीने जाहीर निषेध व्यक्त केला जात आहे. प्रकरण हे फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून नराधमास फाशीची शिक्षा द्यावी, अशी मागणी धाराशिव जिल्हा सराफ व सुवर्णकार बांधवांच्या वतीने करण्यात आली. धाराशिव जिल्हा सराफ सुवर्णकार फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता माळी, जिल्हा कार्यध्यक्ष कृष्णा डहाळे, जिल्हा सचिव मयूर जालणेकर, कोषध्यक्ष सचिदानंद पोतदार, जिल्हा संघटक राजेश कदम, तानाजी मुंढे, श्रीकृष्णा नाईकनवरे, वैभव बोंदरे, संतोष थडवे, रघुवीर चित्राव, योगेश शहाणे, विकास टेहरे, उमेश बांगर, प्रतिराज महामुनी, राम तळणकर, नागेश शहाणे, राजू पंडित, भागवत थडवे, बालाजी डहाळे, विरभद्र हांडेकर, पिंटू मालेगावकर श्रीनिवास शहाणे, राजू कारागीर आबा वेदपाठक, आकाश फिसरेकर, प्रविण जरे, संदीप टोणपे, बालाजी इंगळे, महादेव हांडेकर बहुसंख्येने सराफ व सुवर्णकार बांधव उपस्थित होते.

## होमहवनानंतर पुरणपोळी कडकण्याचा नेवैद्य वाढवण्यात येऊन घटोत्थापन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**



येडेश्वरी देवीचा नवरात्र उत्सवातील उत्तररात्री होमहवण पूजेला सुरुवात करण्यात येऊन उत्तररात्री ते पहाटेपर्यंत चाललेल्या हवन पूजेनंतर पहाटे कोहळ्याची संपूर्ण आहुती देऊन आश्विन शुद्ध ९ शनिवार दि.१२ नवमीला होम हवन करण्यात आले. नवरात्रीच्या उपवासानंतर पूर्ण आहुती होम हवनानंतर पुरणपोळी कडकण्याचा नेवैद्य वाढवण्यात येऊन घटोत्थापन करण्यात आले.



अराध्ददैवत आई येडेश्वरी देविच्या नवरात्र महोत्सवातील नवव्या माळेनिमित्त होम हवन आहुती पारणे पार पडल्यानंतर देविचे मानकरी अमोल पाटील, यशवंत पाटील, देवस्थानचे अध्यक्ष बापु बेदरे यांच्या शुभहस्ते देविची महापुजा, महाआरती करण्यात येऊन देविच्या मुख्य मंदीरातील घटाचे घटोत्थापन करण्यात आले भागातील भाविकांनी व आई राजा उदो उदो...च्या जयघोषानै मंदीर परिसर गजबुजुन गेला होता.

दि.१२ अश्विन शुध्द महाअष्टमीला उत्तररात्री होमहवन पूजेला प्रारंभ करण्यात आला.

यावेळी देवीची बखाड्या लिंबाच्या पत्रीच्या पानाने देवीच्या तांदळावर बारवाची शुभमहापुजा मांडण्यात आली होती. पहाटे ६ वा सुर्योद्य समयी देवीचे मुख्य मानकरी यांच्याहस्ते होमहवन, पुर्णाहुती पारण्याची विधिवत महापुजा, महायज्ञ करण्यात आला व होमामध्ये कोहळ्याची पुर्णाहुती देण्यात येऊन देवीच्या मंदीरातील घटोत्थापन करण्यात आले.

यावेळी देवीस पुरणपोळी नैवैद्यासह कडकणे नैवैद्य मुख्य मानकरी पाटील, देशमुख, बारकुल यांच्यासह पुजारी मंडळी, ग्रामस्थ, भाविकांकडुन देवीस वाढवण्यात आला. यावेळी सर्वत्र आई राजा उदो..उदो..च्या जयघोषाने मंदीर परीसर दुमदुमुन गेला होता. यावेळी मानकरी, खांदेकरी, पुजारी मंडळी, पोलीस प्रशासन, ग्रामस्थ व राज्यासह इतर राज्यातील भाविक उपस्थीत होते.

## नवरात्रीमध्ये अनोखे कन्या पूजन, अहिल्या पूजन



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

उज्वला कुलकर्णी यांच्या पुढाकाराने व शताक्षी महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमाने अष्टमी निमित्त अमेरिका येथील बहीण शिल्पा अजय डांगरे व पुणे येथील अपर्णा पुराणिक आणि अश्विनी कुलकर्णी यांनी जिल्हा परिषद शाळा बालाजी नगर व जिल्हा परिषद शाळा शेकापूर येथील दोन्ही शाळेत कन्या पूजन केले.

यावेळी त्यांच्या मातोश्री रत्नमाला देशमुख ही आल्या होत्या. मुलींसाठी ज्वेलरी किट आणि शाळेतल्या सर्वांना खाऊ वाटप करण्यात आले. लोकमाता अहिल्याबाई होळकर यांच्या ३५० व्या जयंतीनिमित्त दोन्ही शाळांना अहिल्यादेवींच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. उज्वला मसलेकर यांनी अहिल्याच्या गोष्टी हा विषय मांडला. या कार्यक्रमास शाळेचे सर्व पदाधिकारी व शिक्षक वृंद यांनी ही या उपक्रमाचे कौतुक केले आणि स्वतः कर्यक्रमाचे नियोजन करून सहकार्य केले. या कार्यक्रमास वर्षा आचार्य, अस्मिता बेंबळीकर, पुष्पा डोळे उपस्थित होत्या. प्रत्यक्ष हजर न रहाता आपल्या गावी एक सामाजिक बांधिलकीची जाणीव व कृतज्ञता व्यक्त करण्याची या भगिनींची ही पद्धत खरोखरचं कौतुकास्पद आहे.

## धाराशिव येथील मुला-मुलींच्या २ शासकिय वसतिगृहांच्या इमारतीचे ऑनलाईन लोकार्पण

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

जिल्हयातील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या मुला-मुलींच्या २ शासकिय वसतिगृहांच्या इमारतीचे लोकार्पण केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते ९ ऑक्टोबर रोजी ऑनलाईन पध्दतीने करण्यात आले. अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तर प्रमुख अतिथी म्हणून इतर मागास बहुजन कल्याण तथा गृहनिर्माण मंत्री अतुल सावे यांची उपस्थिती होती.

धाराशिव जिल्हयातील मुलां-मुलीच्या वसतिगृहाचे लोकार्पण कार्यक्रमाला इतर मागास बहुजन कल्याणचे सहायक संचालक बी.जी.अरवत यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी विद्यार्थी व पालक तसेच इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

## अ‍ॅड.अनिल काळे यांच्या संकल्पनेतून काटीत साकारण्यात आलेल्या तुळजापूर शुगर प्रा.लिमिटेडचा बॉयलर अग्निप्रदिपन समारंभ

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

तुळजापूर तालुक्यातील काटी येथे विजयादशमीच्या मुहूर्तावर येथील काटी-धामणगाव रोडवर भाजपचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड.अनिल काळे यांच्या संकल्पनेतून साकारण्यात येत असलेल्या तुळजापूर शुगर प्रा. लिमिटेड या गुळ पावडर कारखान्याचा विविध मान्यवर व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उपस्थितीत कारखान्याचा पहिल्या हंगामाचा पहिला बॉयलर अग्निप्रदिपनाचा तुळजापूर शुगरचे चेअरमन अ‍ॅड.अनिल काळे यांच्या हस्ते समारंभ पार पडला.

काटीसह परिसरातील गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा शेतात उभा असलेला ऊस चिंतेचे कारण ठरत होता.

कारखानदार ऊस नेत नसल्याने या परिसरात अनेक शेतकऱ्यांनी आपले ऊसाचे क्षेत्र कमी केले. मागील तीन-चार वर्षांपासून या भागात पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे या भागात ऊसाचे क्षेत्र देखील वाढणार आहे.

काटी येथे साकारण्यात येत असलेल्या तुळजापूर शुगर गुळ पावडर कारखान्याची गाळप क्षमता ही दिवसाला एक हजार टणाची असून हंगाम पुर्ण होईपर्यंत दोन लाख टणाचे गाळपाचे उदिष्ट असून शेतकरी हाच केंद्रबिंदू मानून शेतकऱ्यांना त्यांच्या वाहतुकीसह ऊसाचे पैसे देखील वेळेत देण्यासाठी कारखान्याची वाटचाल राहणार आहे.

या भागातील शेतकऱ्यांचा ऊस हंगाम निघून गेला तरी शेतातला ऊस कारखान्याला जात नव्हता. अ‍ॅड.अनिल काळे यांनी ऊस उत्पादक शेतकरी मोठा झाला पाहिजे हे ध्येय ठेवून तुळजापूर शुगर गुळ पावडर कारखाना हि संकल्पना पुढे आणत या भागातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी तुळजापूर शुगर गुळ पावडर कारखान्याच्या माध्यमातून पर्याय निर्माण झाला आहे.

काटीसह परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी,नागरिक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी तुळजापूर शुगरच्या बॉयलर अग्निप्रदिपनाच्या कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तुळजापूर शुगरचे चेअरमन अ‍ॅड.अनिल काळे यांनी केले आहे.

## श्री साई श्रद्धा एज्युकेशनच्या वतीने वैद्यकीय प्रवेशित विद्यार्थ्यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**



धाराशिव येथील साई श्रद्धा एज्युकेशनच्या वतीने २०२४ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय महाविद्यालय प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा नीट ऑनलाइन टेस्ट सिरीजच्या पाचव्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून सत्कार करण्यात आला.

यावेळी एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर येथे प्रवेशित झाल्याबद्दल प्रथम गांधी, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय धाराशिव येथे प्रवेशित झाल्याबद्दल जानवी गरड, मुस्कान पठाण, अंजली कांबळे, बीएएमएस कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल श्रेया भंडारे, निकिता गुंडरे, श्रीनिवास गिरी, काकडे नेहा, अपर्णा सुरवसे, भक्ती चौधरी, कल्याणी बचुटे, आगळे सानिका, ढेकणे वैष्णवी, पडवळ अमिषा, वाघमारे श्रावणी, गौरी ढवळे, तेजल तवले, एकता भोसले, सोनाली चित्राव, सुप्रिया भोसले, मानसी देडे, वैष्णवी कोरे व मुलांमध्ये श्रेयस गंगथडे, प्रवीण सावंत, सागर भक्ते व संघर्ष मस्के या विद्यार्थ्यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी विक्रम गरड, हरिश्चंद्र गुंडरे, अशोक कांबळे, सादिक पठाण, उत्तम काकडे, गणेश गंगथडे, नामदेव भाकरे, अनिल सुरवसे, संतोष चौधरी, बाळासाहेब सावंत, प्रमोद बचुटे, नेताजी आगळे, बालाजी भक्ती, अरुण ढेकणे, अनिल पडवळ, शशिकांत कोठावळे, सुरेश वाघमारे, धनराज ढवळे, रामानंद तवले, संताजी भोसले, राजकुमार मस्के, साधू भोसले उपस्थित होते. संस्थेच्या संचालिका उषा लांडगे, पत्रकार प्रशांत सोनटक्के, श्रद्धा लांडगे विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## डी.फार्मसी इन्स्टिट्युट येथे नवीन बी.फार्मसी पदवी अभ्यासक्रमास मान्यता

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित डी. फार्मसी इन्स्टिट्युट येथे नवीन बी. फार्मसी पदवी अभ्यासक्रम प्रवेक्ष क्षमता-६० विनाअनुदानित तत्वावर चालू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रम चालू केल्याबद्दल आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील, सचिव प्रेमाताई पाटील व मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील यांचे अभिनंदन गोरख देशमाने, प्राचार्य यांनी केले आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी कॉलेजला पसंतीक्रम द्यावा असे आवाहन करण्यात येत आहे.



## पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ मंजुर; व्हॉईस मीडियाचा जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

राज्य शासनाने वृत्तपत्र विक्रेते व पत्रकारांसाठी स्वतंत्र्य विकास महामंडळास नुकतीच कबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली. या निर्णयाचा परंडा व्हाईस आफ मीडिया तालुका संघटनेच्यावतीने फटाके फोडुन, पेढे वाटुन आनंदोत्सव साजरा करण्यात आला. कबिनेट मंत्रीमंडळ बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वृत्तपत्र विक्रेते व पत्रकार यांच्यासाठी स्वतंत्र्य विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या निर्णयाचे स्वागत करुन परंडा व्हॉईस आफ मीडिया तालुका संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री व सर्व मंत्रीमंडळाचा अभिनंदनाचा ठराव घेऊन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात फटाके फोडुन,पेढे वाटुन आनंदोत्सव साजरा केला. यावेळी धाराशिव जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश काशीद, मुजीब काझी, व्हाईस ऑफ मीडिया मराठवाडा उपाध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, प्रमोद वेदपाठक, तानाजी घोडके, श्रीराम विद्वत, रविंद्र तांबे, साजिद शेख, संतोष शिंदे, दत्ता नरुटे, हणमंत मस्तुद, फारुख शेख, विजय मेहेर, समीर ओव्हाळ, रावसाहेब काळे, पांडुरंग ठोसर, नाना केसकर आदिंची उपस्थिती होती.

## प्राथमिक विद्यामंदिरच्या वतीने दुर्गा दौंड कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१२ ऑक्टोबर -**



येथील श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिरच्या वतीने गेल्या ३५ वर्षापासून दुर्गा दौड कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये इयत्ता सहावी व सातवीचे २५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा या शाळेच्या वतीने १९८९ पासून दरवर्षी नवरात्र महोत्सवात दुर्गा दौडचे आयोजन केले जाते .शारीरिक क्षमता व शक्तीची उपासना सिद्ध व्हावी या उद्देशाने आजच्या बालकाच्या मनात उपासने विषयी व आपली शारीरिक क्षमता कशी वाढवता येईल व ती टिकून कशी ठेवता येईल याचे ज्ञान व्हावे व आपल्या भारतीय संस्कृती अविरतपणे पुढील पिढीस कशी समृद्धपणे हस्तांतरित होईल याची काळजी शाळेच्या वतीने घेतली जाते.

या दुर्गादौडूची सुरुवात छत्रपती शिवाजी चौक पासून करण्यात आली. याचे उद्घाटन संस्थेचे कार्यवाह डॉ. कपिल महाजन, राजा दे शेट्टी, शिवाजी इंदापूरकर, प्रकाश शास्त्री यांच्या हस्ते करण्यात आली. याप्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक उपस्थित होते. ही दुर्गा दौड छत्रपती शिवाजी चौकापासून कुंभारवाडा येथील देवी मंदिरापर्यंत करण्यात आली. दुर्गा दौडचा समारोप संचालक प्रवीण अनुदुरकर, विजयकुमार पाटील यांच्या उपस्थितीत करण्यात आला. याप्रसंगी बोलताना प्रकाश शास्त्री मनाले की, बलाची उपोषणा केली तर जीवन समृद्ध होते. यासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांनी उदात्त ध्येयासाठी आपल्या भारतीय परंपरेनुसार उपासनेला महत्त्व द्यावे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख संगीता भावसार यांनी केले. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना उपवासाचे लाडू देऊन सांगता करण्यात आली.

## अभियंत्रिकी महाविद्यालय स्थापत्य विभागातील विद्यार्थ्यांनी आकार कार्यक्रमास प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१२ ऑक्टोबर -**

विकसित भारतामध्ये स्थापत्य अभियांत्रिकी विभागाचा फार मोठा मोलाचा वाटा असून, या मध्ये नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान विकसित होत आहे. याचाच एक भाग म्हणून येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या स्थापत्य विभागातील विद्यार्थ्यांनी आकार-२०२४ कार्यक्रम आयोजित केला. त्यासाठी मेघ पाटील हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली आणि त्यांच्या हस्ते फीत कापून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला.




आकार २०२४ कार्यक्रमासाठी न्यायाधीश म्हणून गिरी, रंधिवे, रोंगे आणि नाईकनवरे यांनी प्रत्येक उपक्रमाचे न्यायनिवाडा केले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून उत्कृष्ट प्रकल्पांची निर्मिती केली व उत्तमरीत्या संक्षिप्त स्वरूपात उद्दिष्ट, परिणाम आणि महत्त्व स्पष्ट केले.

या कार्यक्रमात मॉडेल प्रेझेंटेशनमध्ये नवीन तंत्रज्ञान आणि तांत्रिक संकल्पनांचे सादरीकरण केले. पोस्टर प्रेझेंटेशनमध्ये विविध विषयांवरील संशोधनाचे संक्षिप्त स्वरूपात मांडले. रील प्रेझेंटेशनमध्ये रचनात्मक, प्रभावी आणि नाविन्यपूर्ण कल्पना तयार केल्या आणि क्विझ स्पर्धेत वेगवेगळ्या प्रश्नांची अचूक उत्तरे दिली.या कार्यक्रमात आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसोबत धाराशिव जिल्ह्यातील इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनीही सहभाग घेतला होता.प्रत्येक इव्हेंटनंतर जजांकडून गुणांकन करण्यात आले आणि अंतिम निर्णय एकत्रितपणे जाहीर केला. त्याच वेळी विजेते आणि उपविजेते यांनी आकर्षक पदके आणि प्रमाणपत्रे मिळवून त्यांचे अभिनंदन करण्यात आले. यानंतर प्रमुख अतिथी लाभलेले गिरी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्यामध्ये त्यांनी सॉफ्ट स्किल म्हणजे व्यक्तिमत्त्व विकास आणि डोमेन म्हणजे विशिष्ट क्षेत्राशी संबंधित तांत्रिक माहिती किती प्रमाणात असावी हे स्पष्ट केले. या कार्यक्रमात शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांनी उएड चे उद्घाटन करून कमिटी सदस्यांना त्यांचे बिल्ले देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. पोस्टर प्रेझेंटेशनचे उपविजेते दिक्षा लाटे आणि श्रेया कोलपे आहेत, तर द्वितीय उपविजेते नम्रता गवहाणे आणि प्रीती घोगरे आहेत. आणि प्रथम पुरस्कार सई आखाडे आणि स्नेहल गदाडे यांना मिळाला आहे. मॉडेल प्रेझेंटेशनचे उपविजेते सृष्टी हजगुडे आणि स्नेहा सूर्यवंशी आहेत, तर प्रथम पुरस्कार किर्ती कोरके आणि ऋतुजा कुरुंद यांना मिळाला आहे.रील प्रेझेंटेशनचे उपविजेते शौर्या पवार, नम्रता गवाणे, प्रीती घोगरे आणि श्रद्धा पाटील आहेत, तर विजेते नेहा धारूरकर, साई सूर्यवंशी, स्नेहल गदाडे, आणि साई आखाडे आहेत. आणि शेवटी, क्विझ स्पर्धेचे उपविजेते भूमी गायकवाड आणि दिक्षा लाटे आहेत, तर प्रथम पुरस्कार प्रीती घोगरे यांना मिळाला आहे.

## प्रहार

# मदरसे की दहशतीचे अड्डे ?

संपूर्ण देशभरात नवरात्रोत्सव उत्साहाने साजरा करण्यात येत आहे. लवकरच दसरा, दिवाळी हे महत्त्वाचे सण येत आहेत. सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. पण या आनंदावर विरजण टाकण्याचे काम जिहादी घटक करीत असल्याची माहिती आहे. हे जिहादी तत्त्व आपल्या कारवायांपासून परावृत्त होत नाहीत. पश्चिम बंगालपासून गुजरातपर्यंत त्यांच्या कारवाया सुरूच आहेत. कुठे देशी बॉम्ब बनवले जात आहेत, कुठे सरकारी कर्मचाऱ्यांवर हल्ले होत आहेत, तर कुठे दहशतवादी घटना घडवण्याची तयारी सुरू आहे. मुंबईवर दहशतवादी हल्ल्याची भीती नुकतीच गुप्तचर यंत्रणांनी वर्तविली आहे. विविध घटनांमध्ये गुंतलेल्या आरोपींवर पोलिसही कडक कारवाई करीत आहेत. पोलिस व सुरक्षा दलांच्या सतर्कतेमुळेच मे महिन्यात अहमदाबाद विमानतळावर चार दहशतवाद्यांची धरपकड करण्यात आली होती.

काही दिवसांपूर्वी छपरा (बिहार) येथील मदरशात झालेल्या बॉम्बस्फोटाने नव्या वादाला तोंड फोडले. छपराच्या मोतीराजपूर गावात असलेल्या एका अवैध मदरशात बॉम्बस्फोट झाला. या घटनेची राष्ट्रीय बाल अधिकार संरक्षण आयोगाने (एनसीपीसीआर) गांभीर्याने दखल घेतली आहे. एनसीपीसीआरचे अध्यक्ष प्रियंक कानुनगो यांनी कथित मदरशाला भेट दिली आणि प्रशासनाला योग्य तपास करण्याचे निर्देश दिले. त्यांनी सांगितले की, मोतीराजपूर गावात बेकायदेशीरपणे सुरू असलेल्या मदरसा दारुल उलूम बरकतिया रिझविया गुलशन-ए-बगदादमध्ये बॉम्ब बनवताना स्फोट झाला. या स्फोटात मुझफ्फरपूरहून आणलेल्या एका मुलाला गंभीर दुखापत झाली. या मुलावर पाटणा येथील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. बॉम्ब बनविणाऱ्या किंवा मुलांना बॉम्ब बनवायला शिकवणाऱ्या (पोलिसांच्या तपासातून लवकरच तथ्य बाहेर येईल) मौलाना इमामुद्दीनचा मृत्यू झाला, असेही कानुनगो यांनी सांगितले. मदरशात १५ मुले होती, उर्वरित १४ मुलांना 'गायब' करण्यात आले आहे. बहुतांश मुले कटिहार येथे राहणारी होती. बॉम्बस्फोटानंतर दोन मौलाना फरार असल्याचेही त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे मदरशाचा संचालकही फरार आहे. या घटनेनंतर मदरशाच्या आसपासचे लोकही बरेच काही सांगत आहेत. यासंबंधीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. 'या मदरशात मुलींना अनैतिक कामासाठी आणण्यात येत होते', असे एक महिला सांगत असल्याचे या व्हिडीओत दिसत आहे. बिहारमधील असे मदरसे आणि मशिदींमध्ये बॉम्बस्फोट आणि लैंगिक शोषणाच्या घटना नेहमीच घडतात. ८ जून २०२१ रोजी बांका येथील मशिदीच्या आवारात असलेल्या मदरशात बॉम्बस्फोट झाला होता. त्यात एक मौलवी ठार तर चार जण जखमी झाले होते. २१ जून २०२१ रोजी सिवानमधील जुकडन गावात मशिदीच्या मागील भागात बॉम्बस्फोट झाला. यामध्ये पिता-पुत्र जखमी झाले होते. यानंतर ऑक्टोबर २०२३ मध्ये सहरसा सदर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका मशिदीत गंभीर गुन्हा घडला. मौलानाने मशिदीत शिकणाऱ्या एका अल्पवयीन मुलीला आपल्या वासनेची शिकार बनवले. पीडित मुलीची आई दिल्लीत मजुरीचे काम करायची. तिने पालनपोषणासाठी आपल्या मुलीला तिच्या आजीकडे ठेवले होते. पीडित मुलगी गावातीलच मशिदीत शिकण्यासाठी जात असे. या दरम्यान, मशिदीच्या मौलानाने तिला आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. हा क्रम तीन महिने सुरू राहिला. दरम्यान, एके दिवशी मुलीची प्रकृती खालावल्याने कुटुंबीय तिला उपचारासाठी डॉक्टरांकडे घेऊन गेले. तेथे मुलगी गरोदर असल्याचे व बाळाचा गर्भातच मृत्यू झाल्याचे वैद्यकीय तपासणीत उघड झाले. मोठ्या मुश्किलीने मुलीचा जीव वाचला.

**अमदाबादमध्ये हल्ला**

देशातील मदरशांमध्ये अभ्यासाचे वातावरण चांगले नाही. हे पाहता काही महिन्यांपूर्वी एनसीपीसीआरने देशातील सर्व राज्यांना पत्र लिहून मदरशांचे सर्वेक्षण करण्यास सांगितले. यामध्ये मदरशातील पायाभूत सुविधा, त्याचे व्यवस्थापन, अग्निसुरक्षा आदींची माहिती संकलित करण्यात येत आहे. याच शृंखलेचा एक भाग म्हणून सरकारी शाळेचे एक शिक्षक संजीव पटेल हे अहमदाबादच्या दरियापूर येथील एका मदरशाचे सर्वेक्षण करण्यासाठी गेले होते. ते जेव्हा मदरशाचे फोटो काढत होते त्याचवेळी त्यांच्याभोवताली मुसलमानांनी गर्दी केली. संजीव पटेल यांनी जमावाला संपूर्ण हकिकत सांगितली. राज्य सरकारच्या आदेशानुसारच आपण या मदरशाचे सर्वेक्षण करीत होतो, असे ते वारंवार सांगत होते. त्यांनी आपले ओळखपत्रही दाखविले. मात्र त्यांचे कोणीही ऐकले नाही आणि मुस्लिमांच्या जमावाने त्यांना मारहाण केली. संजीव पटेल यांनी पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल केला आहे. जमावाने सरकारी कामात अडथळा आणून लूटमार केल्याचा आरोप त्यांनी तक्रारीत केला आहे. आरोपींवर कडक कारवाई करण्याची मागणी देखील त्यांनी केली आहे. पोलिस या प्रकरणाचा गांभीर्याने तपास करीत आहेत आतापर्यंत दोन हल्लेखोरांना अटक करण्यात आली आहे.

२३ सप्टेंबर २०२३ रोजी पूर्व चंपारणमधील मेहसी येथे देखील अशाच प्रकारची एक घटना घडली होती. मेहसीच्या कटहा येथील सरकारी मदरशात एक मुलगी शिकण्यासाठी जात असे. तेथे मौलाना जमशेद आलमने पीडित मुलीचा अश्लील फोटो काढला. त्यानंतर त्या मुलीला ब्लॅकमेल करीत १८ महिने तिचे लैंगिक शोषण करत राहिला. तरुणीने विरोध केल्यास हा मौलाना तिचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी द्यायचा. याआधी जानेवारी २०२३ च्या पहिल्या आठवड्यात नवादा पोलिसांनी २७ वर्षांच्या मौलवी मोहम्मद शहादत हुसेनला अश्लील व्हिडीओ बनवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती. कौआकोल पोलिस स्टेशन हद्दीतील मदरसा नूरी मशिदीच्या मौलवीवर एका १२ वर्षीय विद्यार्थिनीने गंभीर आरोप केले होते. पीडित मुलगी त्या मदरशात शिकत होती. मौलवीने फसवणूक करून तिचे अश्लील फोटो काढले आणि व्हिडीओ देखील बनवला, असा आरोप आहे. यानंतर तो मौलवी तिचे लैंगिक शोषण करू लागला.





अशाचप्रकारची एक घटना ८ जानेवारी २०२२ रोजी उघडकीस आली होती. सीतामढी येथील एका मदरशाच्या मौलवीने क्रौर्याच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. आरोपी मौलवी तबरेजचे शिकवण्याच्या बहाण्याने एका अल्पवयीन विद्यार्थिनीशी अनैतिक संबंध प्रस्थापित केले. विद्यार्थिनी गरोदर राहिल्याने अखेर ही बाब उघडकीस आली.

त्याचप्रमाणे, ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी बेतिया जिल्ह्यातील एका मदरशात अल्पवयीन मुलीवर बलात्कार आणि हत्या झाल्याची घटना समोर आली होती. हा मदरसा नरकटियागंज शिकारपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत होता. जेव्हा काही मुले मदरशात शिकण्यासाठी गेली तेव्हा त्यांना मुलीचा मृतदेह दिसला. त्यानंतर ही बाब उघडकीस आली. शेखपुरा येथे १४ जानेवारी २०२० रोजी शेखपुरा येथे आणखी एक प्रकरण नोंदवले गेले. येथील एका मदरशाचा मौलवी गेल्या सहा महिन्यांपासून १३ वर्षीय मुलीवर बलात्कार करीत होता. जेव्हा पीडित मुलगी मदरशात शिकण्यासाठी जाण्यास नकार देऊ लागली तेव्हाच ही बाब उघडकीस आली. त्याचप्रमाणे २५ नोव्हेंबर २०१८ रोजी नालंदा जिल्ह्यातील बिहारशरीफ शहरातील इस्लामिया मदरशाच्या मौलवीने एका विद्यार्थिनीचे शारीरिक शोषण केले. त्यावेळी हे प्रकरण खूप गाजले होते. हा मदरसा नालंदा महिला महाविद्यालयाजवळ आहे. मार्च २०१६ मध्ये रोहतास जिल्ह्यातील डेहरी येथील एका निवासी मदरशाच्या विद्यार्थ्यांनी मौलवीवर अनैसर्गिक अत्याचाराचा आरोप केला होता. केवळ बिहारमधीलच नव्हे तर अन्य राज्यातील अनेक मौलवींवरही लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी हैदराबादमध्ये एका मदरसा शिक्षकाला (मौलवी) सहा अल्पवयीन मुलांचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. तसेच मूळचा बिहारचा ४४ वर्षीय आरोपी रहमान अन्सारीला एका मुलाच्या आई-वडिलांच्या तक्रारीनंतर अटक करण्यात आली होती. त्याचप्रमाणे २८ जुलै २०१८ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथून एक धक्कादायक प्रकरण समोर आले. आरोपानुसार, मदरशाच्या मौलवीने अनेक विद्यार्थिनींचे लैंगिक शोषण केले. या प्रकरणी पोलिसांनी भागलपूर येथील मौलानाला अटक केली होती. या घटना पाहता देशभरातील मदरशांमध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्याची नितांत गरज आहे, अशी आग्रही मागणी खुद्द मुस्लिम समाजाकडूनच होत आहे.

(पांचजन्यवरून साभार)

## पुरातत्त्व

# हरयाणात महावीरांच्या ८ व्या शतकातील मूर्ती

हरयाणातील सिरसा येथील चोपटाजवळील ढिलकी गावात शेताच्या सपाटीकरणादरम्यान आठव्या शतकातील तीर्थंकर महावीरांच्या दोन मूर्ती आढळून आल्या. सिरसा ते राजस्थानपर्यंत पसरलेल्या प्रदेशात आठव्या शतकात जैन पंथीय नागरिक मोठ्या संख्येत राहत होते. या दरम्यान या मूर्तींची निर्मिती झाली आणि कालांतराने त्या जमिनीखाली गाडल्या गेल्या असण्याची शक्यता आहे, असे पुरातत्त्व खात्यातर्फे सांगण्यात आले. सिरसा सीमेला लागून असलेल्या राजस्थानातील ढिलकी गावात पूर्णमल बुडानिया हे शेतकरी शेतकरी त्यांच्या शेतात समतलीकरण अर्थात सपाटीकरण करीत होते. दरम्यान, ट्रॅक्टर चालक जमीन सपाट करीत असताना त्यांना काही दगड एकमेकांवर आदळल्याचा आवाज आला. त्यांनी माती काढली तेव्हा त्यांना भगवान महावीरांच्या दोन मूर्ती सापडल्या. यातील एक मूर्ती मोठी आणि दुसरी लहान होती. पद्मासनातील दोन्ही मूर्ती संगमरवराने बनवलेल्या आहेत. त्यांच्या एका हातात एक नाणे दिसत आहे. मुख्य मूर्तीच्या चारही बाजूंनी अन्य भाव कोरण्यात आले आहेत. मी माझ्या शेतात नांगरणीसाठी जमीन सपाट करत असताना या मूर्ती आढळल्या, असे पूर्णमल बुडानिया यांनी सांगितले. त्यांनी राजस्थानमधील नोहर येथील जिल्हा प्रशासन आणि नोहर येथील जैन मंदिराच्या संचालकांना याची माहिती दिली. दोन्ही मूर्ती सुरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.



ग्रामस्थ रूपराम मील यांनी सांगितले की, सुमारे १५ वर्षांपूर्वी गावात जुन्या विटांनी बनवलेली विहीर आढळली होती. गावाजवळच्या घाटावर जुन्या काळातील मातीची भांडीही सापडली आहेत. आता आढळलेल्या दोन्ही मूर्ती जैन तीर्थंकर महावीर यांच्या आहेत. या मूर्ती आठव्या शतकातील असल्याचे त्यांच्या छातीवर असलेल्या खुणांवरून सिद्ध होते. यापूर्वीही सिरसा जिल्ह्यात असे अनेक अवशेष सापडले होते. रानियामध्ये देखील जैन पंथाशी संबंधित अनेक अवशेषही सापडले, अशी माहिती पंचकुला येथील पुरातत्त्व विभागाचे उपसंचालक बुनानी भट्टाचार्य यांनी दिली.

(ऑर्गनायझरवरून साभार)

# शक्ती संचयाचा दिव्य साधना काळ


आज प्रत्येक व्यक्ती दुःखी आणि उद्विग्न आहे. लोकांना भविष्याची चिंता आहे. कुणाजवळ धनाचा अभाव आहे तर अनेकांना शारीरिक व मानसिक आरोग्य लाभत नाही. काही लोकांमध्ये बौद्धिक क्षमतेचा अभाव असतो तर काहींमध्ये मानसिक शक्ती आणि संतुलनाचा अभाव असतो. आज सुंदर आणि दुर्मिळ मानवी जीवनाबद्दलच्या लोकांच्या समजुतींना तडा गेला आहे. अविचार आणि शक्तिहीनतेतून निर्माण होणारा तणाव स्फोटक बनत आहे. खऱ्या आनंदाचे आणि प्रसन्नतेचे रूप क्वचितच कुठे दिसते. या प्रतिकूल परिस्थितीचे कारण म्हणजे माणसाची ऊर्जा आणि शक्ती इकडे तिकडे विखुरणे. आज प्रत्येक माणसाला त्याच्या जीवनातील समस्यांपासून मुक्ती हवी असते, पण कसे? तर निःसंशयपणे शक्तीच्या आराधनेने. सनातन वैदिक तत्त्वज्ञानात, नवरात्रीचा नऊ दिवसांचा साधनाकाळ हा शक्ती संपादनाचा, ऊर्जा संचयनाचा सर्वात फलदायी काळ मानला जातो.विखुरल्यामुळे ऊर्जा वाया जाते हे सर्वश्रुत आहे,

## इतिहास

# हर्षवर्धन- भारताचा महान हिंदू सम्राट

**डॉ. आनंदसिंह राणा**

भारताच्या इतिहासात सम्राट हर्षवर्धनाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. शौर्य, धैर्य, प्रखर पराक्रम, विजिगीषु वृत्ती, संघटन कौशल्य, दूरदृष्टी या गुणांच्या बळावर आपले अफाट साम्राज्य स्थापन केले. सम्राट हर्षवर्धनाच्या कार्यकाळाची व पराक्रमाची माहिती मुख्यत्वे कोरीव लेख, संस्कृत वाङ्मय, विशेषतः बाणभट्टाचे हर्षचरित आणि चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग याच्या प्रवास वृत्तान्तावरून मिळते. प्रभाकरवर्धन व राज्ञी यशोमती यांना राज्यवर्धन (द्वितीय) व हर्षवर्धन हे दोन पुत्र आणि राज्यश्रीनामक कन्या होती. हर्षवर्धन हा कनिष्ठ पुत्र होता. प्रभाकरवर्धनाने हूणां-बरोबरच्या लढाईत हूणांचा धुव्वा उडविला होता. त्यामुळे त्याचे 'हूण हरिणकेसरी' (हूणरूपी हरिणांना सिंहासारखा) असे वर्णन बाणाने आपल्या हर्षचरित्रात केले आहे. प्रभाकरवर्धनाने अनेक विजय मिळविले होते. त्याने हूण, सिंधुदेशाधिपती, गुर्जरनृपती, गांधार (पेशावरजवळचा प्रदेश) देशाचा राजा, लाट (दक्षिण गुजरात) व मालव देशाचे अधिपती यांवर विजय मिळवून 'परमभट्टारक' आणि





'महाराजाधिराज' या सम्राटपददर्शक पदव्या धारण केल्या होत्या. त्याचे कनौजच्या मौखरींशी सख्य होते. कारण या दोन्ही राजवंशांनी हूणांच्या स्वाऱ्यांना आपल्या शौर्याने पायबंद घातला होता. हे सख्य वृद्धिंगत करण्यासाठी प्रभाकरवर्धनाने आपली कन्या राज्यश्री कनौजचा राजपुत्र ग्रहवर्मा यास दिली.

प्रभाकरवर्धन आजारी पडला (इ. स. ६०४), त्या वेळी त्याचा वडीलपुत्र राज्यवर्धन हा उत्तरेत हूणांशी लढण्यात गुंतला होता आणि दुसरा पुत्र हर्षवर्धन शिकारीसाठी गेला होता. आपल्या पित्याच्या आजाराची वार्ता समजताच हर्षवर्धन परत आला. पण तत्पूर्वीच प्रभाकरवर्धनचा मृत्यू झाला.थोड्याच दिवसांत राज्यवर्धन परत आला, तेव्हा त्याला आपल्या पित्याच्या निधनाची वार्ता कळली. विरक्त होऊन त्याने तपश्चर्येकरिता अरण्यात जाण्याचा निश्चय केला. पण तितक्यात राज्यश्रीचा परिचारक तेथे आला. मालव राजा देवगुप्ताने कनौजवर स्वारी करून ग्रहवर्म्याला ठार केले आणि राज्यश्रीला बंदीत टाकले, अशी दुःखद वार्ता राज्यवर्धनाला दिली. तेव्हा राज्यवर्धनाचा राग अनावर झाला. त्याने मालव राजाचा उच्छेद करण्याकरिता भण्डीनामक मामेभाऊ आणि दहा हजार घोडेस्वारांसह तातडीने प्रयाण केले.

काही दिवसांनी हर्शवर्धनला कळले की, राज्यवर्धनाने मालव राजाचा पराभव केला होता. पण गौडनृपती शशांक याने त्याला आपल्या भेटीस बोलावून तो एकटा आणि निःशस्त्र असता विश्वासघाताने त्याचा खून केला. ही अत्यंत हृदयद्रावक वार्ता कळताच हर्षवर्धनने 'मी जर या अधम गौडाधिपाचा उच्छेद केला नाही, तर अग्निकाष्ठे भक्षण करीन', अशी प्रतिज्ञा केली आणि तत्काळ सैन्याला तयारीचा आदेश देऊन दिग्विजयार्थ प्रस्थान केले.

हर्षाला दिग्विजययात्रेत मालव राजाची लूट घेऊन येताना मामेभाऊ भण्डी भेटला. त्याने सांगितले की, राज्यश्री बंदीतून निसटून विंध्यारण्यात गेली आहे. तेव्हा हर्षवर्धनने भण्डीकडे सैन्याचे आधिपत्य देऊन स्वत: आपल्या भगिनीच्या शोधार्थ प्रयाण केले. पुष्कळ शोधानंतर त्याला ती दिवाकरमित्रनामक बौद्ध भिक्षूच्या आश्रमाजवळ अग्नीला देह अर्पण करण्याच्या बेतात आढळली. त्याने तिला त्यापासून परावृत्त केले आणि तो आपल्या सैन्याला येऊन मिळाला.

सम्राट हर्षवर्धनच्या दिग्विजययात्रेत कामरूपचा (आसाम) राजा भास्करवर्मा याने दूत पाठवून हर्षाच्या मैत्रीची विनंती केली. पुढे हर्षवर्धन व भास्करवर्मा यांनी दोन बाजूंनी गौडांवर आक्रमण करून राजा शशांकचा पाडाव केला. त्यामुळे त्याला हर्षाचे स्वामित्व कबूल करून मांडलिकत्व पत्करावे लागले असावे, असे दिसते. पुढे मात्र शशांकाने हर्षाचे स्वामित्व झुगारले आणि ओडिशा व कागादे (गजाम) प्रदेशांवर आक्रमण करून 'महाराजाधिराज' ही पदवी धारण केली. त्याचा सामंत शिलोद्भव कुलोत्पन्न माधवराज याच्या इ. स. ६१९-२० च्या ताम्रपटात शशांकच्या या पदवीचा उल्लेख आहे.

चिनी यात्रेकरू ह्यूएनत्संग याने आपल्या प्रवास वृत्तांतात असे लिहिले आहे की, हर्षवर्धनने अवघ्या सहा वर्षांत भारतातील पाच प्रांत जिंकले आणि नंतर तीस वर्षे शांततेने राज्य केले. एका युद्धात मात्र हर्षाचा पराभव झाला. महाराष्ट्राने मात्र त्याच्यापुढे मान वाकविली नाही.

दिग्विजय संपल्यावर सम्राट हर्षवर्धनने आपली राजधानी ठाणेश्वराहून (स्थाण्वीश्वर) कनौज (कान्यकुब्ज) येथे नेली. ह्यूएनत्संगच्या मते, तेथील मंत्र्यांनी त्याला गादीवर बसण्याची विनंती केली पण हर्षाने गादीवर न बसता राजपुत्र शिलादित्य या नावाने राज्य केले. आपल्या ताम्रपटांत हर्षवर्धन 'परमभट्टारक' व 'महाराजाधिराज' या सम्राटपदद्योतक पदव्यांचा उल्लेख करतो. हर्षाच्या साम्राज्य विस्ताराविषयी वेगवेगळे उल्लेख आहेत. त्याच्या शत्रूंच्या लेखांत त्याला 'सकलोत्तरापथेश्वर' म्हटले आहे. ह्यूएनत्संगच्या मते, त्यामध्ये पश्चिम पंजाब, सिंध, राजपुताना, माळवा, गुजरात येथील राजांचा उल्लेख येतो. पूर्व पंजाब (उत्तर प्रदेश), बिहार, पश्चिम बंगाल व ओडिशा हे प्रांत हर्षाच्या राज्यात अंतर्भूत होते, यात संशय नाही. काठेवाड व आसाम येथील राजांनी त्याचे स्वामित्व कबूल केले होते. त्याच्या काळी उत्तर भारतात त्याच्या तोडीचा एकही सम्राट उरला नव्हता, ही वस्तुस्थिती आहे. सम्राट हर्षवर्धनाने आपला स्वतःचा संवत् स्थापला. त्याचा आरंभ त्याच्या इ. स. ६०६ मधील राज्यारोहणापासून होतो. तो संवत् सुमारे ३०० वर्षे उत्तर भारतात होता. काही इतिहासकारांच्या मते त्याचा प्रसार नेपाळातही झाला होता. हर्ष स्वतः राज्यशासनात लक्ष घालत असे आणि आपल्या राज्यात सर्वत्र फिरून शासनव्यवस्था कशी चालली आहे, ते समक्ष पाहत असे.







हर्षवर्धन शिवोपासक होता. त्याच्या ताम्रपटांत त्याचे वर्णन 'परममाहेश्वर' असे आहे. तथापि बौद्ध व जैन पंथांनाही त्याचा उदार आश्रय होता. तो दर पाच वर्षांनी प्रयाग येथे धर्मसंमेलन भरवून त्यात पाच वर्षांत साठविलेली सर्व संपत्ती दानधर्मात खर्च करीत असे. इ. स. ६४३ मध्ये त्याने आपल्या कारकिर्दीतील सहावे धर्मसंमेलन प्रयाग येथे भरविले. तेथे ह्यूएनत्संगही उपस्थित होता. तेथे बुद्ध, आदित्य आणि शिव यांच्या भव्य प्रतिमा बसवून तो उत्सव तीन महिने चालला होता. या अवधीत हजारो बौद्ध, व जैन धर्मीय तसेच अनाथ व अपंग लोकांस मोठा दानधर्म करण्यात आला.

हर्ष विद्वानांचा आश्रयदाता होता. त्याच्या सभेत बाण, मयूर इत्यादी सुविख्यात कवी होते. तो स्वतःही उत्कृष्ट कवी व नाटककार होता. रत्नावली व प्रियदर्शिका या उदयननृपतीच्या प्रणयकथेवर रचलेल्या हर्षाच्या नाटिका सुप्रसिद्ध आहेत. तिसरे नागानंद नाटकही प्रसिद्ध आहे. नाटकाचा हा प्रयोग नृत्यगायनादिकांनी फार रमणीय होता,

असे चिनी यात्रेकरू इत्सिंग याने आपल्या प्रवास वर्णनात नमूद केले आहे. प्रेमळ पुत्र व बंधू, उत्तम नाटककार, शूर व न्यायी शासक, धर्मविद्या व कला यांचा उदार आश्रयदाता इत्यादी गुणांमुळे सम्राट हर्शवर्धनाचे नाव सुवर्णाक्षरात नोंदले गेले आहे.

## पर्यटन

# वृंदावनातील अद्भुत 'बसंती खोली'



भारतात अशी अनेक रहस्ये आहेत की ज्यावरील पडदा अद्याप उलगडलेला नाही. तसेच देशात अशी अनेक मंदिरे आहेत, जी त्यांच्या चमत्कारांसाठी आणि अलौकिक श्रद्धेसाठी खूप प्रसिद्ध आहेत. यातील एक मंदिर उत्तरप्रदेशातील वृंदावनातही आहे. वृंदावनात असलेल्या या मंदिराशी अनेक श्रद्धा निगडीत आहेत. भगवान श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी येथे लोकांची अलोट गर्दी जमते.

वृंदावनाचे हे चमत्कारिक मंदिर अतिशय खास असल्याचे मानले जाते. येथे एक बसंती खोली देखील आहे, जी वर्षातून फक्त दोनदा उघडली जाते. विशेषत: वसंत पंचमीच्या दिवशी येथे मोठ्या संख्येने भक्त येतात. भगवान श्रीकृष्णाच्या शाहजी मंदिराशी संबंधित रहस्ये उत्कंठावर्धक आहेत. तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की हे मंदिर १८३५ मध्ये बांधले गेले होते. संगमरवरात बनवलेले हे अतिशय खास आणि सुंदर मंदिर स्थापत्यकलेचे अप्रतिम उदाहरण मानले जाते. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे येथे बांधलेले वाकडे खांब एकाच दगडापासून बनवलेले आहेत.

या मंदिराची आणखी एक खास गोष्ट आहे. येथे एक चमत्कारिक 'बसंती खोली' देखील आहे. ही खोली वर्षातून फक्त दोनदा उघडली जाते. ही खोली वेगवेगळ्या रंगांच्या आरशांनी सजवली आहे. विशेषत: वसंत पंचमीच्या दिवशी खोली पिवळ्या रंगाने सजवली जाते. श्रीकृष्ण मंदिरात बांधलेली बसंती खोली श्रावण महिन्यातील बसंत पंचमी आणि त्रयोदशीलाच उघडली जाते. वसंत पंचमी हा सण वृंदावनमध्ये साजरा होणाऱ्या प्रमुख सणांपैकी एक आहे.

भगवान कृष्णाचे भक्त या दिवसापासून होळीला सुरुवात करतात. सर्वप्रथम श्रीकृष्णाला गुलाल लावला जातो. यासोबतच वसंत पंचमीच्या दिवशी भगवंताला फुलांनी सजवले जाते. उत्सव विशेष बनवण्यासाठी राधारमणलालजींची मूर्ती एका दिवसासाठी या खोलीत आणली जाते.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# वाळू वाहतुकीसाठी पैसे स्विकारणारे पाच पोलीस निलंबीत

## पोलीस उप महानिरिक्षक शहाजी उमाप यांची विशेष कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

वाळू वाहतुकीवर कारवाई न करण्यासाठी पैसे स्विकारणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी चांगलाच दणका दिला असून, पाच जणांना निलंबित केले आहे. लोहा येथील बायपास रोडवर काही पोलीस अधिकारी व अंमलदार हे वाळू वाहतूक करणारी वाहने अडवून, त्यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई न करण्यासाठी पैसे स्वीकारत असल्याची माहिती पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना प्राप्त झाली होती. पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांना मिळालेल्या माहितीनुसार सदर ठिकाणी थांबलेले पोलीस हे नांदेड येथील विशेष पथकात कार्यरत असलेले पोलीस उपनिरीक्षक प्रवीण हलसे व इतर चार अंमलदार होते. हे सर्वजण पहाटेचे वेळी वाळूची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी एका खाजगी वाहनातून लोहा येथे गेले होते.

उपरोक्त माहिती, त्वरित कंधार उपविभागीय पोलिस अधिकारी अश्विनी जगताप यांना देण्यात येऊन त्यांना लोहा येथे रवाना होण्याबाबत कळविण्यात आले. मात्र, उपविभागीय पोलीस अधिकारी या लोहा येथे पोहोचण्यापूर्वीच नमूद अधिकारी व अंमलदार हे त्यांच्याजवळील खाजगी वाहनातून लोहा येथून नांदेडकडे निघाल्याने सकाळी ८.१५ वाजण्याच्या दरम्यान, पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळील तिरंगा चौकात, नाकाबंदी करून सदर वाहनास रोखण्याबाबत जगताप यांना कळविण्यात आले. त्याप्रमाणे जगताप यांनी सदरचे वाहन तिरंगा चौकात अडविले असता त्यात पोलीस उपनिरीक्षक प्रवीण हलसे व पोलीस हवालदार ब्रह्मानंद लामतुरे आढळून आले.

वाहनांमधील पोलीस अधिकारी व अंमलदाराची झडती घेतली असता, दोघांच्या झडतीत त्यांच्याकडे एक लाख तीन हजार रुपयांची रोकड मिळून आली. यातील आणखी तीन पोलीस अंमलदार, पोलीस कॉन्स्टेबल राम मुळे, पोलीस कॉन्स्टेबल महेश कावळे व पोलीस कॉन्स्टेबल तुकाराम जुन्ने हे परतीच्या प्रवासात लोहा येथेच थांबल्याचे आढळून आले. सदर प्रकरणी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी या पाचही जणांना निलंबित केले असून त्यांची प्राथमिक चौकशी उपविभागीय पोलिस अधिकारी, देगलूर यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी या पाच पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित केल्याने पोलीस दलात एकच खळबळ उडाली आहे.

# जनतेला विकास निधीसाठी कुणाच्याही दारला जाण्याची वेळ येऊ देणार नाही : माजी खा.प्रतापराव चिखलीकर

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,दि.१२ ऑक्टोबर**




श्री क्षेत्र उमरज व परीसरातील गावातील जनतेंना कोणाच्याही भुलथापांना बळी न पडता येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत समर्थपणे साथ द्यावी. येणाऱ्या काळात या भागातील जनतेंना विकास कामासाठी कोणातीही दारात जाण्याची वेळ येऊ देणार नाही असे प्रतिपादन माजी खासदार प्रतापराव पाटिल यांनी केले. श्री क्षेत्र उमरज येथे आयोजित विकास कामाच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. दि. ११ आक्टोंबर रोजी कंधार तालुक्यातील श्री क्षेत्र उमरज येथे माळाकोळी-वागदरवाडी-चोंडी दगडसांगवी - उमरज - तळ्याचीवाडी रस्त्याची पाईप मो- यांच्या कामासह सुधारणा करण्याच्या कामाचा शुभारंभ व उमरज येथील श्री.छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसराचा सुशोभीकरण, पर्यटन व सांस्कृतिक विभाग अंतर्गत नामदेव महाराज संस्थान परिसराचा विकास करणे या कामांचे लोकार्पण करण्यात आले. हा कार्यक्रम मठाधीपती श्री संत महंत एकनाथ गुरु नामदेव व माजी खासदार प्रतापराव पाटिल चिखलीकर यांच्या उपस्थितीत पार पडला. या वेळी भारतीयजनतापार्टी प्रदेश कार्यकारणी सदस्य बाबुराव केंद्रे, भाजपा चे विधानसभा प्रमुख तथा जिल्हा सरचिटणीस प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हा परिषद सदस्य मनोहर पाटील अंबुलगेकर, तालुकाध्यक्ष किसनराव डफडे, जिल्हा उपाध्यक्ष भगवानराव राठोड, कंधार नगरपालिकेच्या माजी नगराध्यक्षा सौ.अनुसयाताई केंद्रे, कंधार नगरपालिकेतील माजी उपनगराध्यक्ष जफरोद्दीन बाहोद्दीन, सचिन पाटील चिखलीकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सुमित पाटील, माजी नगरसेवक व्यंकट मामडे, प्रल्हादराव पाटील फाजगे, घोरपडे गुरुजी, उमरज ग्रामपंचायत सरपंच जयश्री जनार्धन केंद्रे, मधुकरराव डांगे, आसिफ शेख, मामा गायकवाड, बाळासाहेब गर्जे, प्रदीप पाटील फाजगे, बाबाराव पाटिल भुत्ते ,विनोद पाटिल तोरणे, नवनाथ तोरणे, राजेश भुत्ते माधव भुत्ते ,शिवाजी गुट्टे ,बालाजी भिमराव तोरणे, शामराव गायकवाड, मारोती तोटेवाड ,सदाशिव तोरणे, विश्वांभर तोरणे ,तीरुपती भुत्ते ,मारोती तोरणे ,विशाल भुत्ते ,भानुदास भुत्ते, रामराव तोरणे ,प्रकाश तोरणे, रविंद्र तोरणे ,एकनाथ तोरणे ,नामदेव पंदलवाड ,गोविंद भुत्ते, गोविंद तोरणे, नारायण तोरणे, व्यंकट तोरणे, वसंत तोरणे ,माधव तोरणे, आतमाराम भुत्ते ,माधव पाटिल डोंगरगावकर, बालाजीराव पवळे, शासकीय कंत्राटदार सूर्यकांत गुट्टे यांच्यासह परीसरातील कार्यकर्ते व नगरीकांची मोठ्या संख्येनी उपस्थिती होती या कार्यक्रमाचे प्रास्तविक विनोद पाटिल तोरणे यांनी तर सुत्रसंचलन श्रीराम फाजगे यांनी केले

## संक्षिप्त वृत्त

### मराठा सेवा संघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी हौसाजी गाढे यांची निवड

**मुदखेड**-मुदखेड मराठा सेवा संघ नांदेड उत्तर व दक्षिण जिल्हा कार्यकारणीची बैठक यशवंतराव चव्हाण मराठा मुलांचे वस्तीग्रह नवा मोंढा येथे पार पडली. जिल्हा उपाध्यक्ष म्हणून हौसाजी दिगंबरराव गाढे पांगरगावकर यांची निवड करण्यात आली.



सदरील बैठक सेवा संघाचे प्रदेश सहसचिव डॉ पंजाबराव चव्हाण, जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम, इंजि सतीश कुमार जाधव, शेरा पाटील, तानाजी हुसेकर, नानाराव कल्याणकर, इत्यादींच्या उपस्थितीत पार पडली जिल्हा कार्यकारणी गठीत करून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले त्यात मुदखेड तालुक्यातील पांगरगाव येथील शैक्षणिक सामाजिक क्षेत्रात काम करणारे हौसाजी दिगंबरराव गाढे सर यांची मराठा सेवा संघ जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र देऊन त्यांची निवड करण्यात आली.यावेळी विभागीय अध्यक्ष इंजि शेरा पाटील छावा प्रदेशाध्यक्ष इंजि तानाजी हुसेकर, नानाराव कल्याणकर, उद्धवराव सूर्यवंशी, सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष पंडितराव कदम, व ड सतीश कुमार जाधव, किरण वानखेडे, गोविंदराव वरताळे, व्यंकटराव नन्नवरे, रवी ढगे, सुभाष पानपट्टे, संतोष लोंढे, प्रभाकर जाधव, शंकर जाधव, कराळे सर, विनायकराव कदम, प्राध्यापक श्रीनिवास गाढे, भास्कर थेटे, दत्ता कदम, विनायक चव्हाण, माधव तिडके, डॉ विलास शिंदे, डॉ प्रशांत तावडे, आदी सेवा संघातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.हौसाजी गाढे यांची जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दलजिल्ह्यातव तालुक्यात त्याचे अभिनंदन होत आहे

### शिरूर येथिल तंटामुक्त अध्यक्षपदी दासा पाटील शिंदे यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड



**उमरी**-तालुक्यातील शिरूर येथिल तंटामुक्त अध्यक्षपदी स्व. खासदार वसंतराव चव्हाण यांचे पि.ए. दासा पाटील शिंदे शिरूरकर यांची दुसऱ्यादां बिनविरोद्ध निवड करण्यात आली आहे. दहा वर्ष आमदार व गेल्या लोकसभेचे काँग्रेस खासदार म्हणून गाजलेले स्व . वसंतराव चव्हाण यांचे उमरी येथिल स्वयंम साहय्यता दासा पाटील शिंदे यांची फेर निवड बिनविरोद्ध करण्यात आली आहे . दासा पाटील शिंदे हे गेल्या अनेक वर्षात तंटामुक्त अध्यक्ष असतांना अनेक तंटे मिटवून न्याय देण्याचे काम केले आहे . दासा पा शिंदे काँग्रेस पक्षाशी निगडीत असले तरी यांचा स्वभाव मनमिळावू आणि अन्याय अत्याचार विरुद्ध बंड करणारे आहे मराठा आरक्षणासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष अंदोलन केले आहे त्या संघर्षामुळे त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे पण तंटामुक्त अध्यक्ष गुन्हेविरीत असायला पाहिजे होते पण दासा पाटील शिंदे त्यांचे सामाजीक, राजकीय कार्य उत्कृष्ट असल्याने गावकरी एकमतांने त्यांची ग्रामसभेत दुसऱ्यांदा बिनविरोद्ध निवड केली आहे. त्यांनी विकास कामात कधी राजकारण आनले नाही त्यांच्या गुणाची कार्याची दखल व पावती म्हणून मौजे शिरूर येथील ग्रामसभेत दासा शिंदे यांची महात्मा गांधी तंटामुक्ती अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष म्हणून मिठूमिया यांची नियुक्ती करण्यात आलीं आहे. शिरूर ग्रामपंचायती चे सरपंच सौ शांताबाई अत्तम चव्हाण व शिरूर नगरीचे पोलीस पाटील नरेश डोंगरे, ग्रामसेवक म्यानमवार जी एन, रावसाहेब पडोळे चेअरमन, सरपंच प्रतिनिधी अत्तम चव्हाण, सोपान बालाजी पडोळे शालेय समिती अध्यक्ष हौसाजी एन गुंदलवाड दत्तरामजी पिंकलवाड शुभम वंचेवाड, माजी सरपंच प्रतिनिधी बाबू शेख बाबा पठाण, मारुती गुरुडवार, साईनाथ गाडीवान आनंदा सूर्यवंशी, आदी प्रतिष्टीत नागरीक उपस्थित होते महात्मा गांधी तंटामुक्त समितीच्या अध्यक्षपदी दासा पाटील शिंदे शिरूरकर यांची निवड झाल्याबदल विविध सामाजिक राजकीय स्तरावरून आणि मित्रमंडळी कडून दासा पाटील शिंदे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# पंचवीस वर्षापासुन फरार आरोपीस अटक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

वजिराबाद पोलीस ठाण्याच्या एका गुन्ह्यात २५ वर्षापासून फरार असलेला आरोपी भारत चिंतामण सोळंके रा.लक्ष्मीनगर यास वजिराबाद पोलिसांनी अटक केली आहे.फरार असलेल्या आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलीस अधीक्षकांनी सूचना दिल्यानंतर सर्वच पोलीस ठाणे व त्यांचे प्रमुख सतर्क झाले आहेत. वजिराबाद पोलीस



ठाण्यात १९९९ साली कलम ३७९ कलमान्वये गुन्हा दाखल झालेला आरोपी फरार होता. त्याच्याविरुध्द वॉरंटही निघाले होते. वजिराबाद व शिवाजीनगर पोलिसांनी काल रात्री आरोपी भारत चिंतामण सोळंके (५३) रा.लक्ष्मीनगर हा औद्योगिक वसाहतीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहायक पोलीस उपनिरीक्षक सुधीर खोडवे यांना शंका आल्यानंतर त्यांनी शहानिशा केली. त्यास ताब्यात घेवून विचारपूस केली असता तो २५ वर्षापासून शिवाजीनगर व वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्ह्यात फरार असल्याचे समजले. त्याला ताब्यात घेवून वजिराबाद येथे आणण्यात आले व त्यास अटक करण्यात आली.

# दोन गावटी पिस्टलसह चार काडतुसे जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अर्धापूर परिसरातील पार्डी येथून एका कारमधून दोन गावठी पिस्टल व चार जिवंत काडतूस जप्त केले असून, चार जणांना अटक केली आहे. हि कारवाई दि.११ ऑक्टोबर रोजी करण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांच्या फ्लश आऊट ऑपरेशन अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना अर्धापूर परिसरात एका कारमध्ये गावठी पिस्टल असल्याची गुप्त माहिती मिळाल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड व त्यांच्या पथकाने अर्धापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पार्डी (म) शिवारातील टोल नाक्याजवळ असलेल्या धनश्री कृषी सेवा केंद्र येथे जावून तपासणी केली असता एका स्विफ्ट डिझायर कारमध्ये दोन गावठी पिस्टल व चार जिवंत काडतूस आढळून आले. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने माधव अनंतराव नंदनकर रा.शिवनगर, आकाश अनंतराव साखरे



रा.सिंचननगर, चंद्रमुनी मारोती कांबळे रा.जुनी आबादी मुदखेड, प्रतिक एकनाथ गोरे रा.चैतन्यनगर या चौघांना अटक केली आहे. त्यांच्याकडून गावठी पिस्टल, काडतूस आणि एमएच-३८-जे-३१३२ क्रमांकाची कार असा एकूण ३ लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी बालाजी कदम यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, पोलीस उपनिरीक्षक साईनाथ पुयड, पोहेकॉ. गंगाधर कदम, विलास कदम, बालाजी कदम, संतोष बेल्लूरोड, संदीप घोगरे, तिरुपती तेलंग, चालक घेवारे, अकबर पठाण व सायबर सेलचे राजू सिटीकर यांच्या पथकाने केली.

**स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

# आमच्याकडे नोंद केलेला कोणाचाही ऊस शिल्लक राहू देणार नाही - देशमुख

**तभा वृत्तसेवा,**
**हदगाव, दि.१२ ऑक्टोबर**

हिमायतनगर तालुक्यातील व परिसरातील शेतकऱ्यांची कामधेनू ठरलेला श्री. सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड व कळमनुरी तालुक्यातील शिऊर साखर कारखाना शेतकऱ्यांचा संपूर्ण ऊस तोडल्याशिवाय बंद करणार नाही. व जास्तीत जास्त वेळेवर ऊस नेण्याचा प्रयत्न करू अशी ग्वाही कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख आणि चेअरमन सुभाषराव देशमुख यांनी दिली. मागील चार वर्षापासून श्री सुभाष शुगर प्रायव्हेट लिमिटेड हडसणी या साखर कारखान्याने सातत्याने विक्रमी गाळप करून आणि वेळेवर तोड करून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार दिला. सोबतच परिसरातील ईतर कारखान्यांच्या बरोबरीने ऊसदर व वेळेवर मोबदला दिला. त्यामुळे हदगांव तालुक्यातील श्री सुभाष शुगर साखर कारखाना व लागुनच असलेल्या कळमनुरी तालुक्यातील शिऊर साखर कारखाना शेतकऱ्यांची कामधेनु ठरला आहे. पूर्वी तालुक्यात ऊसतोडीची वेळेवर हमी नसल्यामुळे व आजूबाजूच्या तालुक्यातील साखर कारखाने ऊस नेऊनही वेळेवर मोबदला देत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी ऊस या पिकाकडे पाठ फिरवली होती. काही अपवादात्मक



परिस्थिती वगळता ऊस उत्पादक शेतकऱ्यांना हमीचे उत्पन्न देणारे नगदी पीक ठरले आहे. हदगांव तालुक्यात पाण्याची मुबलक व्यवस्था आहे. ईसापुर धरणाचा शाखा कालवा हदगाव तालुक्यातून व हिमायतनगर तालुक्यातून जातो. तसेच कयाधू व पैनगंगा या नद्या तसेच लाखाडी ही एक नदी तालुक्यातील जमीन व शेतकऱ्यांना समृद्ध बनवण्यासाठी हातभार लावते. त्याप्रमाणे उत्पादित केलेला ऊस वेळेवर खरेदी करण्याची व तोडून नेण्यासाठी श्री सुभाष शुगर कारखान्याकडे प्रभावी यंत्रणा आहे. येथील अधिकारी, कर्मचारी व व्यवस्थापन शेतकऱ्यांची मोठी काळजी घेते. शेतकऱ्यांना प्राधान्य देऊन नंतरच कारखान्याचे हित पाहत व्यवस्थापनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या मनात आढळ स्थान निर्माण केले आहे. यावर्षी राज्य सरकारने पंधरा नोव्हेंबर नंतरच गाळप परवाने देतील अशी असा निर्णय घेतलेला आहे. शासनाच्या निर्णयाला अधीन राहून व गाळप क्षमता वाढवून मार्च पर्यंत संपूर्ण ऊस नेण्यासाठी आपण प्राधान्य देऊ असे व्यवस्थापनाने सांगितले आहे. सध्या श्री सुभाष शुगर व कळमनुरी तालुक्यातील शिऊर साखर कारखाना यात दोन्ही कारखान्यांचे बॉयलर प्रज्वलित झालेले आहे. लवकरच निसर्ग सुद्धा साथ देऊन परतीचा पाऊस संपण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या मागणीचा विचार करून शासन सुद्धा कारखान्यांना गाळपास परवानगी देऊ शकते. तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी यावर्षीप्रमाणे वेळेत कारखाने सुरू करण्याची परवानगी घ्यावी अशी मागणी करणारे निवेदन साखर आयुक्त व मुख्यमंत्र्यांना दिले. तसेच श्री सुभाष शुगर आणि शिऊर कारखान्यांना सुद्धा कारखाना लवकर सुरू करावा अशी विनंती केली.

वेळेत ऊसतोड करून व जास्तीत जास्त यंत्रणा आणि गाळप क्षमता वाढवून शेतकऱ्यांचा ऊस वेळेवर जाण्यासाठी प्रयत्न करू. तसेच कोणत्याही हालतीत एकाही शेतकऱ्याचा ऊस शिल्लक राहू देणार नाही. अशी ग्वाही श्री सुभाष शुगरचे व कळमनुरी तालुक्यातील शिऊर साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक सुशीलकुमार देशमुख व चेअरमन सुभाषराव देशमुख यांनी दिली.

# सहयोग, इंदिरा नगरात ५५ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे भूमिपूजन

## साहेबराव गायकवाड यांच्या पाठपुराव्याने कामांना मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि.१२ ऑक्टोबर**

भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांच्या प्रयत्नातून माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या विकास निधीतून सहयोग नगर, इंदिरा नगर मधील मंजूर झालेल्या विकास कामांचे दि. ११ ऑक्टोबर रोजी सहयोग नगर येथील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

शहरातील सहयोग नगर, इंदिरा नगर मधील नागरिकांच्या मागणीनुसार साहेबराव गायकवाड यांनी माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्याकडे पाठपुरावा करून गणपती मंदिर ते नागेंद्र अलशेट्टी यांच्या घरापर्यंत नालीवरील छत, सिनू यांच्या गिरणी समोरील रस्ता व नाली, भिमराव सोनाळे यांच्या घराशेजारील बोळी मधील अंतर्गत रस्ते, नाली इंदिरा नगर मधील सीसी रस्ता आदी कामांसाठी ५५ लक्ष रुपयांच्या निधी



मागणीचा प्रस्ताव सादर केला होता. माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी सर्व निधी मंजूर करून दिला. या निधी मधील कामांचे भूमिपूजन सहयोग नगर मधील ज्येष्ठ नागरिक व मित्रपरिवार यांच्या हस्ते करण्यात आले. ही सर्व कामे मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाल्याने सहयोग नगर मधील सर्व नागरिकांकडून भारतीय जनता पार्टीचे महानगर जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांचे कौतुक केले जात आहे. सदरील भूमिपूजन कार्यक्रमास नारायणराव ढेपे, राजेश बिऱ्हाडे, उतकर काका, रमेश कोकरे, भिमराव सोनाळे संजय मांजरमकर, प्रतिसाद खरात, सुरेश इंगोले, तात्या गुरु मनाठकर, शंकरराव साळवे, विश्वनाथ पाटील, गरुड अण्णा, महेश एडके, गोपी कांबळे, गौरव मनाठकर, राहुल कदम, माधव वैद्य, अमित गोडबोले, यश गायकवाड, चेतन कांबळे, पियुष लोणे, प्रणव आठवले, रोहित खंदारे, जब्बार शेख, सतीश वैद्य, तेजस राऊत, जय राऊत, ओम जगळपुरे,सिनू , सोपान काळबांडे, नितीन शिरसागर,फाजील भाई, यांच्या सह नगरातील ज्येष्ठ नागरिकांची उपस्थिती होती.

# तेरा वर्षापासून दुर्गादेवीची प्राण प्रतिष्ठा व सामाजिक कार्यक्रमावर भर

**तभा वृत्तसेवा**
**निवघाबाजार,दि.१२ ऑक्टोबर**

येथील साई दुर्गा महिला मंडळाच्या वतीने दरवर्षी दुर्गादेवीची स्थापना करण्यात येते या मंडळाला यावर्षी तेरा वर्ष पुर्ण झाली असून, या मंडळाच्या वतीने अनेक सामाजीक कार्यक्रम राबविण्यात येतात..

येथील शिरड रोड नजिक काही महिला एकत्रित येऊन दुर्गा देवीची स्थापना करण्यात आली. गत तेरा वर्षापासून अखंड तेवत स्थापना केली जाते. कोणताही स्वार्थ न ठेवता सर्व महिला एकत्र येऊन नऊ दिवस मोठया भक्तीभावाने पुजा, आर्चा करतात. तसेच नवरात्रीचे नऊ दिवस विवीध सामाजिक कार्यक्रम आयोजित करतात. कधी रांगोळी



स्पर्धा, खो खो, लहान मुला साठी निबंध स्पर्धा दांडीया असे अनेक कार्यकृम राबवून महाप्रसादाने सांगता करण्यात येते यामध्ये सुरेखा शिंदे, अनिता मुधोळ, शकुंतला गरुडे, सिमा गरूडे, अरुणा भट्टेवाड, विजया भट्टेवाड, मंगलबाई मुसळे, संगिता शिंदे, जयश्री शिंदे, कलावतीबाई धनगरे, जयश्री घंटे, निता चाकोतकर, ताईबाई दरणे आदी महिला मोठया भक्तीने प्राण प्रतिष्ठा करतात.

# लोहा-कंधार मतदारसंघात राजकीय घडामोडींना वेग; उमेदवारी मिळविण्यासाठी अनेकांची धडपड

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि.१२ ऑक्टोबर**

लोहा विधानसभा मतदारसंघात राजकिय वळानाने वेग घेतला आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक भावी उमेदवार सक्रिय झाल्याचे सोशलमिडीवरुन मतदारांच्या दृष्टी पटलावर बघायला मिळत आहेत.माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर लोहा मतदारसंघ कोणत्याही परिस्थितीत काबिज करण्यासाठी जोरदार तयारी करुन जंग..जंग पछाडत आहेत. खा.प्रताप पाटील चिखलीकराना अपक्ष काळात जेवढा संघर्ष करावा लागला , त्या काळाची आठवण करुन आज संघर्ष करावा लागेल हे सत्या आहे. शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे गटाचे एकनाथ पवार यांनी मागील काळपासुन मतदारसंघात प्रचाराची भिंगरी बांधुन मतदारसंघ पिंजून काढत आहेत, पण साधी राहाणीमानाचा फायदा राजकीय वर्तुळात घेतला जात आहे.एकनाथ पवार यांनी आक्रमतेचा पाढा वाचवायला सुरुवात केली तर कार्येकरत्याचा आणखीन लोंढा वाढेल.विद्येमान आ.श्यामसुदर शिंदे यांच्या सुविधा पत्नी सौ. आशाताई शिंदे यांनी कंबर खसुन विविध उदघाटने व लोकार्पण सोहळ्याचे आयोजन करुन कार्येक्रम घेतले जात आहेत, पण या पुर्वी बहिण भाऊ यांच्यात शाब्दीक तेड निर्माण होत होते ,म्हणुन अनेक कार्येकर्त्याचा गराडा शिंदेबाई सोबत राहात होता. आताच्या काळात भाऊ, बहिण यांच्यात अनेक कर्येक्रमातुन मवाळ भुमिका दिसुन येत आसल्याने मतदार सुध्दा सावधपणा बाळगुन जवळ दिसुन येत नाही.आशाताई शिंदे विविध पक्षाच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन मतदारसंघात गाठीभेटी घेत आहेत, पण शिंदेबाई यांची ठोस भुमिका नाही.मी आता माघार घेणार नाही अशी भुमिका घेत नसल्याने काही कार्येकर्ते शिंदेबाईच्या गराढ्यातुन कायकर्त्ये थोड्या अंतरावर असल्याचे दिसुन येत आहेत . कै.माजी.खा.केशवराव धोंडगे यांचे सुपुत्र पुरुत्सोम धोंडगेनी पाच हाजाराच्यावर वयस्कर मतदाराच्या डोळ्यातील दृष्टी दोष काडुन नविन दृष्टी देऊन मतदारात नवचैतन्य निर्माण केले आहे.मतदाराला भेटुन येणाऱ्या काळात मलाच आशिर्वाद द्या. मतदाराने डोळ्यातील दृष्टी दोष दाखवा... नविन नजर मिळवा हा उपक्रम राबविला



जात आहे. माजी.आ.शंकर अण्णा धोंडगे यांचा जोरकश अशा दौरा दिसुन येत नाही, पण वेळ आली तर येणाऱ्या काळात जोर वाढु शकतो आशा पाविञा घेतल्याचे दिसुन येत आहे. मतदारसंघात खरी पंचायत वंचितच बहुजन आघाडीत बघायला मिळत आहे ञिमुर्तीला ढावळुन शिवभाऊ नंरगलेला उमेदवारी जाहीर झाली पण ञिमुर्ती पैकी चंद्रशेन गौंडगावकर यांनी प्रतेक सर्कल मध्ये शक्ती प्रदर्शन करायला सुरुवात केली आहे. येणाऱ्या काळात भावी उमेदवार म्हणुन प्रचार करत आहेत येणाऱ्या काळात कोणाचा दिवा फड..फड करुन विझून जाईल हे लवकरच दिसुन येणार आहे. भाजपाचे माजी नगराध्यक्ष सुर्यवंशी यांनी आगामी निवडणुकीसाठी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे भाजपाची उमेदवारी मागीतली असल्याने चिखलीकरांना हा मोठा धक्का मानला जात असून याची चर्चा मतदारसंघात होत आहे. विधानसभा निवडणुक जाहीर होण्यास काही दिवसाचा अवधी शिल्लक राहिला असून त्या अनुषंगाने विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी अनेक इच्छुक तयारी करीत असल्याचे दररोज समोर येत आहेत.खा.प्रताप पाटील चिखलीकर यांचा हक्काचा मतदार संघ असलेल्या लोहा विधानसभा मतदारसंघात भाजपाकडून निवडणूक लढवणार असल्याचे माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांनी जाहीर केले त्या संदर्भाने मतदारसंघाच्या विविध भागात दौरे, उद्घाटने सुद्धा सुरू करून मतदारांच्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. वीस वर्षांपूर्वी लोहा कंधार तालुक्याचे काँग्रेस पक्षाचे पुढारी प्रताप पाटील चिखलीकर होते. त्या काळात माजी नगराध्यक्ष कल्याण सूर्यवंशी यांचे राजकीय वारसदार म्हणुन गजानन सूर्यवंशी यांना राजकारणात संधी मिळवून दिली, नगरपालिकेच्या निवडणुकीत विजय मिळवून दिला हे सत्ये आहे.हे त्यांनी अनेक वेळा कथन केले आहे, तेव्हापासून गजानन सूर्यवंशी आजपर्यंत लोहा नगरपालिकेच्या सभागृहात आहेत. मागच्या वेळी प्रताप पाटील चिखलीकर यांनी भाजपाकडून गजानन सावकार सूर्यवंशी यांना उमेदवारी देऊन लोकनियुक्त नगराध्यक्ष होण्याचा मान मिळवून दिला.

लोहा न.पा सभागृहात काही विश्वासू चिखलीकर समर्थक होते.विस्वासु सर्मथकानी स्वा:ताच्या आर्थिक फायद्यासाठी व पदाच्या लालसेपोटी खा.चिखलीकर व सुर्यवंशी यांच्यात दुरावा निर्माण कशा होईल चंग बांधला या घडामोडीतुन हाडामासाच्या कार्येकर्त्यात दुरावा निर्माण झाला. या मोठी ठिंणगी पडली माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी व माजी खा. प्रताप पाटील चिखलीकर यांच्यात अनेक वेळा मतभेद झाल्याचे दिसून आले. माजी नगराध्यक्ष गजानन सूर्यवंशी यांनी आपल्या काही समर्थकांना घेऊन मुंबई येथील भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन लोहा विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी भाजपाकडून उमेदवारी मिळावी यासाठी रीतसर अर्ज दिला व अर्ज देऊन उमेदवारीची मागणी केल्याचे सोसलमिडीयावर वाचायला मिळत आहे. गजानन सावकार सुर्यवंशी राजकारणात पाऊल ठेवलेले यांना संधी मिळाली तर लोहा विधानसभा निवडणूक लढवण्याची तयारी दाखवली आहे.भाजपचे माजी खा प्रताप पाटील चिखलीकर यांनी गजानन सावकार सुर्यवंशी यांच्या उमेदवारी संदर्भात कोणतेच भाषा केले नाही.पण पक्षश्रेष्ठी काय भूमिका घेते येणाऱ्या काळात दिसुन येईल. शहरात मागील काळापासुन राजकारणाचे वलय असलेले रक्ताच्या नात्यातील व राजकारणाचा श्री गणेशा शिकविलेले गजानन सावकाराचे काका कल्याण सावकार सुर्यवंशी खा.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या प्रतेक बैठकीला हाजरी लावतात हे कोणते धोतक मानले जाते यावरुन शहरातील मतदाराने काय संमजावे ? माजी नगराध्यक्ष गजानन सावकार सूर्यवंशी यांनी भारतीय जनता पक्षाकडे विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी उमेदवारीची मागणी केल्याचे कळताच मतदारसंघात जोरदार चर्चा ऐकायला मिळत आहे.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १३ ऑक्टोबर २०२४ | १

## महिलेचा विनयभंग

छत्रपती संभाजीनगर, : रस्त्याने जाणाऱ्या महिलेला शिवीगाळ, मारहाण करुन तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजेच्या सुमारास सिपेट कॉलेज समोर घडली. प्रकरणात पीडित महिलेने तक्रार दिली. त्यानूसार, पीडिता ही सिपेट कॉलेज समोर फिरत असतांना आरोपी अनिल मारुती मकळे (२६), लक्ष्मण मारुती मकळे (२४), बादल कल्याण मकळे (२३) आणि आनंद कल्याण मकळे (२५, सर्व रा. आंबेडकरनगर) यांनी तिला शिवीगाळ करून मारहाण केली. तर अनिलने पीडितेशी अश्लिल चाळे करुन तिचा विनयभंग करीत तु जर यानंतर आमच्या नादाला लागली तर तुला खतम करुन टाकू अशी धमकी दिली.

## पोस्टाच्या कार्यालयात धुडगूस घालणाऱ्यांवर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर : पोस्टाच्या कार्यालयात धुडगूस घालून कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की, शिवीगाळ करुन व्हीडीओ बनविल्याचा प्रकार ९ ऑक्टोबर रोजी दुपारी ३.२० वाजेच्या सुमारास घडला. प्रकरणात डॉ. शोएब हाश्मीहसह २५ ते ३० जणांविरोधात सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणात वरिष्ठ पोस्ट मास्टर सुरेश लिंबाजी बनसोडे (५६) यांनी फिर्याद दिली. त्यानूसार, फिर्यादी हे आपल्या कॅबीनमध्ये काम करीत असतांना डॉ. शोएब हाश्मी व त्यांचे २५ ते ३० साथीदार फिर्यादीच्या कॅबीन बाहेरील शिपाई महिलेला धक्काबुक्की करुन कॅबीनमध्ये शिरले. व मोठ मोठ्याने शिवीगाळ करुन शोएब याने जनतेचे प्रश्न मला सोडवावे लागतात, मला निवडणूक लढवायची आहे, असे म्हणाला तर इम्रान सालार व त्याच्या साथीदारांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांना मोठमोठ्याने शिवीगाळ केली. तसेच कार्यालयीतील वरिष्ठ मॅनेजरला देखील त्यांनी शवीगाळ करुन विनापरवानगी कार्यालयात तसेच पैशाच्या कॅबीनची व्हीडीओ शुटींग करुन ती इन्स्टाग्रामवर व्हायरल केली. प्रकरणात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन डॉ. शोएब हाश्मी, इम्रान सालार, शोएब खान, इम्रान लाला, पप्पुभाई शेख, काशीफ शेख, इलीयास बक्स यांच्यासह २५ ते ३० जणांवर विरोधात शासकीय कामात अडथळा निर्माण केल्या प्रकरणी सिटीचौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपनिरीक्षक शाकीर शेख करीत आहेत.

## युवकांनी केला आत्मदहन करण्याचा प्रयत्न

सिल्लोड, (प्रतिनिधी) अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कार्यालयात दोन जणांनी विष घेऊन आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला तसेच पाच जणांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. आदिवासी कोळी समाजाच्या वतीने यापूर्वी अल्पसंख्याक मंत्री यांना निवेदन देऊन आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. अल्पसंख्याक मंत्र्यांनी आश्वासन दिले होते की आदिवासी कोळी समाजाचा मुख्य प्रश्न आदीवास कोळी मल्हार जमात वैद्यता प्रमाणपत्र मिळत नसल्यामुळे समाजाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी तात्काळ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बैठक लावून तुमचा प्रश्न सोडवू परंतु दिलेल्या तारखेपर्यंत समस्या न सोडवल्याने युवकांनी अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कार्यालयात आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

## खट्याळ पिट्या...




# चोरट्यांकडून ५ लाख लाखांचे दागिने जप्त

छत्रपती संभाजीनगर : वाळूज महानगरात भरदिवसा दोन ठिकाणी घरफोडी करून लाखो रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरणाऱ्या चोरट्यासह चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्यास एमआयडीसी वाळूज पोलिसांनी अटक करून त्यांच्याजवळून ५ लाख ७० हजार रुपये किमतीचे १० तोळे ८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने जप्त केले.

अमोल ऊर्फ दाद्या धर्मा इगवे (३२, रा. बाजारतळ, उमापूर ता. गे वराई, जि. बीड) तर अनिल रावसाहेब काथवटे (५०, रा. ब्राह्मणगल्ली, शेवगाव, जि. अहमदनगर) असे आरोपींची नावे आहेत. पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे यांनी सांगितले की, गुलाबराव साहेबराव आडे (रा. गोलोक कारनेशन, गट क्रमांक ५२/१ वडगाव को.) व त्यांच्या पत्नी ८ एप्रिल रोजी दुपारी घराला कुलूप लावून गेले होते. दुपारी साडेबारा वाजेच्या सुमारास ते घरी आले असता दाराला लावलेले कुलूप दिसून आले नाही. तसेच घरातील कपाटात ठेवलेले २ लाख २ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने चोरीला गेल्याचे त्यांना समजले होते. या प्रकरणी तपास सुरू असताना या गुन्ह्यातील संशियत चोरटे मध्यवर्ती कारागृहात असल्याची माहिती सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे यांना मिळाली होती.

कोर्टाच्या परवानगीने पोलिसांनी अमोल ऊर्फ दाद्या इगवे व अनिल काथवटे यांना ताब्यात घेऊन त्यांची चौकशी केली असता अमोल याने एप्रिल महिन्यात गोलोक सोसायटी येथे तर मे महिन्यात तीसगाव शिवारातील

राजस्वप्नपूर्ती सोसायटीमधील ऊर्मिला साठे याचे बंद घर त्याच्या एका अल्पवयीन साथीदारासोबत फोडून चोर लेले दागिने शेवगाव येथील अनिल काथवटे या सोनारास विकल्याची कबुली दिली होती. यावरून पोलिसांनी अनिल काथवटे त्याच्याजवळून ५ लाख ७० हजारांचे दागिने जप्त केले आहेत. पोलिसांनी ४ ऑक्टोबर रोजी सदर गुन्ह्यात दोघा आरोपींना अटक करून न्यायालयासमोर उभे केले न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी सुनावली. ही कामगिरी वरिष्ठ पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे पोलिस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर, दिनेश बन, जमादार विनोद नितनवरे, बाळासाहेब आंधळे, जालिंदर रंधे, पोलिस अंमलदार राजभाऊ कोल्हे, गणेश सागरे, यशवंत गोबाडे, विशाल पाटील, हनुमान ठोके, नितीन इनामे, समाधान पाटील यांनी केली.

## डिफेन्स क्लस्टर प्रयत्न होणे गरजेचे डॉ. समीर कामत यांचे प्रतिपादन

छत्रपती संभाजीनगर : संभाजीनगरात औद्योगिक प्रगतीसाठी पोषक वातावरण आहे. मात्र डिफेन्स क्लस्टर गरजेचे आहे. शहरात जशा ऑटो पार्टमध्ये इथल्या कंपन्या पुढे एकत्र आल्या, तशाच देशात संरक्षण क्षेत्रात अनेक कंपन्या इंटिग्रेटेड आहेत. त्यांच्यासाठी आवश्यक सुटे भाग आणि सबसिस्टीम पुरवण्यासाठी तयार व्हा, असे प्रतिपादन संरक्षण संशोधन आणि विकास संस्थचे (डीआरडीओ) अध्यक्ष डॉ. समीर कामत यांनी व्यक्त केला. कांचनवाडी येथील छत्रपती शाहू इंजिनिअरिंग महाविद्यालयात मॅजिकतर्फे डिफेन्स इनोव्हेशन चॅलेंज फॉर एक्सलन्स स्पर्धेचे शनिवारी (दि.५) डॉ. कामत यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी संस्थेचे संचालक प्रसाद कोकीळ, सीआयआयच्या पश्चिम विभागाचे उपाध्यक्ष आणि बागला ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक ऋषीकुमार बागला, डीआरडीओ अध्यक्षांचे तांत्रिक सल्लागार मनीष भारद्वाज आणि सीएमआयएचे अध्यक्ष अर्पित सावे, मराठवाडा ऑटो क्लस्टरचे अध्यक्ष, मॅजिकचे संचालक मिलिंद कंक, आशिष गर्दै, रितेश मिश्रा, सीएसएमएसएसचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, डॉ. उल्हास शिंदे, एस. बी. कुलकर्णी यांची व्यासपीठावर उपस्थितो होती. कामत म्हणाले की, डीआरडीओ, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांनी एकत्र येऊन आधुनिक तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी पुढाकार घ्यावा. उत्तर प्रदेश आणि तमिळनाडूमध्ये डिफेन्स कॉरिडॉरचे सेटअप सुरू आहे. छत्रपती संभाजीनगरात असा काही कॉरिडोअर करता येईल का? या प्रश्नावर ते म्हणाले, की मी येथील औद्योगिक विकासाने प्रभावित झालो.

## दान उत्सवानिमित्त महिला सफाई कर्मचाऱ्यांना बक्षीस

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक चळवळ दान उत्सव या मोहीम अंतर्गत २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर दरम्यान सुरू देशव्यापी विठ्ठल नगर सुका कचरा वर्गीकरण केंद्रावर महिला स्वच्छता कर्मचारी यांना भेट वस्तू देण्यात आल्या. हा कार्यक्रम छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका व इको सत्व संस्था यांचा संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.

मनपा आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता कर्मचारी यांच्या जीवनमान सुधारावा व त्यांचा कामाच्या परिस्थिती सुधारली पाहिजे यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून विठ्ठल नगर सुका कचरा वर्गीकरण केंद्रावर स्वच्छता कर्मचाऱ्यांचे सत्कार करण्यात आले. यासाठी मनपा उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख रवींद्र जोगदंड, स्मार्ट सिटीच्या अर्पिता शरद, इको सत्वाच्या गौरी मिराशी, अक्षय गणाचार्य व अन्य उपस्थित होते.

जोगदंड म्हणाले की स्वच्छतेत काम करण्याऱ्या महिलांची परिस्थिती सुधारली पाहिजे यासाठी महानगरपालिका प्रशासन कार्य करत आहे. आपल्याकडे ३००० कर्मचारी त्यात पंधराशे महापालिकेचे आहेत पंधराशे रेडी कंपनीचे आहेत. जवळपास शहरांमध्ये दररोज चार लाख ५० हजार किलो एवढ्या मोठ्या प्रमाणात छत्रपती संभाजीनगरकर कचरा निर्माण करतात आणि तेवढा कचरा आपण रोज उचलतो आपल्याकडील ३०० घंटा गाडी द्वारे हा कचरा उचलला जातो हा कचरा आपल्याकडे तीन सेंटरला जातो. ओल्या कचऱ्यावर आपण प्रक्रिया करून त्याचा खत तयार करतो.

या सगळ्या व्यवस्थेमध्ये स्वच्छतेच्या आपल्या महिलांचा सहभाग फार चांगला आहे. आपण इथे काम करता. ह्या प्लास्टिक काचऱ्याची आपण प्रक्रिया केली नसती हे कुठेतरी कचऱ्यात गेला असता पाण्यात मिसळ असते नदीमध्ये गेला असता आणि तिथे पुन्हा वेगळा समस्या निर्माण झाल्या असता. जे प्लास्टिक नष्ट होत नाही त्याला आपण सिमेंट फॅक्टरीला पाठवतो जेथे बॉयलर मध्ये जाळले जातं आणि त्या सिमेंट कंपन्याकडे प्लॅस्टिक ला सुरक्षितपणे जाळण्याची व्यवस्था असते. आपलं काम छोटं नाही आपलं काम रोजगाराच्या दृष्टीने छोटा आहे परंतु पर्यावरणाच्या दृष्टीने फार मोठा काम आहे, ते म्हणाले.

## प्रामाणिकपणे अज्ञानाचा स्वीकार करणे ही ज्ञानाची सुरुवात असते : प्रा.डॉ.एस.जी.निगळ

### एमजीएममध्ये 'फिलॉसॉफर्स वर्ल्ड' व्याख्यानमाला संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१२ : तत्त्वज्ञान विषयाच्या अस्तित्वाविषयी कायम बोलले आणि लिहिले जाते. तत्वज्ञान हा विषय शाश्वत असून तो कायम वाचला जाणार आहे. तत्वज्ञान असो की इतर कोणताही विषय त्या संबंधित विषयाचा अभ्यास करत असताना प्रामाणिकपणे अज्ञानाचा स्वीकार करणे, ही ज्ञानाची सुरूवात असल्याचे प्रतिपादन मुंबई विद्यापीठातील तत्वज्ञानाचे प्राध्यापक डॉ.एस.जी.निगळ यांनी यावेळी केले.

महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभाग आयोजित 'फिलॉसॉफर्स वर्ल्ड' या व्याख्यान मालेतील द्वितीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई विद्यापीठातील तत्त्वज्ञान विभागाचे प्राध्यापक डॉ. एस.जी.निगळ यांनी 'सॉक्रेटिस: अ मार्टीर ऑफ रिझन' या विषयावर दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थितांशी संवाद साधला. यावेळी, अधिष्ठाता प्रा.डॉ.जॉन चेल्लादुराई, विभागप्रमुख प्रा.डॉ. संजय हरके, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित उपस्थित होते.

डॉ. निगळ पुढे बोलताना म्हणाले, सॉक्रेटीस बाजारपेठेत लोकांसोबत चर्चा करून त्यांना त्यांच्या श्रद्धांवर विचार करायला प्रवृत्त करत असे. जेंव्हा असे विचारवंत समाजाला केवळ बौद्धिक खाद्य न पुरवता विचारप्रवृत्त करतात तेंव्हा प्रस्थापित राजकारणी आणि धर्ममार्तंड यांचे धाबे दणाणतात. त्यामुळे ही पद्धती धार्मिक आणि राजकीय सत्तांशी संघर्ष निर्माण करणारी ठरली. त्याला मृत्युदंडाची शिक्षा झाली. सॉक्रेटीसने आपली सत्यावर निष्ठा कायम ठेवून, आनंदाने मृत्युदंड स्वीकारला. सॉक्रेटीसचा जन्मदिवस जागतिक तत्वज्ञान दिन म्हणून दर वर्षी नोव्हेंबरच्या तिसऱ्या गुरुवारी साजरा केला जातो. महात्मा गांधी यांनी सॉक्रेटीसवर पाच निबंध लिहिले होते, ज्यात त्यांनी सॉक्रेटीसच्या नैतिक धैर्याची प्रशंसा करत सॉक्रेटीसला सत्याचा सैनिक म्हटले होते, असे डॉ. निगळ यांनी यावेळी सांगितले. या व्याख्यानमालेचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.रामेश्वर कणसे यांनी केले तर आभार डॉ. मंजुश्री लांडगे यांनी मानले.

## कॅरीबॅग न वापरण्यासाठी हिंदी विद्यालयात केली जनजागृती

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र हिंदी विद्यालय व सामाजिक कार्यकर्त्या पद्मा तापडिया व चमू यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ७ ऑक्टोबर रोजी प्लास्टिक पिशव्यांचा वापर न करण्याबाबत शाळेमध्ये विद्यार्थ्यांची जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमात अध्यक्षस्थानी यावेळी मुख्याध्यापक रवींद्र तायडे होते. व्यासपीठावर पद्मा तापडिया, किरण भट्टड, राधिका वेलंगी, पर्यवेक्षक योगेश्वर निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. सामाजिक कार्यकर्त्या व मातोश्री वृद्धाश्रमाच्या संचालिका पद्मा तापडिया यांनी कॅरीबॅग न वापरण्याचे दुष्परिणाम सांगून कॅरीबॅग बंदी चळवळ उभारावी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तरपणे मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी पिशवी नको प्लास्टिकची वापरा कापडी, प्लास्टिक हटाव पर्यावरण बचाव अशा घोषणा देण्यात आल्या. यावेळी विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या पिशव्या न वापरण्याचा मनोमन संकल्प केला.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना कापडी पिशव्यांचे वितरण करण्यात आले. शाळेतील उपक्रमशील शिक्षक संदीप भदाणे यांना राष्ट्रीय शिक्षक दिनी एका स्वयंसेवी संघटनेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे पद्मा तापडिया यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन संदीप भदाणे यांनी केले. तर आभार गोविंद गायकवाड यांनी मानले. कार्यक्रमास विलास बुधवंत, साहेबराव पाटील, विठ्ठल राठोड, योगेश निंबोणे, मनीषा थोरात, सोनाली वाकळे, समाधान देशमुख, शुभांगी दसपुते, सुनिता गुंजाळ, सविता नागकीर्ती, अनिता मुदिराज, सोनाली देसले, स्नेहल गोर्डे, सोपान करवंदे, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## अद्रक पीक सड साठी शिवार फेरीत मार्गदर्शन



छत्रपती संभाजीनगर – तालुक्यात आद्रक या पिकाची लागवड खरीप हंगामात करण्यात आली होती मात्र यावर्षी त्या पिकावर मोठ्या प्रमाणात कंदकुज, मुळकुज व मर या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने तालुका कृषी अधिकारी कार्यालय व राष्ट्रीय संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आज बाजार सांगवी परिसरात शिवार फेरी माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी या कार्यक्रमाच्या निमित्ताने आयोजित करून शेतकऱ्यांना त्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

तालुक्यात आद्रक या पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती मात्र यावर्षी त्या पिकावर मोठ्या प्रमाणात कंदकुज, मुळकुज व मर या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव झाल्याने खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्या शक्यता असल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले होते त्यानुसार तालुका कृषी अधिकारी कार्यालय व राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प यांच्या संयुक्त विद्यमाने आज बाजार सांगवी , सोबलगाव, सुलतानपूर, भांडेगाव , खांडी पिंपळगाव इत्यादी परिसरात शिवार फेरी केली व त्यात प्रत्यक्ष शेतावर जाऊन अद्रक पिकाचे पाहणी तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे अधिकारी तसेच कर्मचारी आणि राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्प चे शास्त्रज्ञ यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

यावेळी राष्ट्रीय कृषी संशोधन प्रकल्पाचे प्रभारी डॉ. सूर्यकांत पवार यांनी अद्रक पीक घेताना घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले त्यांनी सांगितले की अद्रक घेताना निचरा जमिनीची निवड केली पाहिजे, जमीन तयार करताना पूर्ण कुजलेले शेणखतच वापरले पाहिजे, आद्रक च्या कंदला योग्य ती बीजप्रक्रिया केली पाहिजे, तसेच तसेच अद्रक पिकात येणारी सड ही कंदमाशी तसेच बुरशी च्या प्रदुर्भावामुळे असू शकते, कंदमाशीचा वावर दिसल्यास योग्य त्या कीटकनाशक फवारणी केली पाहिजे व बुरशी मुळे कंद सड होत असल्यास बुरशीनाशकाची आळवणी केली पाहिजे. तसेच सध्या सड लागलेल्या शेतावर यांनी कृषी विद्यापीठाने तयार केलेल्या बायोमिक्स या सेंद्रिय घटकाचा वापर करून नुकसान कमी करता येईल.

यावेळी तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे, मंडळ कृषी अधिकारी के एन इंगळे कृषी पर्यवेक्षक आर के गायकवाड पी व्ही घायत, कृषी सहाय्यक महेश सदावर्ते, संजय सुरसे ,गणेश सुरडकर, सचिन सरगर , श्रीकृष्ण नागरे इत्यादी व शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## आय एम ए मध्ये नवरात्री निमित्त गरबा, डॉक्टर व परिवारातील सदस्यांचा उस्त्फुर्त सहभाग



छत्रपती संभाजीनगर – इंडियन मेडिकल असोशिएशन सांस्कृतिक विभाग तर्फे १० ऑक्टोबर २०२४ रोजी आय एम ए हॉल येथे आय एम ए च्या सदस्यांसाठी नवरात्री निमित्त गरब्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शहरातील डॉक्टर व त्यांच्या परिवारातील सदस्यांनी उस्त्फुर्त सहभाग नोंदविला. शहर शाखेच्या अध्यक्षा डॉ उज्वला दहिफळे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता, सचिव डॉ विकास देशमुख यांनी कार्यक्रमासाठी प्रोत्साहन दिले तर सांस्कृतिक सचिव डॉ प्रशांत देशपांडे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी डॉ. प्रफुल जटाळे, कोषाध्यक्ष, डॉ. केदार साने उपाध्यक्ष, डॉ. अर्चना साने–सहसचिव , डॉ अक्षय मारावार–सहसचिव क्लीनिकल, डॉ. उज्वला झवर , वुमेन्स विंग चेअरमन, डॉ उर्मिला चाकूरकर, सचिव वुमेन्स विंग , डॉ सोनाली सावजी आओ गाव चाले चेअरमन आदींनी परिश्रम घेतले. १०० हुन अधिक डॉक्टरांनी गरब्यामध्ये सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांना भेटवस्तू देण्यात आल्या.

## देवगिरी होकेशनल ट्रेनिंग सेंटर च्या वतीने आर्यन टेमक सत्कार



छत्रपती संभाजीनगर – MBBS च्या पुढील शिक्षणासाठी परदेशात जात असलेल्या आर्यन टेमक यांचा देवगिरी होकेशनल ट्रेनिंग सेंटर च्या वतीने सत्कार करण्यात आला. पारिजात नगर छ ४येथील देवगिरी होकेशनल ट्रेनिंग सेंटर उ्चडढ तर्फे आज कामगार नेते व परिवर्तन कॉम्प्युटर्स चे संचालक मधुकर खिल्लारे यांनी आर्यनला शाल पुषगुच्छ व श्रीफळ दिले.यावेळी देवगिरी ट्रेनिंग सेंटर चे अध्यक्ष भाऊसाहेब पवार सेक्रेटरी डॉ पवार यांची उपस्थिती होती.सत्कार प्रसंगी मधुकर खिल्लारे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच भाऊसाहेब पवार यांनी अध्यक्ष समोरोप केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.धैर्यशील पवार यांनी तर आभार सुकन्या शिंदे मॅडम यांनी मानले.संस्थेचे विश्वासू डॉ. विजयसिंह पवार,आणि विद्यार्थी पालकांची उपस्थिती होती

## 'पुरुषार्थाला साथ चौथ्या स्तंभाची' पुस्तकाचे थाटात प्रकाशन

### डॉ. पुरुषोत्तम भापकर यांच्या कार्याची प्रशंसा

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी – सेवानित्त विभागीय आयुक्त डॉ. पुरुषोत्तम भापकर यांनी शहरात अतिक्रमण हटाव मोहिमेसह केलेल्या उल्लेखनीय कामगिरीच्या विविध वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केलेल्या बातम्यांवर आधारित 'पुरुषार्थाला साथ चौथ्या स्तंभाची' या पुस्तकाचे थाटात प्रकाशन झाले. शुक्रवारी, ११ ऑक्टोबर रोजी सायं. ६.१५ वा. महात्मा गांधी मिशनच्या व्ही. शांताराम प्रेक्षागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रकाशनानंतर भापकरांचा जीवनसंघर्ष व कार्यावर आधारित 'अमर्याद पुरुषोत्तम' हा धनंजय बावले दिग्दर्शित माहितीपटही दाखविण्यात आला. लातूर कलामंच व आम्ही औरंगाबादकर (संभाजीनगर कर) ग्रूपच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे आयुक्त व त्यानंतर विभागीय आयुक्त असताना डॉ. भापकर यांनी शहरात अतिक्रमण विरोधी मोहीम कठोरपणे राबविली. शहराच्या भूगोलात अर्थपूर्ण आशय भरून जनतेच्या मनातील सुंदर शहराचे स्वप्न त्यांनी साकार केले. या कालावधीत वृत्तपत्रांमध्ये ज्या बातम्या, वार्तापत्रे, संपादकीय, छायाचित्रे प्रसिद्ध झाली; त्यावर आधारित त्यांनी एक पुस्तक तयार केले असून, त्यातील प्रत्येक पानावर संबंधित बातमी व त्याला साजेशा कवितेच्या ओळी त्यांनी लिहिल्या आहेत. बातम्यांच्या संकलनावर आधारित पुस्तकाला माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे यांची प्रस्तावना आहे.

प्रमुख अतिथी एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, माजी खासदार उत्तमसिंग पवार, माजी विभागीय आयुक्त भास्कर मुंडे, डी. एम. मुगळीकर, उद्योगपती मानसिंग पवार, ज्येष्ठ समीक्षक प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी डॉ. भापकर यांच्या कार्याची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

डॉ. भापकर यांनी प्रास्ताविकातून आपल्या सिघनस्टाईल बेधडक कामगिरीमुळे ३५ वर्षांच्या काळात ३० ठिकाणी बदली झाली असल्याचे सांगितले. ७ वर्षे दोन ठिकाणी स्थिर राहिलो आणि उर्वरित २८ वर्षांत २८ ठिकाणी जावे लागले. आपल्या धाडसी कारवाईला विविध वृत्तपत्रांनी उत्तम प्रसिद्ध दिल्याचे सांगितले.

प्रारंभी डॉ. भापकर यांनी उपस्थित मान्यवरांचा हृद्य सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती गोवंडे यांनी, तर डी. एस.काटे यांनी आभार मानले.

## आणि ग्रंथोपजीविये! वडीलांच्या स्मृतीप्रित्यर्थ ग्रंथदान करणारे प्रा.रविंद्र दोरीक

छत्रपती संभाजीनगर : डॉ.रविंद्र दोरीक यांचे तीर्थरुप उत्तम वाचक होते. पन्नास वर्षांपूर्वी त्यांनी अनेक ग्रंथ विकत घेऊन वाचन केलेले आहे.विशेषतः विनोबा,ठाकुर रामकृष्ण,विवेकानंदांपासून वेद,उपनिषदं,पुराणग्रंथ,इतकेच नाही तर कुराण,बायबल ,बौध्द धम्म अशी विविध प्रकारची ग्रंथसंपदा त्यांच्या संग्रहात आहे.कै.दोरीक साहेबांकडे गीतेवरील भाष्य ग्रंथ किमान पंधरा सोळा सापडलेत. वडील गेल्यानंतर डॉ दोरीक यांनी वडीलांच्या लायब्ररीतील सर्व ग्रंथ संपदा विवेकानंद महा.छ.संभाजीनगरच्या मराठी विभागात जे भाषा संशोधन केंद्र आहे त्यास सप्रेम भेट देण्याचा निर्णय घेतला.या संशोधन केंद्रात ४० विद्यार्थी झह.ऊ साठी संशोधन करीत आहेत.या विद्यार्थ्यांना प्रस्तुत ग्रंथांचा मोठा उपयोग होणार आहे. आज डॉ रविंद्र दोरीक यांनी प्राचार्य डॉ. दादाराव शेंगुळे यांच्याकडे शंभर दुर्मिळ ग्रंथ मराठी भाषा संशोधन केंद्रास दान स्वरुपात भेट दिले.त्याचा संशोधक विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. आपणाकडे असे काही दुर्मिळ ग्रंथ,पोथ्या,जुनी बाडं असतील तर कृपया आमच्या संशोधन केंद्रास ती दान करावीत.आपले स्वागत आहे.

# ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेला ईशान्य भारत




संपूर्ण ईशान्य भारत ज्वालामुखीच्या तोंडावर बसलेला आहे. हे ज्वालामुखी तसे दोन आहेत. त्यांचे संपूर्ण स्फोट अजून व्हावयाचे आहेत. पण आतून धगधग चालू आहे. काही ठिणग्या बाहेर उडत आहेत. त्या दिसत आहेत. भावी महास्फोटाचे संकेतही त्या देत आहेत. डोळे व कान उघडे ठेवणाऱ्यांना त्यांचे घातक अस्तित्व आणि भीषण भविष्य जाणवत आहे. परंतु, ज्यांनी कोणत्याही कारणाने का होईना, आपले कान आणि डोळे झाकून घेतले आहेत, त्यांना या संकटाची जाण नाही. अथवा असेही असू शकते की, जाण आहे, पण ती दाखवायची नाही, तिचे स्पंदन नाकारायचे, असे त्यांनी ठरविले आहे. केवळ ५३ वर्षांपूर्वी घडलेल्या भीषण विभाजनापासून त्यांनी काही शिकायचे नाही, असे ठरविले दिसते. दोन लाख निरपराधांची हत्या आणि दोन कोटींचे निर्वासन हे जे महापाप, डोळ्यावर कातडे पांघरून चालणाऱ्या थोर लोकांच्या हातून घडले, तेच पाप आता पुनश्च करण्याची त्यांची नीती दिसते. आपल्या दुर्भाग्याला, मला वाटते, काही मर्यादाच नसावी.

**राज्यपालांचा अहवाल**

आसामचे राज्यपाल सेवानिवृत्त लेफ्टनंट जनरल एस. के. सिन्हा यांनी १९९९ च्या नोव्हेंबरमध्ये राष्ट्रपती के. आर. नारायणन् यांच्याकडे आसामच्या परिस्थितीच्या संदर्भात एक अहवाल पाठविला. त्यातील खालील वाक्ये कुणाही देशभक्ताच्या अंत:करणात काळजी उत्पन्न करतील. राज्यपाल लिहितात-

''आसामच्या मैदानी भागात अवैध घुसखोरांचा जो प्रवाह सुरू आहे, त्यामुळे, हा प्रदेश मुस्लिमबहुल बनत आहे. लवकरच हा बांगला देशात समाविष्ट करावा, अशी मागणी होण्याची शक्यता आहे. आसामचा हा खालचा भाग आपल्या हातून गेला की, संपूर्ण ईशान्य भारताचा भूभाग भारतापासून कटेल; आणि नैसर्गिक संपदांनी युक्त असलेला हा भाग आपल्या राष्ट्राला मुकावा लागेल.''

राज्यपालांचा अहवाल प्रकट होताच आसमात वादंग माजले. राजकीय पक्षांच्या दोन फळ्या बनल्या. भाजपाने, राज्यपालांचा हा अहवाल गांभीर्याने घेतला पाहिजे, असा आग्रह धरला; तर काँग्रेसने, राज्यपालांवर सांप्रदायिकतेचा ठप्पा मारून त्यांना परत बोलावण्याची मागणी केली. प्रश्न पडेल की सत्य परिस्थिती कोणती आहे? आपले मत बनविण्यापूर्वी, वाचकांनी खालील मुद्दे ध्यानात घ्यावेत.

१) आसाम विधानसभेच्या १२६ मतदारसंघांपैकी ५७ मतदारससंघांमध्ये मतदारांच्या संख्येत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही वाढ १९९४ ते १९९७ या तीन वर्षांमधली आहे. मतदारसंख्या वाढीची या काळातील अखिल भारतीय सरासरी ७.४ टक्के आहे.

२) १९७१ च्या तुलनेत १९९१ साली, आसाममधील मुसलमानांच्या लोकसंख्येत ७२.४२ टक्के वाढ झाली आहे. (१९८१ मध्ये आसामात जनगणना झाली नव्हती.)

३) धुबरी, गोलपारा, बारपेटा आणि हैलकंडी हे चार जिल्हे मुस्लिमबहुल झाले आहेत आणि अन्य तीन त्याच वाटेने जात आहेत. १५ ऑगस्ट १९४७ ला, फक्त धुबरी जिल्हा मुस्लिमबहुल होता.

आसामच्या राज्यपालांनी ही वस्तुस्थिती ध्यानात घेऊन आपला अहवाल पाठविला होता. त्यावर आसाम काँग्रेसचे अध्यक्ष तरुण गोगोई यांची मुक्ताफळे अशी ''धुबरी आणि गोलपारा जिल्ह्यातील मुसलमान एखाद्या दिवशी भारतापासून अलग होण्याची मागणी करतील, असे विधान करून राज्यपालांनी त्यांच्या देशभक्तीवर व निष्ठेवर शंका घेतली आहे. हे आम्हाला मान्य नाही. आम्ही राज्यपालांना परत बोलावण्याची मागणी केली आहे.''

काँग्रेस अध्यक्षाच्या वक्तव्यापासून जणू काही स्फूर्ती घेऊन, युनायटेड मायनॉरिटी फ्रंटचे अध्यक्ष, खासदार गोलम उस्मानी यांनी राज्यपालांवर जातीय संघर्षाला चिथावणी देण्याचा आरोप केला.

**सरकारी प्रयत्न**

बांगला देशातून होणारी अवैध घुसखोरी थांबविण्यासाठी सरकारने प्रयत्न केले आहेत. सीमा सुरक्षा दलाला हे कार्य सांगितलेले आहे. तरी पण घुसखोरी चालूच आहे. धुबरी नगरपालिकेचे अध्यक्ष कल्याण पुरकायस्थ म्हणाले, ''कुंपण घातल्यामुळे सरळसरळ घुसखोरीला आळा बसला आहे. परंतु, आता घुसखोर पश्चिम बंगालमधून येत आहेत. पुरकायस्थ यांनी सूचना केली आहे की, पश्चिम बंगाल व आसाम यांना जोडणारा जो ३१ क्रमांकाचा महामार्ग आहे, तो सैन्याच्या स्वाधीन करावा. धुबरी जिल्ह्याला लागून भारत आणि बांगला देश यांच्यात जी आंतरराष्ट्रीय सीमा आहे, तिच्या रक्षणासाठी सीमा सुरक्षा दल आहे. परंतु, एका बटालियनला या सीमेच्या ७० कि. मी. लांबीचे रक्षण करावे लागते. ही लांबी परिणामकारक संरक्षणाच्या दृष्टीने जास्त आहे. पंजाबच्या आंतरराष्ट्रीय सीमेवर एका बटालियनला ३० कि. मी. लांबीचे रक्षण करावे लागते. राज्यपाल सिन्हा यांनीही आपल्या अहवालात, एका बटालियनला ३० कि. मी., या प्रमाणात अधिक सैन्य पाठविण्याची विनंती केली आहे.

सीमा सुरक्षेबरोबरच सिन्हा यांनी विवादास्पद अवैध घुसखोरी ठरविण्याचा जो कायदा (इल्लिगल मायग्रण्ट्स डिटरमिनेशन ट्रिब्युनल- आयएमडीटी) १९८३ साली



करण्यात आला, तो रद्द करून नवीन कायदा बनविण्याची सूचनाही केली आहे. विद्यमान कायद्यानुसार एखाद्या व्यक्तीने अवैध प्रवेश केला आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी तक्रारकर्त्यांची ठरविली आहे. परंतु, हे चूक आहे. आपला प्रवेश वैध आहे, हे सिद्ध करण्याची जबाबदारी त्या व्यक्तीची असली पाहिजे. राष्ट्रपतींनीही आपल्या अभिभाषणात १९८३ चा हा कायदा रद्द करण्याचा मानस असल्याचे म्हटले होते. आपल्या आजवरच्या चरित्रानुसार काँग्रेसने हा कायदा रद्द करण्याला विरोध केला आहे. काँग्रेसचे म्हणणे असे आहे की, हाच कायदा, अल्पसंख्यकांच्या हिताचा आहे!

**मुसलमानांचा कांगावा**

काही दिवसांपासून, आयएसआय आणि आतंकवादी मुस्लिम टोळ्या, यांच्याविरुद्ध पोलिस आणि सेना यांनी मोहीम चालविलीआहे. या आतंकवादी टोळ्यांना मदरसे आणि मशिदी यात संरक्षण मिळाल्याचे आढळून आले. त्यामुळे या मदरशांविरुद्ध कारवाई करण्यात आली. या कारवाईच्या विरुद्ध आणि विशेषत: आसाम गण परिषदेच्या सरकारला भिवविण्याकरिता गेल्या एप्रिल महिन्यात मुसलमानांचा एक मोठा मेळावा गुवाहाटीला भरविण्यात आला होता. त्या मेळाव्यात मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महंत यांनाही बोलाविण्यात आले होते. ते तेथे म्हणाले की, १९८३ चा कायदा रद्द झाला, तरी आमचे सरकार अल्पसंख्यकांचे संरक्षण करण्याच्या कामात कसलीही कसर ठेवणार नाही. काँग्रेसच्या अध्यक्षांनी याच सभेत सांगितले की, आमच्या सरकारने १९८३ साली, अल्पसंख्यकांच्या रक्षणासाठी हा कायदा बनविला होता. तो आम्ही रद्द होऊ देणार नाही.'' जमीयत उल उलेमा हिंदचे अध्यक्ष मौलाना असद मदानी यांना या मेळाव्यासाठी विशेष रूपाने बोलावले होते. मेळाव्याची भव्यता बघून त्यांना खूप जोश चढला आणि त्यांनी सांगून टाकले की, आसाममध्ये एकही अवैध बांगलादेशी नाही! आयएसआयच्या कारवाया वाढल्या असल्याचेही त्यांनी खंडन केले आणि अल्पसंख्यकांना त्रास देण्याचा हा डाव आहे. अशी टीकाही केली.

मौलानांच्या या उद्गारांना, मुख्यमंत्री महंत यांनी विधानसभेत उत्तर दिले. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, आसामात आयएसआयच्या कारवाया वाढल्या आहेत आणि मदरसे आणि मशिदी यांचा त्यांनी आपल्या कारवायांसाठी दुरुपयोग केला आहे. या स्थानांचा दुरुपयोग होऊ नये, यासाठी आम्ही तपासासाठी सरकारी अधिकारी नेमणार आहोत. पण ते सारे मुसलमान असतील. (वाऽरे आपले सेक्युलर राज्यकर्ते!) परंतु, महंत यांच्या या वक्तव्याने मुस्लिम बुद्धिजीवी तळमळले. आसाम छात्र संघा (आसू) ने तर मौलाना मदानीच्या अटकेचीच मागणी केली. ही प्रतिक्रिया बघून त्या मेळाव्याने आलेला जोश थोडा थंड झाला. आगपला सांप्रदायिक म्हणणेही त्यांना जड जात आहे. कारण हे 'सांप्रदायिक' विशेषण, मुसलमानांनी भाजपासाठी आरक्षित केलेले आहे. अब्दुल खालिक नावाच्या मुस्लिम पत्रकाराने अवैध बांगला देशींकरिता 'पूर्व वंगोद्भव मुसलमान' असा शब्दप्रयोग केला आहे. ही शुद्ध चालाखी आहे. शब्दच्छल आहे. बांगला देशाला म्हणावे, भारतात विलीन होऊन जा. मग तो आमचा पूर्व बंगाल बनेल आणि तेथले मुसलमान 'पूर्व वंगोद्भव' ठरतील. मुसलमानांना कुणीतरी हे ठणकावून सांगितले पाहिजे. आसामची परिस्थिती कठिण आहे. अत्यंत तत्परतेने सावधगिरीच्या उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**ख्रिस्ती ज्वालामुखी**

दुसरा ज्वालामुखी ख्रिस्ती लोकांच्या कारवायांनी तयार झाला आहे. नागांची बंडखोरी चालूच आहे. नागालँडमध्ये सरकार नाममात्र आहे. करांची वसुली बंडखोर नागा करीत असतात. सध्या भारत सरकार आणि नागा बंडखोर यांच्यात युद्धतहकुबी आहे. युद्धतहकुबी! शंभर कोटींच्या लोकांच्या देशाकरिता अपमानास्पद असा हा शब्द आहे. बारा लाख नागा! आणि त्यांची शंभर कोटींच्या देशाशी बरोबरीच्या नात्याने युद्धबंदी! वस्तुस्थिती अशी विचित्र आहे.



नागा स्वत:ला स्वतंत्र राष्ट्र समजतात. १९९३ साल हे राष्ट्रसंघाने 'मूळनिवासी लोकांचे आंतरराष्ट्रीय वर्ष' (इंटरनॅशनल इअर ऑफ द इंडिजिनस पीपल्स्) म्हणून घोषित केले होते तेव्हा 'मानवी हक्कांसाठी नागांची चळवळ' या संस्थेने राष्ट्रसंघाकडे जे निवेदन पाठविले त्यात, नागालँडवर भारताने आक्रमण करून कब्जा केला, अशी तक्रार केली आहे. १४ ऑगस्ट १९४७ लाच नागांनी आपले स्वातंत्र्य घोषित केले होते, असे सांगून ते निवेदन पुढे म्हणते की, भारत व ब्रह्मदेश यांनी जबरदस्तीने नागालँडमध्ये प्रवेश केला. तेव्हापासूर आमचा त्यांच्याशी संघर्ष सुरू आहे. कसलाही विचार न करता आमच्या देशाचे विभाजन करण्यात आले आहे. बाहेरच्या लोकांना नागालँडमध्ये घुसवून नागांना अल्पसंख्य करण्यात आले आहे. आम्ही मंगोलाईड वंशाच्या तिबेटो-बर्मन या उपगटाचे लोक आहोत. सुमारे ४७००० चौरस कि. मी. आमची भूमी आहे. उत्तरेला चीन, पूर्वेला ब्रह्मदेश आणि पश्चिम व दक्षिण दिशांना भारत आहे. आमच्या परंपरा वेगळ्या आहेत. चालीरीती वेगळ्या आहेत. आमचे वेगळे राष्ट्र आहे. ते भारताच्या कब्ज्यात असल्यामुळे आमच्या मानवी हक्कांचे हनन झाले आहे. आम्हाला राष्ट्र म्हणून राष्ट्रसंघाने मान्यता द्यावी.'' हे सारे नागा ख्रिस्ती बनलेले आहेत, हे लक्षात घेतले की त्यांच्या फुटीरतेचे नवल वाटण्याचे कारण नाही.

कानपूरच्या आयआयटीतील एरोस्पेस इंजिनीअरिंग या विषयाचे विभागप्रमुख डॉ. कुणाल घोष यांचा, 'मेनस्ट्रीम' या डाव्या विचारसरणीच्या नियतकालिकाच्या २९ एप्रिलच्या अंकात 'ख्रिश्चॅनिटी इन द थर्ड मिलेनियम' या शीर्षकाचा एक माहितीप्रद लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यात, आशिया खंडात ख्रिस्ती लोकांच्या फुटीर कारवायांची भरपूर माहिती आहे. ख्रिस्ती लोकांनी, जनमतसंग्रहाच्या द्वारे पूर्व तिमोरला इंडोनेशियापासून अलग केले आहे. आता मलाकू बेट हडपण्यासाठी ख्रिस्ती लोकांनी मुसलमानांच्या विरुद्ध दंगे सुरू केले आहेत. याचा विरोध म्हणून जकार्तालाा मुसलमानांनी जिहादची डरकाळी फोडली आहे. ५ डिसेंबर १९९९ ला इंडोनेशियातील हरीयनजया या शहरात एका ख्रिस्ती धर्मोपदेशकाने इंडोनेशियापासून आपले स्वातंत्र्य जाहीर करण्यासाठी, आपला स्वतंत्र ध्वज फडकविला! हरीयनजया हे ख्रिस्तीबहुल शहर आहे. डॉ. कुणाल यांचे भाकीत आहे की, इंडोनेशिया युगोस्लाव्हियाच्या वाटेने जाणार आहे.

**गुप्त ख्रिस्ती एजेंडा**

ईशान्य भारतातील फुटीर आंदोलकांचीही मीमांसा डॉ. घोष यांनी याच लेखात केली आहे. त्यांचे प्रतिपादन असे आहे की, वरवर जनजातीय अस्मितेचा हा आविष्कार आहे, असे भासविले जात असले, तरी आत गुप्त असा ख्रिस्ती एजेंडा आहे. हा एजेंडा घेऊन बॅप्टिस्ट चर्च या भागात सक्रिय आहे. त्रिपुरात तर या चर्चने हैदोसच मांडला आहे. त्रिपुराला भारतापासून वेगळे करण्यासाठी 'नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा' एन. एल. एफ. टी. ही बेकायदा संघटना सशस्त्र बंडाळी करत आहे. या एनएलएफटीच्या थॉमस नावाच्या एका मेजरने एक परिपत्रक काढून, त्रिपुराच्या लोकांना हिंदू देवतांची पूजा न करण्याची आज्ञा केली आहे. या परिपत्रकाच्या प्रती झाडाझाडावर खिळ्यांनी ठोकलेल्या आहेत, तसेच गावोगावी व्यापक प्रमाणात त्या वाटल्या गेल्या आहेत. त्रिपुरात, गेली ५० वर्षे धर्मांतराचा सपाटा सुरू असतानाही, अजून तेथे हिंदूंची पर्याप्त संख्या आहे. त्यांना त्रिपुरातून घालविण्यासाठी बॅप्टिस्ट चर्चने एनएलएफटीच्या माध्यमातून धमक्यांचे सत्र सुरू केले आहे. रा. स्व. संघाच्या चार कार्यकर्त्यांचे जे अपहरण गेल्या वर्षी करण्यात आले, ते बॅप्टिस्ट चर्चच्या प्रभावाखाली असणाऱ्या या एनएलएफटीनेच केले आहे. येशू ख्रिस्ताच्या शांतिधर्माचे हे पाईक बंदुका घेऊन आतंक माजवीत आहेत. बंदुकीच्या धाकाखाली राजधर चौधरी पारा आणि नंदराम रियांग पारा या दोन गावांतील लोकांना ख्रिस्ती बनविण्यात आले आहे. १४ नोव्हेंबर १९९९ ची ही घटना, कलकत्याहून प्रकाशित होणाऱ्या स्टॅट्समनने प्रसिद्ध केली आहे.

मिझोरम हे ख्रिस्तीबहुल राज्य आहे. तेथे सुमारे ५ टक्के रियांग जनजातीचे बौद्ध आहेत. त्यांना मिझोराममधून हाकलून लावण्याची मोहीम चालू आहे. अनेक रियांग बौद्धांनी निर्वासित बनल्यामुळे, त्रिपुरात आश्रय घेतला आहे. उरलेले काम, मिझोरामच्या निवडणूक आयुक्ताने पूर्ण केले. त्याने हजारो रियांग लोकांची नावेच मतदार यादीतून काढून टाकली.

मिझो लोक बॅप्टिस्ट चर्चवाले आहेत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मेघालयातही, फुटीर चळवळ आकार घेत आहे, असे डॉ. घोष यांनी म्हटले असून, त्या चळवळीमागे बॅप्टिस्ट चर्चचाच हात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे.

**उत्तर बंगालचे भयानक भवितव्य**


परंतु एका नव्या भयानक संभाव्यतेकडे प्रो. घोष यांनी जे लक्ष वेधले ते फार महत्त्वाचे आहे. दार्जिलिंग, जलपैगुडी आणि कुचबिहार या, बंगाल प्रांताच्या उत्तरेकडील तीन जिल्ह्यांमध्ये गुप्तपणे फुटीर कारवाया चालू आहेत. या तीन जिल्ह्यांचे मिळून 'कामतापुरी' या नावाचे स्वतंत्र राज्य निर्माण व्हावे, अशी मागणी पुढे आली आहे. या जिल्ह्यांमध्ये, चहाच्या मळ्यात काम करणाऱ्या उरांव, मुंडा आणि संथाळ या जनजातींच्या लोकांची बरीच मोठी संख्या आहे. यातील अर्धे लोक ख्रिस्ती झाले आहेत. त्यांनी आता स्वत:ला 'कामतापुरी' म्हणणे सुरू केले असून, त्यांचीच वेगळ्या राज्याची मागणी आहे. बंगालीच्याच एका बोलभाषेचा ते उपयोग करीत असतात. पण अलीकडे आपली भाषा वेगळी असल्याचे ते सांगू लागले आहेत. येथे 'कोच' या नावाची मूळची जनजाती आहे. ती हिंदू आहे आणि या जातीचा वेगळ्या राज्याला विरोध आहे. या भागात, जनजातींव्यतिक्त अन्य लोकांचीही संख्या बरीच आहे. त्यात बंगाली (हिंदू आणि मुसलमान) आहेत, तसेच नेपाळी हिंदूही आहेत. यांचाही वेगळ्या राज्याला विरोध आहे. पण म्हणून चर्च स्वस्थ बसले असे नाही. १९९९ च्या लोकसभेच्या निवडणुकीवर 'कामतापुरी स्टुडंट्स युनियनने' बहिष्कार घातला होता. सीपीआय (एमएल) च्या एका गटाने याला पाठिंबा दिला होता. सीपीआय (एमएल) ला उत्तर बंगालचे स्वायत्त विकास मंडळ हवे आहे. सुभाष घिसिंगच्या गोरखा नॅशनल लिबरेशन फ्रंटचा त्याला पाठिंबा असून, कामतापुरी विद्यार्थ्यांच्या निवडणूक बहिष्काराचे त्यांनी समर्थन केले होते. याबरोबरच, दुर्गापूजोत्सवात दुर्गापूजेचाही त्यांनी विरोध केला होता.

**वेदनादायक कडा**

फुटीर मागण्यांची सुरुवात अशीच होत असते. तीच रीत बॅप्टिस्ट चर्चच्या प्रभावाने, येथील लोकांनी स्वीकारली आहे. घिसिंगच्या पक्षाचे नेते प्रधान यांची मजल, नेपाळी संस्कृतीला मूर्तिपूजा मान्य नाही, असे सांगण्यापर्यंत गेली आहे. बॅटिस्ट चर्चच्या प्रभावाचे हे लक्षण आहे. सिलीगुडी, दार्जिलिंग आणि कॉलिम्पांग यांना जोडणाऱ्या सर्व राजमार्गांवर ख्रिस्ती शाळा आणि चर्चेस यांचे घनदाट जाळे रचले गेले आहे. या मार्गावर गरीब लोकांची वस्ती आहे. रस्त्यावर चहाच्या टपऱ्या उघडून ते आपली उपजीविका करीत असतात. मिशनरी त्यांच्या मुलांना मोफत शिक्षण आणि त्यांना मोफत वैद्यकीय सेवा देतात. या मार्गाने त्यांचे ख्रिस्तीकरण सुरू आहे आणि ख्रिस्तीकरणाबरोबरच फुटीरतेचेही पोषण.

जेथे जेथे हिंदू आहेत, तेथे तेथे देशाशी एकनिष्ठ राहण्याची भावना आहे. पण जेथे जेथे मुस्लिम व ख्रिस्ती प्रभावी झाले आहेत, तेथे तेथे देशापासून अलग होण्यासाठी फुटीरता जन्म घेत आहे. हा देशाच्या अखंडतेला उद्‌भणारा धोका, आमचे तथाकथित सेक्युलर नेते आणि पक्ष ध्यानातच घेत नाहीत, हे आपले केवढे दुर्दैव आहे! हे आंधळेपण स्वीकारलेले लोक हिंदू आहेत, ही या दुर्दैवाची एक अत्यंत वेदनादायक अशी कडा आहे.

**पूर्वप्रकाशित : (दिनांक १८-५-२०००)**
**(लाखे प्रकाशन, नागपूरने प्रकाशित केलेल्या मा. गो. वैद्य यांच्या 'ठेवणीतले संचित' या पुस्तकावरून साभार)**



## शब्दसरिता 79

**आडवी विधाने :–** 1) भारताचे अजातशत्रू, सभ्य, शालीन, सौहार्दशील आणि कवी हृदयाचे एक दिवंगत माजी पंतप्रधान 6) जगातील सर्वात मोठा पक्षी 9) फळातील मगज 10) मिझोरमची राजधानी 11)'आधा है चन्द्रमा रात आधी.....' हे गीत या चित्रपटातील आहे. 13) कागदपत्रांची नकल करणारा 14) हस्त, हात 16) न्यूझीलँडच्या ऑकलंड शहरातील प्रसिद्ध क्रिकेटचे मैदान 18) आणीबाणी नंतर जनता दलात सामील झालेला एक राजकीय पक्ष 19) राजा, नृपती 21) सूर्य 23) इंग्रजी वर्णमालेतील एक आद्याक्षर 25) आयर्लंड देशाची राजधानी 27) सर्रकन झाडावर चढणारा एक छोटा जीव 28) व्यवस्था, तरतूद 29) भारतातील 12 ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले शिवशंकराचे हिमालयस्थित एक अतिप्राचीन तीर्थस्थान 31) प्रजा, नागरिक 32) भारताच्या आघाडीच्या एका विमानसेवेचे नाव 34) बारा राशींपैकी अकरावी रास 35) भारताचे राष्ट्रीय फूल 37) ईराणी नववर्ष ज्याला पारशी नववर्षसुद्धा म्हटले जाते 39) पंजाबातील एक प्रमुख समाज 40) 2016 मध्ये रिलीज झालेला रजनीकांत, राधिका आपटेचा तमिळ भाषेतील एक सुपरहिट चित्रपट 41) दक्षिण आशियाच्या अरबी समुद्रातील एक द्वीप समूह प्रजासत्ताक देश 43) मजबूत, कणखर 44) बारीक झणझण 46) आपल्या सैन्याचा एक विभाग 47) पाणी, जल 48) एक उपदिशा 50) महामार्गावर परिवहन करणाऱ्या चारचाकी वाहनांवर आकारण्यात येणारा सरकारी कर 52) दानशूर, देणारा 54) माजी पंतप्रधान राजीव गांधीजींच्या समाधीस्थळाचे नाव 56) प्रसिद्ध साहित्यिक राम गणेश गडकरी यांच्या 'एकच प्याला' या नाटकातील एक पात्र 57) गुजरात राज्यातील या गांवी प्रख्यात साहित्यिक राम गणेश गडकरी यांचा जन्म झाला. 59) मुघल सम्राट अकबराच्या दरबारी असलेला प्रसिद्ध गायक 61) शिवशाहीतील या किल्ल्याचे पूर्वीचे नाव कोंढाणा होते 62) रशियाच्या राष्ट्राध्यक्षपदी तीनदा निवड झालेले नेते 63) 20 जुलै 1976 साली मंगळ ग्रहावर उतरणारे पहिले अंतरिक्ष यान 64) महाराष्ट्र राज्याचे एक भूतपूर्व मुख्यमंत्री, हे काही काळ लोकसभेचे सभापती सुद्धा होते.

**उभी विधाने :–** 1) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी 1904 मध्ये स्थापन केलेली क्रांतिकारी संघटना 2) चीनची राजधानी 3) डोनाल्ड ......अमेरिकेचे एक भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष 4) महाराष्ट्रातील संतांनी जोपासलेला भक्तिप्रधान धर्म संप्रदाय 5) पारसी समाज जीवनावर आधारीत विजया मेहताद्वारा दिग्दर्शित चित्रपटात नसिरुद्दीन, अनुपम खेर, शबाना आजमी 6) योगासनातील एक आसन 7) दुर्दशा, यातना, दुःख 8) सनी देओल, अमिषा पटेल, अमरिश पुरीचा एक चित्रपट 10) सरकारद्वारा निर्धारीत विशेष आर्थिक क्षेत्र (सेज) चे संक्षिप्त उच्चारण 12) म्यानमारची राजधानी 14) पृथ्वीच्या नकाशावरील एक काल्पनिक रेषा 15) लष्करी दलातील एक हुद्दा 17) पर्ण, विडा, तांबूल 20) जनता दल (युनाइटेड) चे एक दिवंगत माजी पक्षाध्यक्ष 22) संपूर्णपणे भारतीय बनावटीच्या पहिल्या 'परम 8000' (1991), 'परम 10000' (1996) या महासंगणकाचे रचनाकार आणि निर्माते, पद्मश्री व महाराष्ट्र भूषण आदि पुरस्कारांनी सन्मानित झालेले जगविख्यात शास्त्रज्ञ 23) टी. व्ही. वरील एक न्यूज चॅनल 24) सुविख्यात मंगेशकर भगिनींपैकी एक 26) अहमदनगरचे संक्षिप्त उच्चारण 29) कथकली हे या राज्याचे लोकनृत्य आहे. 30) पाटांचे वळवून आणलेले पाणी 32) आडवे संकेत क्र. 10 प्रमाणे 33) मणिपूर राज्याची राजधानी. 34) वेट लिफ्टिंगमध्ये सर्वाधिक पदके जिंकणारी एक भारतीय महिला खेळाडू 36) मुस्लिम विद्यार्थ्यांना इस्लामिक व धार्मिक शिक्षण देणारी शाळा 38) मुस्लीम संत 40) सरकारला देय असलेली रक्कम 41) कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिलेले पहिले संगीत नाटक 42) तारीख 45) जंगलात राहणारे 48) ......... सवा (साडे) तीन, एक मराठी वाक्प्रचार 49) वडिलांचे वडील, महाभारतात भीष्माचे संबोधन 51) रबराचे बनलेले 52) हा रुस्तम–ए–जमां कुस्तीगीर चित्रपट अभिनेता सुद्धा होता. 53) नेताजी सुभाषचंद्र बोस आंतरराष्ट्रीय विमानतळ कोलकाताच्या या क्षेत्रात आहे. 55) जगातील सर्वात गरीब देश 56) पुत्र, मुलगा 58) विक्रीसाठीचा माल साठवून ठेवण्यासाठी बांधलेली जागा, गोदाम 60) चाकरी, शुश्रुषा ●

**मागील शब्दसरिताचे उत्तर**



Uday Munde - Nagpur



# डॉ. हेडगेवार : विराट संघस्वरूपाची प्रेरणा

(पान ५ वरून)

केरळमध्ये मोपला मुसलमानांनी बंड केले. त्यात हजारो हिंदू मारले गेले. मुस्लिम आक्रमकांच्या हल्ल्यांमुळे हिंदूंमध्ये कमालीची असुरक्षिततेची भावना निर्माण झाली. आम्ही संघटित झाल्याशिवाय मुस्लिम आक्रमकांपुढे आपला टिकाव लागणार नाही, असा विचार अनेकांनी मांडला. धर्मांध मुस्लिमांचा प्रतिकार करण्यासाठी हिंदूंचे संघटन उभे राहिले पाहिजे, असे लोकांना अतिशय तीव्रतेने वाटू लागले. त्यावेळचे नेते मुस्लिम समाजाला धर्मांध समजत होते आणि हेच सर्व संघर्षांचे मूळ कारण असल्याने, त्या समाजात शिक्षणाचा प्रसार करणे एक महत्त्वाचा भाग मानत होते. डॉक्टरजींना हे मान्य नव्हते. त्या समाजाची धर्मांधता आणि निरक्षरता त्यांना मान्य होती. पण हे संघर्षाचे मूळ कारण आहे हे त्यांना मान्य नव्हते. यामागचे कारण त्यांना त्यांच्या नेत्यांमध्ये सापडले, ज्यांच्या मनात त्यांचे पूर्वीचे राज्य आणि वैभव परत मिळवण्याची इच्छा ठासून भरलेली होती आणि ज्यांना ब्रिटिशांनी 'ऐतिहासिक अल्पसंख्यक' म्हणून त्यांच्यातील फुटीर वृत्तीला चालना दिली होती. काँग्रेसतर्फे चालविण्यात येत असलेली खिलाफत चळवळ डॉक्टर साहेबांना आवडली नाही. ते त्याला नेहमी 'अखिल आफत' असेच म्हणायचे. तेव्हापासून काँग्रेसने तुष्टीकरणाचे धोरण स्वीकारले आणि जमातवादाने भारताच्या राजकारणात प्रवेश केला, जो डॉक्टरजींना अजिबात पसंत नव्हता. शेवटी त्यावेळच्या बड्या नेत्यांनी मुस्लिम तुष्टीकरणाचे धोरण का स्वीकारले? याचे पहिले आणि मुख्य कारण म्हणजे ब्रिटिश राज्यकर्ते मुस्लिम जमातवादाला 'हिस्टोरिकल मायनॉरिटी' अर्थात ऐतिहासिक अल्पसंख्यक संबोधून प्रोत्साहन देत होते आणि त्यांना राजकीय क्षेत्रात अधिकाधिक सोयीसुविधा देऊन त्यांना सर्वसामान्यांपासून वेगळेही करीत होते. डॉक्टरजींचा हिंदू समाजाच्या वीर वृत्तीवर पूर्ण विश्वास होता. ते हिंदूंना भित्रे मानायला तयार नव्हते. त्यांची प्राचीन परंपरा व जीवनातील ध्येयावर पूर्ण निष्ठा होती. हिंदू समाजाला आपल्या परंपरांचा विसर पडला आहे, हा मुद्दा त्यांना मान्य होता. इंग्रजांनी जातिव्यवस्थेच्या जागी जातिभेद हा शब्द वापरून जाती-जातींमध्ये संघर्ष निर्माण केला. त्यामुळे येथील समाज छोट्या-छोट्या भागात विभागला गेला आणि आपापसात संघर्षही झाला. याच कारणामुळे विशाल समाज स्वत:ला कमकुवत समजू लागला व त्यामुळेच तो इतर समाजांच्या हल्ल्याचा बळी ठरत होता. पण काहींना हे तुष्टीकरण आवडले नाही. म्हणूनच ते हिंदू समाजाला बलशाली करू इच्छित होते. म्हणूनच त्यांनी हिंदू समाजासाठी हिंदू सभेची स्थापना केली. डॉ. हेडगेवार यातही सहभागी होते. पण त्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे असे म्हणता येईल की, या देशात सुरू असलेल्या जवळपास सर्वच आंदोलनांमध्ये त्यांचा केवळ सक्रिय पाठिंबाच होता असे नाही तर ते त्यातही अग्रेसर राहिले.

**संदर्भ : सुनील आंबेकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वर्णिम भारत के दिशा-सूत्र, प्रभात पेपरबैक्स, नई दिल्ली**
**केशव : संघनिर्माता : चंद्रशेखर परमानन्द भिशीकर, सुरुचि प्रकाशन, केशव कुंज, झंडेवाला, नवी दिल्ली**
**रमेश पतंगे : डॉ. हेडगेवारः एक अनोखा नेतृत्व, सुरुचि प्रकाशन, केशव कुंज, झंडेवालान, नयी दिल्ली**
**भूतपूर्व सरकार्यवाह, स्व. प्रभाकर बळवंत दाणी (भैयाजी दाणी), संघ दर्शन, राष्ट्रधर्म पुस्तक प्रकाशन, लखनऊ**
**राकेश सिन्हा, आधुनिक भारत के निर्माताः डॉ. केशव बलिराम हेडगेवार, प्रकाशन विभाग**
**प्र. ग. सहस्त्रबुद्धे, संघमंत्र के उद्गाताः डॉ. हेडगेवार, भारत भारती बाल पुस्तकमाला प्रकाशन, नागपूर**
**(विचार विनिमय न्यास दिल्ली)**

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

दखल

# भोजशाळा सरस्वती मंदिर

लोकेंद्र शर्मा/दुर्गेश कुमार

इतिहासकारांच्या मते, राजा भोजने १०३४ मध्ये धार येथे सरस्वती सदनाच्या रूपात भोजशालारूपी महाविद्यालयाची स्थापना केली होती. नंतर इस्लामी आक्रमकांनी येथे हल्ले केले. १४५६ मध्ये महमूद खिलजीने या ठिकाणी कमाल मौला दर्गा बांधला. एवढेच नव्हे तर भोजशाळा उद्ध्वस्त करून तिच्याच अवशेषांच्या आधारे एक ढांचा उभारण्यात आला. ही ११ व्या शतकात बांधलेली 'कमाल मौला मशीद' आहे असे मुसलमानांचे म्हणणे आहे. तर या तथाकथित मशिदीत वापरण्यात आलेले कोरीव खांब हे भोजशाळेत वापरण्यात आलेल्या खांबांसारखेच असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. कथित मशिदीच्या भिंतींना चिकटलेल्या दगडांवर प्राकृत भाषेत भगवान विष्णूच्या कूर्मावताराबद्दल दोन श्लोक लिहिले आहेत. आणखी एका शिलालेखात संस्कृत व्याकरणासंदर्भात माहिती देण्यात आली आहे. याशिवाय आणखी काही शिलालेखांमध्ये राजा भोजचे उत्तराधिकारी उदयादित्य आणि नरवर्मन यांची स्तुती करण्यात आली आहे.

**इस्लामी आक्रमण**

इसवीसन १३०५, १४०१ आणि १५१४ मध्ये मुसलमान आक्रमकांनी भोजशाळेचे सरस्वती मंदिर आणि शिक्षण केंद्र वारंवार उद्ध्वस्त केले. १३०५ मध्ये क्रूर आणि रानटी मुस्लिम अत्याचारी अलाउद्दीन खिलजीने प्रथमच भोजशाळेचा विध्वंस केला. तथापि, ३६ वर्षे आधीच म्हणजे १२६९ मध्ये जेव्हा कमाल मौला नामक फकीर माळव्यात दाखल झाला तेव्हाच इस्लामी आक्रमणाची प्रक्रिया सुरू झाली होती. हिंदूंचे इस्लाममध्ये धर्मांतर करण्यासाठी कमाल मौलाने कपट-कारस्थानाचा अवलंब केला. त्याने सुमारे ३६ वर्षे माळवा प्रदेशाची तपशीलवार, विस्तृत माहिती गोळा करून ती अलाउद्दीन खिलजीला दिली. युद्धात माळव्याचा राजा महाकाल देव याला युद्धात हौतात्म्य आल्यानंतर खिलजीने अक्षरशः कहर सुरू केला.

**कथित कमाल मौला दर्गा**

अलाउद्दीन खिलजीनंतर आणखी एक मुस्लिम आक्रमक दिलावर खान याने इसवीसन १४०१ मध्ये येथील विजय मंदिर (सूर्य मार्तंड मंदिर) उद्ध्वस्त केले आणि सरस्वती मंदिर भोजशाळेचा एक भाग दर्ग्यात रूपांतरित करण्याचा प्रयत्न केला. त्याच विजय मंदिरात आज मुसलमान नमाज पढतात.

इसवीसन १५१४ मध्ये महमूद शाहने भोजशाळेला वेढा घातला आणि तिचे दर्ग्यात परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्याने सरस्वती मंदिराच्या बाहेरचा परिसरावर ताबा मिळवून 'कमाल मौला दर्गा' स्थापन केला. याच आधारे भोजशाळा ही दर्गा असल्याचा दावा केला जात आहे.

इसवीसन १५५२ मध्ये, मेदनी राय नामक एका क्षत्रिय राजाने हिंदू सैनिकांना एकत्र करून महमूद खिलजीचा सणसणीत पराभव केला. या युद्धात मेदनी रायने हजारो मुस्लिम सैनिकांना ठार केले आणि ९०० सैनिकांना अटक करून त्यांना धारच्या किल्ल्यात कैद केले.

२५ मार्च १५५२ रोजी धार किल्ल्यावर काम करणाऱ्या सय्यद मसूद अब्दाल समरकंदीने विश्वासघात करून त्या मुस्लिम सैनिकांना मुक्त केले. नंतर राजा मेदनी रायने या विश्वासघाताबद्दल समरकंदीला फाशीची शिक्षा सुनावली. याच सय्यद मसूद अब्दाल समरकंदीला धार किल्ल्यातील 'बंदीछोड दाता' म्हणतात.

**ब्रिटिशांचा हस्तक्षेप**

१७०३ मध्ये मराठ्यांनी माळव्यावर ताबा मिळवला आणि मुस्लिम राजवट संपुष्टात आणली. ईस्ट इंडिया कंपनीने १८२६ मध्ये माळव्याचा ताबा घेतला. त्यांनीही भोजशाळेवर हल्ले केले. अनेक स्मारके आणि मंदिरे नष्ट केली. लॉर्ड कर्झनने १९०२ मध्ये भोजशाळेतील सरस्वती देवीची मूर्ती घेऊन ती इंग्लंडला पाठवली. ही मूर्ती आजही लंडनमधील संग्रहालयात आहे. मुस्लिम राजवटीनंतर प्रथमच मुसलमानांनी १९३० मध्ये भोजशाळेत प्रवेश करून नमाज पढण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, जागरूक हिंदूंनी त्यांचा हा प्रयत्न उधळून लावला.

१९५२ मध्ये, केंद्र सरकारने भोजशाळेची वास्तू भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (एएसआय) च्या सुपूर्द केली. त्याच वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदू महासभेने हिंदूंना भोजशाळेविषयी माहिती देण्यास सुरुवात केली. याच सुमारास हिंदूंनी 'श्री महाराजा भोज स्मृती वसंतोत्सव समिती' ची स्थापना केली.

**१९०२ चा अहवाल**

उच्च न्यायालयाने आपल्या आदेशात एएसआयच्या एका अहवालाचा हवाला दिला आहे. १९०२ मध्ये तत्कालीन व्हॉईसरॉय लॉर्ड कर्झनने धार, मांडूचा दौरा केला होता. त्याने भोजशाळेच्या देखभालीसाठी ५०,००० रुपये खर्च करण्यास मंजुरी दिली होती. त्यानंतर भोजशाळा परिसराचे सर्वेक्षणही झाले. १९०२ मध्ये केलेल्या या सर्वेक्षणात भोजशाळेत हिंदू प्रतीक चिन्हे, त्यावरील संस्कृत शब्द इत्यादी आढळून आले. १९५१ मध्ये भोजशाळेला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्यात आले. त्यावेळी जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेत भोजशाळा आणि कमाल मौलाच्या दर्ग्याचा उल्लेख आहे.

**भोजशाळा : पुरावेच पुरावे**

भारताच्या इतिहासात परमारवंशीय राजा भोजदेव (संक्षिप्त नाव राजा भोज) यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. राजा भोज याची राजवट इसवी सन १००० ते १०५५ पर्यंत चालली. माळव्यातील उज्जयिनी (आताचे उज्जैन) येथील महान राजा विक्रमादित्याच्या वंशपरंपरेतील तो ११वा राजा होता. राजा भोजच्या कारकिर्दीपूर्वी येथील राजधानी उज्जयिनी होती, जी त्याच्या कारकिर्दीत धार येथे स्थानांतरित करण्यात आली.



राजा भोज हा कला आणि शिक्षणाचा भोक्ता असल्याने त्याने आपल्या कारकिर्दीत अनेक ठिकाणी 'भोजशाळां'ची स्थापना केली. त्यापैकी धार येथे असलेली भोजशाळा जगप्रसिद्ध आहे. नावावरूनच स्पष्ट होते की, भोजशाळा ही दोन शब्दांपासून बनलेली आहे - भोज आणि शाळा. म्हणजे राजा भोजने स्थापन केलेली शाळा. पण ती केवळ मुलांची शाळा नव्हती, तर एक उत्तम दर्जाचे विद्यापीठ होते, जिथे देश-विदेशातील विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत.

एएसआयच्या भोपाळ परिक्षेत्राच्या सर्वेक्षणानुसार, सध्या भोजशाळेत जी तथाकथित मशीद आहे त्यात सरस्वती मंदिराचे पुरावे सापडतात. ब्रिटिश लेखक कर्नल जॉन माल्कम आपल्या 'हिस्ट्री ऑफ मालवा' या पुस्तकाच्या पान क्रमांक २७ वर लिहितात, 'मोगलांची वारंवार होणारी आक्रमणे ही समस्यांची एक प्रदीर्घ मालिकाच होती. मोगलांनी वारंवार भूभाग बळकावल्यामुळे या प्रांताच्या (माळवा) सीमा बदलत राहिल्या. तथापि, ही वस्तुस्थिती देखील अगदी स्पष्ट आहे की भारत केवळ अंशत:च अधीन (परतंत्र) राहिला आहे. कारण आपल्याला भारतातील जवळजवळ प्रत्येक जिल्ह्यात किंवा प्रांतात हिंदू राजे आढळतात, ज्यांनी आक्रमणकर्त्यांचा सर्व प्रकारे भरपूर प्रतिकार केला.'' याशिवाय विविध ब्रिटिश विद्वानांनी व संशोधकांनी आपल्या संशोधनात भोजशाळेच्या स्थानी असलेल्या शिलालेखांवर संस्कृत आणि प्राकृत भाषेत वाग्देवी, व्याकरणाचे नियम इत्यादींवर लिखित माहिती असल्याचे वर्णन केले आहे.

**हिंदूंना मिळाला पूजा करण्याचा अधिकार**

तक्षशिला आणि नालंदा विद्यापीठानंतर धारानगरी किंवा भोजशाळेचा गौरवाने उल्लेख करण्यात येतो. वसंत पंचमीच्या दिवशी देवी सरस्वती येथे प्रकट झाली होती, असे भोजशाळेबाबत अनेक विद्वानांचे म्हणणे आहे. माता सरस्वतीच्या विशेष कृपेने राजा भोज चौसष्ट कलांमध्ये पारंगत होता. त्याने ८४ ग्रंथ रचले. राजा भोजच्या साधनेने, भक्तीने प्रसन्न होऊन देवी सरस्वतीने साक्षात प्रकट होऊन राजाला दर्शन दिले. देवी सरस्वती जेथे प्रकट झाली त्या स्थानी राजा भोज याने देवीची तशीच मूर्ती स्थापित केली, ज्या रूपात तिने दर्शन दिले होते. राजा भोजने आपला कार्यकाळ इसवीसन १०१०-१०५५ च्या दरम्यान हे मंदिर बांधले. १४६४ मध्ये मोहम्मद खिलजीने धारनगरीवर आक्रमण करून भोजशाळा उद्ध्वस्त करून टाकली व माता वाग्देवीची मूर्ती खंडित करून ती परिसरातून काढून टाकली. १८७५ मध्ये उत्खननादरम्यान माता वाग्देवीची मूर्ती सापडली, जी सध्या लंडनमध्ये आहे. याची पुष्टी ख्यातनाम इतिहासकार आणि संशोधक डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर यांनी १९६१ मध्ये आपल्या लंडन भेटीदरम्यान केली होती. १८-१९ फेब्रुवारी २००३ मध्ये भोजशाळा आंदोलनात तीन कार्यकर्त्यांचे बलिदान झाले. परिणामी, ८ एप्रिल २००३ रोजी हिंदूंना पूजा-दर्शनाचा करण्याचा अधिकार मिळाला.

**(पांचजन्यवरून साभार)**

संस्कृती

# इंडोनेशियातील मुस्लिमांना हिंदू संस्कृतीचे आकर्षण

इंडोनेशियाचे संस्थापक आणि प्रथम राष्ट्रपती सुकार्णो यांची कन्या सुकमावती यांनी २६ ऑक्टोबर २०२१ रोजी इस्लाम धर्माचा त्याग करून सनातन हिंदू धर्म स्वीकारला. इंडोनेशियात हिंदूंची लोकसंख्या दोन टक्क्यांहून देखील कमी आहे. येथील १७ हजारांहून अधिक बेटांपैकी केवळ बाली या बेटावर हिंदू बहुसंख्यक आहेत. मात्र, असे असतानाही ज्या प्रकारे लोक हिंदू धर्मात परत येत आहेत, ते अभूतपूर्व व आश्चर्यचकित करणारे आहे. इंडोनेशियाच्या हिंदूंकडे एखादी मोठी सामाजिक संघटना नाही किंवा राजकीय संघटन देखील नाही. त्यांच्याकडे कोणताही मठ, आश्रम नाही किंवा प्रसिद्ध व श्रीमंत उद्योगपती देखील नाही. तरीही त्या देशातील लोकांमध्ये आपल्या पूर्वजांविषयीचा गौरव नव्याने जागृत झाला असून जगातील सर्वाधिक मुसलमान लोकसंख्या असलेल्या देशातील लोक आता हिंदू धर्म स्वीकारण्यास आतूर झाले आहेत, असे स्पष्टपणे दिसून येते.

७० च्या दशकामध्ये सर्वप्रथम सुलावेसी बेटावरील तोराजा लोकांनी हिंदू धर्मात परत येण्याची संधी प्राप्त झाली होती. वर्ष १९७७ मध्ये सुमात्राच्या कारो आणि बाटाक, तसेच वर्ष १९८० मध्ये कालीमंतनचे गाजू आणि दायक देखील हिंदूंच्या छत्रछायेत स्वधर्मात परत आले. त्यानंतर अनेक जमातींनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी, तसेच इस्लाम अन् ख्रिस्ती यांच्या दबावापासून वाचण्यासाठी स्वत:ला हिंदू घोषित केले. याशिवाय वर्ष १९६५ मधील उलथापालथीच्या वेळी स्वत:ला मुसलमान घोषित करणाऱ्या जमातीचे लक्षावधी लोक आता हिंदू धर्मात परत येत आहेत.



जावामध्ये शिक्षण झालेल्या सुदेवी १९९० साली न्यायाधीश बनल्या होत्या. त्यांचे बालपण मुस्लिम कुटुंबात गेले. पण, तरीही नंतर त्यांनी हिंदू धर्म स्वीकारला. रविकुमार यांनी 'इंडोनेशियातील हिंदूंचे पुनरुत्थान' या आपल्या पुस्तकात इंडोनेशियातील १० लाखांहून अधिक मुसलमानांनी हिंदू धर्मात प्रवेश केल्याचा उल्लेख केला आहे. या पुस्तकात त्यांनी नमूद केले की, 'वर्ष १९९९ च्या एका अहवालामध्ये 'नॅशनल इंडोनेशियन ब्युरो ऑफ स्टॅटिस्टिक' ने मान्य केले होते की, गेल्या दोन दशकांमध्ये जावा येथे रहाणारे अंदाजे एक लाख लोक इस्लामचा त्याग करून अधिकृतपणे हिंदू धर्मात परत आले आहेत. वर्ष २०१७ मध्ये जावाची राजकुमारी कांजेंग महेंद्राणी हिनेही हिंदू धर्म स्वीकारला होता. अलिकडच्या वर्षांमध्ये सुकर्णोच्या कुटुंबीयांशी संबंधित अनेक लोकांनी हिंदू धर्म स्वीकारला आहे. ज्यात सर्वांत ताजे नाव 'सुकमावती' यांचे आहे. इंडोनेशियामध्ये 'सुकमावती'चा प्रभाव बघता त्यांचे अनुयायीही त्यांच्या मागे हिंदू धर्मात परत येतील, असा अंदाज आहे.

सुकमावतीने हिंदू धर्म स्वीकारल्यानंतर भारतीय माध्यमांनी प्रामुख्याने सबदापालन यांच्या भविष्यवाणीची आठवण करून दिली. वर्ष १४७८ मध्ये महापहित साम्राज्याचा शेवटचा शासक ब्रविजय पंचम याने इस्लाम स्वीकारल्याने सबदापालन यांनी त्याला शाप दिला होता की, ५०० वर्षांनी नैसर्गिक आपत्तीच्या काळात मुसलमान झालेले सर्व जण आपल्या हिंदू धर्मात परत येतील आणि सनातन धर्माची पुनर्स्थापना करतील. हे खरे आहे की, वर्ष २००४ मध्ये हिंदी महासागरामध्ये आलेल्या त्सुनामीमध्ये इंडोनेशियातील दोन लाखांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर २००६ साली आलेल्या भूकंपामुळे ५ हजारांहून अधिक लोकांनी जीव गमावला होता. त्यानंतर जावामध्ये भूकंप आला होता. या घटनांमुळे तेथील लोक सबदापालन यांच्या भविष्यवाणीकडे मोठ्या गांभीर्याने पाहात आहेत. तसेच अशा आपत्तींपासून रक्षण करण्यासाठी पूर्वजांच्या हिंदू धर्मामध्ये परत येत आहेत. पण असे असले, तरी हिंदू धर्म स्वीकारण्यामागे सबदापालनचा शाप आणि भविष्यवाणी एवढेच एक कारण नाही. काही अन्य कारणेही आहेत. सर्वांत पहिले कारण म्हणजे इंडोनेशियातील लोकांना आपला खरा इतिहास समजला आहे, त्यांनी तो जाणून घेतला आहे. त्यामुळे आपल्या पूर्वजांविषयी त्यांच्या मनात गौरव व सन्मानाची भावना आहे. भारतीय मुसलमानांसमोर जर त्यांचा खरा इतिहास ठेवला, तर ते देखील आपल्या मूळ धर्मात परत येण्याविषयी निश्चितच विचार करतील, असे प्रसिद्ध प्राध्यापक शंकर शरण यांनी नमूद केले होते.

स्वातंत्र्य मिळून ७७ वर्षे झाल्यानंतरही हिंदूबहुल देशात अद्याप मोठ्या संख्येने मुस्लिमांनी घरवापसी केलेली नाही. परंतु, परंतु मुसलमानबहुल इंडोनेशियाने हे करून दाखवले आहे. येथे मजपहित साम्राज्य आणि अन्य हिंदू साम्राज्य यांच्या यशाला अतिशय महत्त्व दिले जाते. 'गजह मद' यांच्यासारखे हिंदू सेनापती येथील राष्ट्रीय नायक आहेत. येथील मुसलमानांना माहीत आहे की, त्यांचे पूर्वज तुर्क किंवा अफगाणिस्तान येथून आलेले आक्रमक, लुटारू नव्हते, तर सर्वधर्मसमन्वयाची भावना असलेले, उच्च नैतिक व आध्यात्मिक मूल्ये जपणारे हिंदूच होते. त्यामुळे आपल्या भूतकाळातील मूळ हिंदू धर्मात प्रवेश करणे आणि पूर्वजांच्या धर्माचा स्वीकार करणे, हा येथे अभिमानाचा विषय बनला आहे.

येथील संस्कृतीवर रामायण आणि महाभारत या ग्रंथांचा मोठा प्रभाव आहे. इंडोनेशियाची रामलीला जगभरात प्रसिद्ध आहे. सुकार्णोच्या काळात एकदा पाकिस्तानच्या एका प्रतिनिधी मंडळाला इंडोनेशियामध्ये रामलीला पहाण्याची संधी मिळाली. तेव्हा एका इस्लामी राष्ट्रामध्ये रामलीला सादर होत असल्याविषयी या प्रतिनिधी मंडळातील लोकांना अतिशय आश्चर्य वाटले होते. हा प्रश्न त्यांनी सुकार्णो यांनाही विचारला. तेव्हा सुकार्णो यांनी त्वरित उत्तर दिले की, 'इस्लाम आमचा धर्म आहे, तर रामायण आमची संस्कृती आहे !' इंडोनेशियाच्या मुसलमानांना रामायण आणि महाभारत या ग्रंथांविषयी उत्तम माहिती आहे. येथील लोकांच्या नसानसात या दोन महान ग्रंथांतील चरित्रे वास करतात. येथे घरोघरी रामायण आणि महाभारताचे वाचन, मनन, चिंतन केले जाते. इंडोनेशियात रामायण आणि महाभारत यांच्यातील चरित्रांच्या आधारावर मुला-मुलींचे नाव ठेवणे ही सर्वसामान्य गोष्ट आहे. येथे या चरित्रांचा उपयोग शालेय शिक्षणासाठीही होत असतो. शिवाय येथे वर्षभर रामायण आणि महाभारत यांच्यावर आधारित कार्यक्रम होत असतात. रामायण आणि महाभारत यांच्या जबरदस्त प्रभावामुळे इंडोनेशियातील मुसलमान हिंदू धर्माकडे आकर्षित होत आहेत. आज इंडोनेशियाचे मुसलमान कुराणही वाचतात आणि रामायण-महाभारतही वाचतात. हिंदीचे प्रसिद्ध विद्वान फादर कामिल बुल्के यांनी १९८२ मध्ये आपल्या एका लेखामध्ये लिहिले होते, '३५ वर्षांपूर्वी माझ्या एका मित्राने जावामधील गावामध्ये एका मुसलमान शिक्षकाला रामायण वाचताना पाहिले. तेव्हा त्याने शिक्षकाला विचारले की, तुम्ही रामायण का वाचत आहात ? तेव्हा ते म्हणाले, ''मी अधिक चांगला मनुष्य बनण्यासाठी रामायण वाचत आहे.''

**(संकलित)**

जीवनशैली

# नाचणीची भाकरी : ६ गंभीर आजारांवर रामबाण उपाय

रोग्याचा विषय निघाला आणि त्यात नैसर्गिक आहाराचा उल्लेख झाला नाही असे कसे होईल? भारतात शतकानुशतके पोषक तत्त्वांनी युक्त विविध धान्यांचा दैनंदिन आहारात समावेश राहिला आहे. असेच एक आश्चर्यकारक आणि अद्भुत धान्य म्हणजे नाचणी, ज्याला 'रागी' असेही म्हणतात. नाचणीपासून बनवलेली भाकरी ही स्वादिष्ट तर असतेच शिवाय आरोग्यासाठी प्रचंड गुणकारी असते. त्यामुळे आपल्या जेवणात 'सुपरफूड' म्हणून नाचणीच्या भाकरीचा आवर्जून समावेश केला पाहिजे. नाचणीची भाकरी खाल्ल्याने अनेक आजार टाळता येतात. त्यामुळे आपल्या आहारात नाचणीच्या भाकरीचा समावेश करून कोणते ६ आजार टाळता येतात ते जाणून घेऊया-

**मधुमेह**

मधुमेह ही आजकाल एक सर्वसामान्य समस्या बनली आहे. खाण्यापिण्याच्या अनियमित सवयी, आधुनिक जीवनशैली, मानसिक ताणतणाव आणि शारीरिक हालचालींचा अर्थात व्यायामाचा अभाव यामुळे त्याचा प्रसार झपाट्याने झाला आहे.

मात्र, नाचणीच्या भाकरीचे सेवन मधुमेहाच्या रुग्णांसाठी वरदान ठरते आहे. यामध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असते, ज्यामुळे शरीरातील साखरेची पातळी नियंत्रित राहते. नाचणी हळू-हळू पचते व यामुळे इन्सुलिनची पातळी स्थिर राहते.

**हृदयरोग**

हृदयविकाराचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील वाढते कोलेस्ट्रॉल. नाचणीत जास्त प्रमाणात फायबर असते, जे खराब कोलेस्ट्रॉल (एलडीएल) कमी करते आणि हृदय निरोगी ठेवते.

याच्या नियमित सेवनाने हृदयाशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो. नाचणीच्या भाकरीत मॅग्नेशियम देखील मुबलक प्रमाणात आढळते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास उपयुक्त ठरते.

**लठ्ठपणा**

लठ्ठपणा ही एक गंभीर समस्या आहे, ज्यामुळे संपूर्ण जगातील लोक त्रस्त आहेत. मात्र, नाचणीची भाकरी वजन कमी करण्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकते. त्यामध्ये असलेल्या फायबरमुळे ती खाल्ल्यानंतर बराच वेळ पोट भरल्यासारखे वाटते.

**बद्धकोष्ठता**

जर तुम्हाला बद्धकाष्ठतेची समस्या असेल तर नाचणीची भाकरी तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. नाचणीत आढळणारे फायबर पचनक्रिया सुधारते आणि बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांपासून सुटका करते. हे आतडे स्वच्छ करण्यास मदत करते आणि पचन नियमित करते. त्यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास असलेल्यांनी आपल्या आहारात नाचणीच्या भाकरीचा आवर्जून समावेश करावा.

## आहारात आवर्जून करा समावेश



**नाचणीमध्ये (रागी) भरपूर पौष्टिक घटक असतात. आपल्या आरोग्यासाठी नाचणी धान्य फायदेशीर असून ते ग्लूटेन फ्री असते. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात नाचणीच्या भाकरीचा आहारात समावेश असतो. मात्र, महानगरात किंवा लहानमोठ्या शहरात राहणाऱ्या लोकांनीही आता तिला आपल्या भोजनात स्थान दिले पाहिजे. नाचणीची भाकरी थोडीशी काळपट दिसते. त्यामुळे बरेचजण ती खाणे टाळतात. मात्र नाचणीची भाकरी ही स्वादिष्ट तर असतेच शिवाय आरोग्यासाठी प्रचंड गुणकारी असते. त्यामुळे आपल्या जेवणात 'सुपरफूड' म्हणून नाचणीच्या भाकरीचा आवर्जून समावेश केला पाहिजे.**

**हाडे मजबूत होण्यास मदत**

नाचणी अर्थात रागीची भाकरी हाडांसाठी वरदान ठरते. यामध्ये कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी मुबलक प्रमाणात असते, ज्यामुळे हाडे मजबूत होण्यास मदत होते. विशेषत: स्त्रिया आणि वृद्ध लोकांनी नाचणीच्या भाकरीचे अवश्य सेवन केले पाहिजे. यामुळे हाडांचा ठिसुळपणा आणि ऑस्टियोपोरोसिस सारख्या आजारांचा धोका कमी होतो.

**अशक्तपणा दूर होतो**

नाचणीची भाकरी हा लोहाचा चांगला स्रोत आहे. याच्या नियमित सेवनाने ॲनिमियाची समस्या टाळता येते. लोहाच्या कमतरतेमुळे शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी घसरते, ज्यामुळे ॲनिमियासारख्या समस्या उद्भवतात. नाचणीची भाकरी रक्तातील लोहाची कमतरता दूर करून शरीरातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवण्यास मदत करते.

स्तनपान करणाऱ्या मातांसाठी उपयुक्त

जर तुम्ही स्तनपान करणाऱ्या माता असाल तर, तुम्ही तुमच्या आहारात नाचणीच्या भाकरीचा आजर्वून समावेश केला पाहिजे. यामुळे मातेचे दूध वाढण्यास मदत होते. तसेच यात आई आणि बाळाच्या आरोग्यासाठी उपयुक्त असणारे अमिनो ॲसिड, लोह आणि कॅल्शियम यासारखे पोषक घटकसुध्दा भरपूर प्रमाणात असतात.

**कोणी खाऊ नये?**

नाचणीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण जास्त असल्यामुळे मूतखडा असणाऱ्या रुग्णांनी नाचणीची भाकरी खाणे टाळावे. तसेच नाचणीची ॲलर्जी असल्यास त्यामुळे त्रास होऊ शकतो. त्यामुळे नाचणीची ॲलर्जी असणाऱ्यांनी याचे सेवन टाळावे.

**(पांचजन्यवरून साभार)**

आरोग्य

# 'या' पाच बिया भिजवून खा, आरोग्याला अमाप फायदेशीर

आपली जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. अशा परिस्थितीत, आपण आपल्या आहारात अशा सुपरफूड्सचा समावेश करणे आवश्यक आहे, ज्यामुळे पोषणाबरोबरच विविध आजारांपासून देखील आपले संरक्षण होते. बिया अशा सुपरफूडच्या श्रेणीत येतात. पण तुम्हाला माहीत आहे का की या बिया भिजवून खाल्ल्याने आणखीनच फायदा होतो.

बिया भिजवून खाल्ल्यानंतर आत असलेले पोषक घटक अधिक सक्रिय होतात. ते पचनक्रिया सुधारतात आणि शरीरात त्यांच्याद्वारे प्रदान केलेल्या जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण देखील वाढते. हे जाणून घेऊया.

**चिया बियाणे**

चिया बियांमध्ये फायबर, प्रथिने, ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. त्यांना भिजवून खाल्ल्याने ते पाणी शोषून घेतात, ज्यामुळे पचनक्रिया सुधारते. यातील फायबर वजन कमी करण्यास मदत करते, या बियांमुळे हृदयाचे आरोग्य सुधारते आणि शरीराला ऊर्जा मिळते.

**अंबाडी बिया**

अंबाडीच्या बियांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड, लिग्नॅन्स आणि फायबर भरपूर प्रमाणात असतात. याच्या बिया भिजवून खाल्ल्याने शरीराला त्यांचा अधिक फायदा होतो. अंबाडीच्या बिया खाल्ल्याने हृदयाचे आरोग्य सुधारते आणि वजन कमी करण्यास मदत होते.

**भोपळ्याच्या बिया**

भोपळ्याच्या बियांमध्ये मॅग्नेशियम, जस्त, प्रथिने आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. या भिजवून खाल्ल्याने त्यांच्यातील पोषक तत्त्वांचे अवशोषण सुधारते आणि रोगप्रतिकारक यंत्रणा मजबूत करण्यास या बिया सहायक सिद्ध होतात.

**सूर्यफूल बिया**

सूर्यफुलाच्या बियांमध्ये व्हिटॅमिन ई, मॅग्नेशियम आणि प्रथिने मुबलक प्रमाणात असतात. या बिया भिजवून खाल्ल्याने त्यांच्यातील पोषक तत्त्वांचे अवशोषण वाढते, ज्यामुळे त्वचा आणि केसांचे आरोग्य सुधारते.

**तीळ**

तीळ हे कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम आणि जस्त यांचा चांगला स्रोत आहे. तीळ भिजवून खाल्ल्याने त्यातील पोषकद्रव्ये सहज शोषली जातात आणि त्यामुळे हाडे मजबूत होतात.



**आपली जीवनशैली आणि खाण्याच्या सवयींचा थेट परिणाम आपल्या आरोग्यावर होतो. अशा परिस्थितीत अशा सुपरफूड्सचा समावेश करणे आवश्यक आहे, जे पोषणासोबतच विविध आजारांपासूनही आपले संरक्षण करतात.**

## आ. प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने गंगापूर तालुक्यातील तीर्थस्थळांना 'ब' दर्जा घोषित



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.११ ऑक्टोबर:
पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर ग्रामीण यात्रास्थळ योजने अंतर्गत मतदारसंघातील काही प्रमुख तीर्थक्षेत्रांना 'ब' वर्ग दर्जा घोषित करण्यात आला गंगापूर खुलताबाद मतदार संघाचे आमदार प्रशांत बंब यांच्या प्रयत्नाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीणयात्रास्थळ योजना ब वर्ग अंतर्गत ग्रामीण तीर्थक्षेत्रांस ब वर्ग दर्जा देणेबाबत आमदार प्रशांत बंब यांनी पाठपुरावा केला होता शासन निर्णयानुसार शासनास प्राप्त झालेले प्रस्ताव

राज्य निकष समितीच्या विचारार्थ दि. ०६ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आले होते, सदर बैठकीमध्ये समितीने निकषाप्रमाणे प्रस्तावातील कागदपत्रांची तपासणी करून सदरतीर्थस्थळांस ब वर्ग दजा देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानूसार, खालील तीर्थक्षेत्रांना ब वर्ग दर्जा प्रदान करण्यात आला आहे. श्री क्षेत्र रामेश्वर मंदिर कायगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर,श्री क्षेत्र विट्ठल रुख्मिणी मंदीर, पंढरपूर, ता.,जि. छत्रपती संभाजीनगर,श्री क्षेत्र चक्रधर स्वामी मंदिर खडकृळी (सावखेडा) ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर,श्री क्षेत्र शनीमंदिर लिंबेजळगाव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर,शेंदुरात्मक गणपती शेंदूरवादा ता.गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर शासनाने घेतलेल्या ऐतिहासिक निर्णयासाठी आमदार प्रशांत बंब यांचे मतदारसंघातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.

## बुलढाणा अर्बन बँकेकडून वस्तीगृह विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा साहित्याचे वाटप



तभा वृत्तसेवा
कन्नड :- दि.१२ ऑक्टोबर - बुलढाणा अर्बन बँक शाखा कन्नड व संचालक मंडळ यांच्या वतीने कर्मयोगी डॉक्टर सुकेशजी झवर (चीफ मॅनेजिंग डायरेक्टर) यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने कन्नड शहरांमध्ये विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला.

जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ कन्नड संचलित श्री गणेश मागासवर्गीय विद्यार्थी वस्तीगृह कणकावती नगर कारखाना कन्नड येथील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी शैक्षणिक साहित्याचे व क्रीडा साहित्याचे तसेच खाऊचे वाटप जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव व कन्नड शाखेचे शाखाव्यवस्थापक संजय वराडे, बँकेतील कर्मचारी नंदकिशोर थोरात,सुबोध कुलकर्णी,स्वानंद कुलकर्णी वस्तीगृह अधीक्षक संतोष जाधव यांच्या उपस्थितीत वाढदिवस साजरा करण्यात आला व साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी बुलढाणा अर्बन बँकेचे समाजभिमुख कार्याचा सागर जाधव सर यांनी गौरव करून सदिच्छा दिल्या तसेच शाखा व्यवस्थापक संजय वराडे यांनी बँकेकडून आभार मानले.

## नांदेडात हजारोंच्या उपस्थितीत सुसंवाद आणि करुणेसाठी महा बुद्धवंदना



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.१२ ऑक्टोबर**
बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर अशोक विजया दशमीदिनी सकाळी ७ वाजता हजारो उपासक, उपासिकांच्या उपस्थितीमध्ये ममहा बुद्धवंदनेफ्चा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अडीच हजार वर्षांपेक्षा जास्त देदीप्यमान असा वारसा लाभलेल्या बौद्ध धम्माचा, आपल्या समृद्ध परंपरांचा उत्साह तेवत ठेवणेसाठी, भगवान बुद्धाच्या शिकवणींचा आदर करण्यासाठी आणि सुसंवाद, करुणा आणि सजगता वाढविण्यासाठी नांदेड शहरातील आंबेडकरवादी युवकांनी पुढाकार घेत महा बुद्धवंदनेचे अशोक विजयादशमी दिनी (दि. १२ ऑक्टोबर) पूज्य भिक्खू संघाच्या उपस्थितीत आयोजन केले होते.

नांदेड शहर अलीकडच्या काळामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि धार्मिक चळवळीचे एक प्रमुख केंद्र म्हणून उदयास आलेले आहे. भदंत विनय बोधिप्रिय, भदंत पय्यारतन, भदंत रेवत बोधीसह भिकू संघाच्या प्रमुख उपस्थितीत तसेच हजारो अबाल वृद्ध, श्रद्धावान उपासक, उपासिकांच्या उपस्थितीमध्ये हा महा बुद्धवंदनेचा कार्यक्रम संपन्न झाला.

भारतीय बौध्द महासभा जिल्हाध्यक्ष पी. एम. वाघमारे, रविकिरण जोंधळे यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. नांदेड शहरातील आंबेडकरवादी युवकांनी सहभाग नोंदवत या महा बुद्धवंदनेचे उत्कृष्ट नियोजन केले. तसेच जिल्हा पोलीस प्रशासन, महानगर पालिका प्रशासन यांचे यथोचित सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी. पी. गायकवाड यांनी केले तर या कार्यक्रमाची प्रस्तावना रोहन कहाळेकर यांनी केली. आभार प्रशिक गायकवाड यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वप्निल नरबाग, गब्बर सोनवणे, नितेश हनुमंते, दिनेश येरेकर, अनिकेत सोनवणे, कपिल ढवळे, अभिमान राऊत, कपिल सदावर्ते, योगेश सोनुले, लखन कारले, लखन वाठोरे, कपिल वावळे, संजय सोनकांबळे, शुक्लोधन गायकवाड, आतिश ढगे, वृषभ महाबळे आदींनी परिश्रम घेतले.

## सोयगावच्या शासकीय आय.टी.आयला हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांचे नाव

सोयगाव,दि.१२ ऑक्टोबर : सोयगाव येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस(जरंडी) यांचे नाव देण्यात आले आहे सोमवारी (दि.१४) या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नामकरण करण्यात येणार आहे.

शासनाने समाज सुधारक व राष्ट्र कार्यात योगदान देणाऱ्या महान व्यक्तीचे नाव राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थाना देण्याच्या निर्णय घेतला आहे यामध्ये सोयगाव च्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला जरंडी येथील हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांचे नाव देण्यात आले आहे.सोमवारी या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या नामकरण करण्यात येणार असल्याचे प्राचार्य पंडित म्हस्के यांनी सांगितले जरंडी येथील हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांनी निजामा च्या तावडीतून मराठवाडा मुक्त करण्यासाठी हुतात्मा विश्वनाथ कालिदास राजहंस यांनी मोठा संघर्ष करून मराठवाडा मुक्त केला यामध्ये त्यांना छातीवर गोळी लागून त्यांनी बलिदान दिले आहे २१ आगस्ट १९४८ त्यांनी बलिदान दिले आहे.

# ऊसतोड कामगारांच्या मुलांना क्रीडासाहित्य वाटप



तभा वृत्तसेवा
कन्नड :दि १२ ऑक्टोबर :- तालुक्यातील ऊसतोड कामगारांच्या पाल्यांना मराठवाडा ग्रामीण विकास संस्था अंतर्गत कन्नड तालुक्यातील अंबाला, वडनेर, व जामडी घाट या गावात खेळाचे साहित्य वाटप करण्यात आले. सदरील साहित्य प्रकल्प संचालक आप्पासाहेब उगले , जिल्हा समन्वयक कामेश गवळी तालुका समन्वयक हर्षल खोसरे आणि गावातील सरपंच,मुख्याध्यापक, पोलीस पाटील, शालेय समिती अध्यक्ष व ऊसतोड कामगार समिती यांच्या उपस्थितीत गावातील युवक व बाल गटांना क्रीडासाहित्य किट वितरण करण्यात आली. ज्यामध्ये त्यांना खेळाचे महत्व व आरोग्य विषयी माहीती देण्यात आली.

तालुक्यातील स्थलांतर रोखले पाहिजे या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. उसतोड कामगार यांच्या पाल्याची शैक्षणिक होणारी परवड व त्यावरील उपाय, उसतोड कामगार विकास महामंडळाकडून विविध योजना आहेत. त्याचा लाभ कामगारांनी घ्यावा. योजना विषयी माहिती करून घ्यावी. तसेच जास्तीत जास्त उसतोड कामगारांनी नोंदनी करून उसतोड कामगार ओळखपत्र मिळवावे याबाबत माहिती देण्यात आली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक हर्षल खोसरे यांनी केले. तर आभार कडूबा पवार यांनी मानले.

## कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्या ! निवेदनाव्दारे केली मागणी



तभा वृत्तसेवा
कन्नड :- दि.१२ ऑक्टोबर :- कोतवालांना चतुर्थ श्रेणीचा दर्जा द्यावा या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेच्या वतीने दि.११ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदारांमार्फत निवेदन दिले आहे

या निवेदनात म्हटले आहे की,महाराष्ट्र राज्य कोतवाल संघटनेने मानधन वाढी बाबत मागणी केली नसून राज्य शासनाने दहा टक्के मानधन वाढ देऊ केली आहे जी की अन्यायकारक आहे,सदर वाढ सन २०२६ मध्ये मिळणार असून पुढील वाढ सन २०२९ मध्ये मिळणार आहे,कोतवाल हे वर्ग ०३ व वर्ग ०४ चे कामकाज करत असून इतर मानधन धारक पदाशी तुलना करून ही दिलेली फसवी मानधन वाढ कोतवालांच्या बाबतीत अन्यायकारक आहे त्यामुळे राज्यातील कोतवालांमध्ये असंतोष पसरलेला आहे,

या मानधन वाढीचा निषेध व्यक्त करत असल्याचे निवेदनात नमूद केले आहे सोबतच चतुर्थ श्रेणीचा दर्जा देण्याची मागणी केली आहे या निवेदनावर तालुकाध्यक्ष आर. के. साळवे,उपाध्यक्ष शेख पाशु शेख निजाम,सचिव प्रकाश जाधव, अनिलकुमार मोकासे, विलास पवार,गोरख पवार, भास्कर राठोड, शांताराम गायकवाड, नीलिमा जाधव,वैशाली बारगळ, शीतल सोनवणे, जनार्धन जाधव,आर.एन.कोलते,आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत

# आ. प्रशांत बंब यांच्या हस्ते कृषी उत्पन्न बाजार समितीचे शेतकरी भवनचे भुमिपुजन



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.१२ ऑक्टोबर:
कृषी उत्पन्न बाजार समिती ताब्यात आल्यापासून शेतकरी आणि व्यापारी यांचा समन्वय साधून बाजार समितीला उंच स्तरावर नेण्याचे काम करत असून ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना निवासाची व्यवस्था या ठिकाणी करण्यात येणार असून त्यासाठी शेतकरी भवन उभारण्यात येत आहे असे यावेळी आमदार प्रशांत बंब म्हणाले ते कृषी उत्पन्न बाजार समिती गंगापूरच्या नियोजित शेतकरी भवनचे भूमिपूजन आमदार प्रशांत बंब यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे राज्य कार्यकारणी सदस्य किशोर धनायत कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पाटील लासुर स्टेशन कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती शेषराव नाना जाधव उपसभापती संदीप काकडे भाजपचे तालुकाध्यक्ष रवींद्र चव्हाण युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल जाधव नंदकुमार गांधीले शिवसेनेचे गंगापूर तालुकाध्यक्ष दिलीप निरफळ रामेश्वर मुंदडा जिल्हा उपाध्यक्ष शिवनाथ मालकर युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष वैभव धनायत कृष्णा सुकाशे दीपक बडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी प्रास्ताविकात बोलताना किशोर धनायत म्हणाले भारत स्वातंत्र्यानंतर कृषी उत्पन्न बाजार समितीचे खरीप चळवळ आपल्या महाराष्ट्रामध्ये यशवंतराव मोहिते पाटील आणि वैकुंठ मेहता यांनी रुजवली याची सुरुवात त्यांनी केली ज्यावेळेस शेतकऱ्याचा कृषीमाल विकण्यासाठी सुविधा उपलब्ध नसताना तो व्यापाऱ्याकडे आणण्यासाठी बाजारपेठ निर्माण व्हावी कृषी मालाचा दर्जेदार कृषी माल ग्राहकांना मिळावा आणि चांगल्या पद्धतीचा भाव शेतकऱ्यांना मिळावा या पाठीमागची खरी संकल्पना आहे चांगला भाव द्यायचा असेल तर कृषी उत्पन्न बाजार समिती विकसित असली पाहिजे आपल्या कृषी उत्पन्न बाजार समिती बाजार समितीचे अनेक प्रकारचे उपक्रम राबवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक बडे यांनी केले आभार प्रदर्शन बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब पदार यांनी आभार मानले.

# आदेश होऊनही आपेगाव ते आंबेलोहळ मोकळा होईना; शेतकरी, विद्यार्थी, महिलांची हेळसांड



> सदर ठिकाणचा रस्ता मोकळा करून देण्याबाबत तहसीलदार यांनी आदेश दिले आहेत ,शांततेच्या मार्गाने रस्ता मोकळा करण्याचे माझे प्रयत्न सुरू आहे . दोन्ही गटातील शेतकऱ्यांसोबत चर्चा सुरू आहे. जर ऐकले नाहीच तर कायद्याची अंमलबजावणी करून अडवलेला रस्ता मोकळा करून दिला जाईल.
> डी. एस. गाढे, मंडळ अधिकारी

> सदर रस्ता मागील महिन्यात मोकळा करून दिला आहे. परंतु जर पुन्हा अडवला असेल तर संबंधितांवर गुन्हे दाखल करू.
> ज्योती तोंडे - गवळी , तलाठी

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : आपेगावहून आंबेलोहळ या गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावर काही राजकीय पुढाऱ्यांनी पदाचा गैरवापर करत शासकीय रस्ताच अडवला आहे त्यामुळे २०० लोकसंख्या असलेल्या शेत वस्तीवरील विद्यार्थी, महिला व दूध उत्पादक शेतकऱ्यांना दहा किलोमीटरचा फेरा घेऊन ये जा करावे लागत आहे प्रशासन मात्र याकडे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांची हेळसांड होत आहे.

याविषयी गंगापूर तहसीलदारांनी सदर रस्ता मोकळा करून देण्याबाबत आदेश काढलेला असतानाही मंडळाधिकारी, तलाठी कार्यवाही न करता दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप शेतकरी करीत आहेत. गावातील काही राजकीय व्यक्ती सह सदाशिव जाधव , पोपट जाधव , चंद्रकांत जाधव बाळू जाधव किशोर जाधव यांनी गट नंबर ६१ व गट नंबर ७६ या दोन्ही गटाला लागून असल्या रस्ता बंद केला आहे .

हा रस्ता पूर्वीपासून वहीवाटीचा आहे परंतु गेल्या सहा महिन्यापासून हा रस्ता अडवून ठेवल्याने येथील नागरिकांचे हाल होत आहे.

संबंधित प्रशासन मात्र या प्रकरणाकडे दुर्लक्ष करीत असल्याने सदर ठिकाणी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन वाद होऊ शकतात त्यामुळे हा रस्ता त्वरित मोकळा करून देण्यात यावा अशी मागणी काशीनाथ आढाव , भास्कर थोरे , मनोज थोरे , राजू बडक , काकासाहेब आढाव , केशव आढाव , रामभाऊ आढाव , कैलास आढाव , किशोर आढाव हे शेतकरी करीत आहे.

माझी दुभती म्हैस आजारी पडली होती. पाऊस पडून पर्यायी खाजगी रस्त्यावर चिखल झाल्याने मला सदर म्हशीला वेळेवर वैद्यकीय उपचार न करता आल्याने म्हैस तडफडून मरण पावली या मध्ये सव्वा लाखापर्यंत नुकसान झाले असल्याचे शेतकरी भास्कर थोरे यांनी सांगितले.

# भाजपाला हरियाणामध्ये बहुमत, गंगापूरात जल्लोष

### पेढे वाटून,फटाके फोडून आनंद व्यक्त



तभा वृत्तसेवा
गंगापूर दि.१२ ऑक्टोबर : हरियाणात तिसऱ्यांदा भाजपाला सत्ता मिळाल्याने गंगापूर शहरात भाजपचे आमदार प्रशांत बंब मित्र मंडळ व भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी पेढे वाटून व फटाके फोडुन आनंद व्यक्त केला.

हरियाणामध्ये तिसऱ्यांदा भाजपला बहुमत मिळाल्याने गंगापूर शहरात आनंदाचे वातावरण पसरले असून आमदार प्रशांत बंब समर्थकांनी शहरात ठिकठिकाणी फटाके फोडले यावेळी सभापती भाऊसाहेब पदार, नगरसेवक प्रदीप पाटील, मारुती खैरे ,दीपक साळवे, प्रशांत मुळे,ज्ञानेश्वर सवाई,रिजवान पठाण, सुमित मुंदडा,अशोक मंत्री,संदीप बोजवारे, संदीप आळंदकर, कृष्णकांत व्यवहारे, दिनेश राऊत,अमोल शिंदे,वैभव धनायत,लखन पानकडे, अतुल राजू काकडे, योगेश चव्हाण,संतोष बोरुडे,भिकचंद नंदू सद्गुरे, अरुण सागर, राजेंद्र वाबळे,बंडू कळसकर, आत्तर जव्हरी, रामेश्वर पाटील,जाफर सेट, प्रकाश पाटील , भाऊराव पवार, विठ्ठल भाटकर, अर्पित भामरे,मनोज पाटील,आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रतनजी टाटा यांना श्रद्धांजली अर्पण



वाळूज महानगर (प्रतिनिधी):जागतिक स्तरावर औद्योगिक छाप पाडणारे उद्योगरत्न स्व रतनजी टाटा यांना सामाजिक विचार मंच तर्फे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या वेळी मंचचे संस्थापक अध्यक्ष गजानन नांदुरकर, अध्यक्ष केशव ढोले व इतर मान्यवरांनी रतन टाटा यांच्या जीवनावर व देशहितासाठी केलेल्या कार्यावर उजाळा देऊन आपले मनोगत व्यक्त करत श्रद्धांजली अर्पण केली, शेवटी गायत्री मंत्राचे पठण करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी रवींद्र शेलगावकर , अमर निकम, नंदकुमार कुलकर्णी, शिवाजी राऊत, विश्वनाथ धोंडगे, परमेश्वर गणाचार्य, ऋषीकेश पाटील, माणिक कुंभार, सदाशिव पाटील, बटुगीर बावा, लक्ष्मण सरोदे, अनिल सुपे,सुधाकर शेवाळे, वाल्मिक धोक्रट, तुकाराम खांडेकर, नरेश विजयवर्गीय, संजय फलटणे, महेंद्र म्हस्के, प्रितम गवई,सतिष बचुटे, आदींची उपस्थिती होती.

## 'गुलाबी' शहरात सुरु होणार नव्या मैत्रीचा प्रवास, 'गुलाबी'चा धमाल टिझर प्रदर्शित

छत्रपती संभाजीनगर - नवरात्रीची आठवी माळ म्हणजे अष्टमी. आजचा रंग गुलाबी असल्याने बहुप्रतीक्षित 'गुलाबी' चित्रपटाचा धमाकेदार टिझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टिझरमध्ये जयपूरच्या गुलाबी नगरीत तिघींच्या नवीन प्रवासाची कहाणी पाहायला मिळत आहे. मैत्री, प्रेम, स्वप्ने, नाती या भावनांच्या विश्वात रंगून जाणाऱ्या स्त्रिया जेव्हा स्वतःच्या विश्वात जगायला सुरुवात करतात आणि स्वतःला उलगडू पाहातात, तेव्हा त्यांच्या आयुष्याचा हा प्रवास किती आनंददायी असतो, याचा अनुभव 'गुलाबी' देणार आहे.

टिझरमध्ये श्रुती मराठे, अश्विनी भावे आणि मृणाल कुलकर्णी धमाल करताना दिसत असतानाच यात जयपूर नगरीचे सौंदर्यही दिसत आहे. तीन वेगवेगळ्या वयोगटातील स्त्रिया जयपूर शहरात एकत्र येऊन काय धमालमस्ती करतात, जयपूरमधील तिघींचा हा प्रवास काही वेगळं उलगडू पाहात आहे का, हे पाहाणं औत्सुक्याचे ठरणार आहे. व्हॉयलेट फ्लेम मोशन पिक्चर्स प्रस्तुत 'गुलाबी' चित्रपट येत्या २२ नोव्हेंबर रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

## सोयगाव तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशीं पाऊस; कापसासह मका पिकांचे नुकसान

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१२ऑक्टोबर
सोयगाव सह तालुक्यात सलग तिसऱ्या दिवशीही परतीच्या पावसाने धुमाकूळ सुरू केला आहे शुक्रवारी दुपारी तीन वाजता सोयगाव सह जरंडी,परिसरात झाल्या नंतर सायंकाळी बनोटीसह परीसरात परतीच्या पावसाने थैमान घातले आहे शुक्रवारी सकाळपासून टप्प्याटप्प्याने तालुक्यात दीवसभर पाऊस पडला सायंकाळी पाच वाजता बनोटी,गोंदेगाव परीसरात मुसळधार पाऊस झाल्याने वेचणी साठी असलेला कापूस व सोगणी करुन ठेवलेला मका पुर्णपणे पाण्यात भिजल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असुन शेतकरी अडचणीत आला आहे.

वरठाण, बनोटी, गोंदेंगाव, किन्ही, हनुमंतखेडा या भागात मुसळधार पाऊस झाल्याने सर्कल मध्ये शेतकऱ्यांचे पांढरे सोने म्हणून ओळख असलेल्या कापसाची भिजून वाता झाल्या आहे त्यामुळे शनिवारी विजया दशमी सणावर विरजण पसरले आहे कापूस पिकावर शेतकऱ्यांची देवाण घेवाण होत असते परीसरात शेतकरी चे मुख्य पिक कापुस आहे सद्या परीसरात कापुस पिकाची पहीली वेचणी सुरु असुन तीन दिवसापासून परतीचा पाऊस सुरू झाल्याने फुटलेला कापुस पुर्णपणे ओला झालेला आहे काही शेतकऱ्यांनी थोड्याफार प्रमाणात कापूस वेचला परंतु त्या कापसाला देखील कवडीमोल भाव मिळत आहे.परतीच्या पावसाने कैरी सडली असून फुटलेला कापूस भिजून त्यावर कोंब उगवले आहे काही प्रमाणात कापसाचे बोंडे फुटले आहे ते देखील परतीच्या पावसाने ओलेचिंब होऊन त्यांच्या वाती झालेल्या आहे

# महावितरणच्या अभय योजनेत १६५४ ग्राहकांनी भरली २.८१ कोटींची थकबाकी

### व्याज-दंड माफी व एकरकमी बिलापोटी मिळाली दीड कोटींची सवलत, कायमस्वरूपी वीज खंडित झालेल्या ग्राहकांना होणार लाभ

> **सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार कोणत्याही जागेच्या मालक किंवा खरेदीदार किंवा ताबेदार यांनी वीजबिलाची थकबाकी रक्कम भरणे बंधनकारक आहे. तथापि, थेट कायदेशीर कारवाई करण्याच्या ऐवजी सुविधा म्हणून ग्राहकांना दिलासा देण्यासाठी १ सप्टेंबरपासून ही सवलतीची योजना लागू केली असून या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन ग्राहकांनी चिंतामुक्त व्हावे.**
> **- पवनकुमार कछोट, मुख्य अभियंता, महावितरण, छत्रपती संभाजीनगर परिमंडल.**

छत्रपती संभाजीनगर : बिलाच्या थकबाकीमुळे वीजपुरवठा कायमस्वरूपी खंडित केलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांसाठी महावितरण अभय योजना २०२४ सुरू करण्यात आली आहे. योजनेस छत्रपती संभाजीनगर परिमंडलात उत्तम प्रतिसाद मिळत असून आजपर्यंत १६५४ ग्राहकांनी २ कोटी ८१ लाख रुपयांची थकबाकी भरली आहे. त्यांना व्याज आणि विलंब आकार माफी व एकरकमी मूळ थकबाकी भरल्याने तब्बल १ कोटी ५१ लाख रुपयांची सवलत मिळाली आहे.

३१ मार्च २०२४ पर्यंत थकीत बिलामुळे कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित झालेल्या (पीडी) महावितरणच्या घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांसाठी ही योजना आहे. थकीत बिलांच्या योजनेत कृषी ग्राहकांचा समावेश नाही. योजनेचा कालावधी १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२४ आहे. ३१ मार्च २०२४ पूर्वी थकबाकीमुळे कायमस्वरूपी खंडित झालेले छत्रपती संभाजीनगर परिमंडलातील ३ लाख २३ हजार ५५५ ग्राहक या योजनेसाठी पात्र ठरले आहेत. या ग्राहकांकडून महावितरणला मूळ बिलाची ५७१ कोटी ६३ लाख रुपयांची रक्कम तसेच १७५ कोटी २३ लाख रुपये व्याज आणि ७ कोटी २३ लाख रुपये विलंब आकार येणे आहे. तथापि, या वीज ग्राहकांना दिलासा देण्यासाठी थकित बिलाच्या मूळ रकमेवरील व्याज आणि विलंब आकाराच्या स्वरुपातील दंड माफ करण्यात येईल. मूळ बिलाच्या ३० टक्के रक्कम भरून ऊर्वरित ७० टक्के रक्कम सहा हफ्त्यात भरायची सवलत ग्राहकांना मिळेल. जे घरगुती, व्यावसायिक इत्यादी लघुदाब ग्राहक एकरकमी थकीत बिल भरतील त्यांना दहा टक्के सवलत देण्यात येईल. उच्चदाब औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांना पाच टक्के सवलत मिळेल.

योजनेचा असा लाभ घ्या

संबंधित वीज ग्राहकांना www.mahadiscom.in/wss/wss या वेबसाईटवरून किंवा महावितरणच्या मोबाईल पवरून योजनेचा लाभ घेता येईल. वीज ग्राहक १९१२ किंवा १८००-२३३-३४३५ किंवा १८००-२१२-३४३५ या टोल फ्री क्रमांकावर फोन करूनही माहिती घेऊ शकतात. योजनेनुसार पैसे भरल्यानंतर संबंधित वीज ग्राहकाला पुन्हा एकदा नियमित वीज कनेक्शन घेता येईल. त्याच पत्त्यावर योग्य पुरावे सादर करून नव्या नावाने वीज कनेक्शन घेण्याचीही सुविधा असेल. ज्या ग्राहकांना आपल्या वीजबिलाबाबत शंका किंवा तक्रार असेल त्यांनी महावितरणकडे ऑनलाईन तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले आहे.